
साप्ताहिक
माणूस
१६ जुलै ८३ / दोन रुपये

# २० वर्षापूर्वी मुलतानमधे...



# दि इस्लामिक बॉंब



साप्ताहिक

# माणूस

¤

**वर्ष : तेविसावे**

**अंक : सातवा**

¤

**१६ जुलै १९८३**

**किंमत : दोन रुपये**

¤

संपादक

**श्री. ग. माजगावकर**

¤

साहाय्यक

**दिलीप माजगावकर**

**सौ. निर्मला पुरंदरे**

**मेधा राजहंस**

¤

वार्षिक वर्गणी

**पन्नास रुपये**

¤

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादीबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी चालक सहमत असतीलच असे नाही.

¤

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक **श्री. ग. माजगावकर** यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.

¤

**: पत्ता :**

**साप्ताहिक माणूस**

१०२५ सदाशिव, पुणे ३०

दूरध्वनी : ४४३४५९

¤

मुखपृष्ठ

**संजय पवार**

## सप्रेम नमस्कार

¤ साप्ताहिक ' माणूस 'चे पाचही वासंतिक विशेषांक वाचले. उन्हाळ्याची सुट्टी ' जर्मखिडी ' आणि त्याच्या परिसरात घालविल्याचा पुनःप्रत्ययाचा आनंद मिळाला. आपटे कुटुंबातील आक्कांचं शब्दचित्र वाचल नि आपटे कुटुंबियांतील या त्यागी आक्कांच कृपाछत्र लाभलेल्या आपटे मंडळींना हेवा वाटला ! कारण तीस–पस्तीस वर्षांपूर्वी आमच्या घरात आक्कांसारखीच बालविधवा होऊन 'माघारी' आलेली आत्याबाई आमच्या घरी होती. आपटयांच्या आक्कानं भाचरांची, त्यांच्या मुलांची, सुनांची दुखणी–बहाणी काढून त्यांच्या घरात ती सावली बनून राहिली आणि आमच्या आत्याबाईंनी आम्हावर असलेली मातृसुखाची सावली आमच्या अल्पवयात काढून घेण्याच्या दृष्टीनं दररोज भांडण उकरून काढून घरात अशांतता निर्माण करून घरात उन्हाळा करून सोडला ! आमच्या थोरल्या सावत्र बहिणीला आणि तिच्याबरोबरच माझ्या सख्ख्या बहिणींना विषारी शिकवण देऊन, घराची फाटाफूट करून, आपण स्वतः दुसऱ्याच्या घरी मोलकरीण म्हणून निघून गेली ! तिने सजवलेली त्या फुटीरपणाची विषारी फळं मला आजपर्यंत पचवायला लागत आहेत. म्हणूनच आपटयांच्या अक्कासारख्या अमृतफळांची अपूर्वाई कळते–जाणवते.

२० जून ८३ **मधुसूदन जोशी**

डोंबिवली

¤ आपले चारही वासंतिक विशेषांक अत्यंत वाचनीय नि देखणे निघाले आहेत. वर्षारंभ अंक मला त्या तुलनेत फिका वाटला.

श्री. दाभोळकर यांनी गोंडा प्रकल्पाची माहिती चांगली करून दिली; परंतु अधनमधून संघावर बोचरी टीका करण्याची काही आवश्यकता होती असे वाटत नाही. उदाहरणार्थ, प्रकल्पामध्ये काम करणाऱ्यांना शरद जोशींच्या चळवळीची माहिती नसणे ही गोष्ट त्यांना फारच विचित्र वाटली. वास्तविक एक विशिष्ट काम पद्धतशीरपणे करणाऱ्या माणसाला जगातल्या त्यासंबंधीच्या सर्व घडामोडींची माहिती असलीच पाहिजे असे नाही. गोंडा प्रकल्पाचे शिल्पकार त्याबद्दल माहिती घेऊन आपल्या कार्यपद्धतीत आवश्यक तो बदल करीत असतील असे समजण्यास काही हरकत नसावी. संघासंबंधीचा दूषित पूर्वग्रह सोडला तर श्री दाभोळकरांनी गोंडा प्रकल्पाचे यथातथ्य चित्र उभे केले यात शंका नाही.

श्री. ठाणेकरांनी बोड प्रकल्पाच्या उभारणीतील नि कार्यवाहीतील अडचणीही वास्तवरीत्या मांडल्या आहेत.

२२ जून ८३ **श. ह. भिडे**

अकोला

¤ आपले पाच उत्कृष्ट वासंतिक अंक मिळाले. ' ब्लड कॅन्सर 'ने हृदयाची पकड घेतली. शेवटच्या परिच्छेदाने मात्र आम्हा मुंबईकराची लवकरच वाट लागेल असे वाटू लागले.

२८ जून ८३ **के. जी. कुलकर्णी**

मुंबई

¤ 'माणूस'चा दिनांक २ जुलैचा अंक अत्यंत वाचनीय होता. या अंकातील श्री. विनय सहस्रबुद्धे यांचा ' सावरकर समता ज्योतीचा सचार ' हा लेख अत्यंत उद्बोधक होता. याशिवाय सुप्रसिद्ध कथालेखिका सुधा नरवणे यांची ' संशयपिशाच्च ' ही कथा अगदी मनापासून आवडली. कथेची मध्यवर्ती कल्पना लेखिकेने उत्कृष्ट रंगविली आहे. 'माणूस'मधून नेहमीच उच्च दर्जेदार साहित्य प्रसिद्ध होत असते याबद्दल आपले मनःपूर्वक अभिनंदन !

५ जुलै ८३ **शिवलिंग म. धोत्री**

सोलापूर

## एकतर्फी परीक्षण

¤ ' माणूस 'च्या २ जुलै अंकात ' संकल्प ' या पुस्तकाचे काहीसे एकतर्फी परीक्षण वाचले. काही महत्त्वाच्या बाबींचा उल्लेख त्यात आलेला नाही. म्हणून हा पत्रप्रपंच.

संजीव खांडेकर-संपादित गं ५ हा दिवाळी अंक ग्रंथालीच्या सहका न प्रसिद्ध झाला व लगेचच संकल्प हे पुस्तक प्रकाशित करण्यात आले. त्यामुळे कदाचित ग्रंथालीची सोय झाली असेल; परंतु पुस्तक आणखी चांगल्या स्वरूपात व चांगल्या अंतरंगासह प्रसिद्ध करता आले असते असे मात्र राहून राहून वाटत राहते. पुरेसे संपादकीय संस्कार करून, सावकाशाने पुस्तक प्रसिद्ध केले असते

तर पुस्तकाचा दर्जा खूपच वाढला असता; परंतु संपादकाना व ग्रथालीला पुस्तक प्रसिद्ध करण्याची फारच घाई झाली होती असे दिसते व त्यामुळे एका चांगल्या कल्पनेला पुरेसा न्याय मिळालेला नाही व पुस्तक-स्वरूपातील 'संकल्प' अपुरा (दिशाहीन-पण?) वाटतो. संपादकांनी अपूर्णत्वाची कबुली पण प्रस्तावनेत देऊन टाकली आहे!

सामाजिक चळवळीतील कार्यकर्त्यांनी त्यांच्या आयुष्यातील चळवळीच्या दिवसाचा मागोवा घ्यावा, त्या काळाचे उत्खनन करावे, आत्मनिरीक्षण करावे अशी संपादकाची इच्छा होती; पण ती फारशी सफल झालेली नाही.

सामाजिक चळवळ व राजकीय चळवळ यात भेदाभेद संपादकानी, जाणीवपूर्वक वा अजाणत. केलेला नाही असे दिसते व त्यामुळे श्रमिक संघटना, युक्राद, समता युवा संघटन, लाल निशाण पक्ष या सघटनातील कार्यकर्त्यांना या पुस्तकात स्थान मिळाले आहे, हे योग्यच झाले; परंतु इतर राजकीय पक्षातील, विशेषत: कांग्रेस, जनता, भाजप, मार्क्सवादी, उजवे कम्युनिस्ट व लोकदल या पक्षांनील कार्यकर्त्यांची मनोगते येथे दिसत नाहीत. कारणे कोणतीही असोत! या उणीवेमुळे 'संकल्प' प्रातिनिधिक वाटत नाही. संपादकानी कार्यकर्त्यांकडून लेख मिळवण्यात आलेल्या अडचणी आपल्या छोटयाशा प्रस्तावनेत सांगितल्या आहेत, परतु पुस्तकाचे स्वरूप प्रातिनिधिक करण्यासाठी या अडचणी दूर करण्याची आवश्यकता होती व पुस्तक काढण्याची घाई केली नसती तर हे नक्कीच साध्य झाले असते. दुसरे असे की, सगळेच सामाजिक कार्यकर्ते हे खरेच; पण दोन-तीन वर्षे ज्यानी चळवळीत काम केले आहे त्याच्यात व ज्यानी ८-१० वर्षे किंवा त्याहून अधिक काळ काम केले आहे त्याच्यात निवड करता आली असती व पुस्तक मोठे झाले नसते तरी चागले झाले असते

सुभाष जोशींनी त्यानी बाधलेल्या विडया वळणाऱ्या वायकाच्या संघटनेबद्दल नेटके लिहिले आहे. संपादकाची मात्र त्यानी देवदासी चळवळीबद्दल लिहावे अशी अपेक्षा होती का काय नकळे. कारण लेखाचे शीर्षक जोशींनी लिहिलेल्या मजकुराशी विसंगत आहे, हीच चूक झाली आहे. श्री. जगदीश गोडबोले याच्या लेखाच्या शीर्षकाबाबत गोडबोले 'हाकारा' या चळवळीशी एकरूप झाले. आहेत; परतु त्यानी 'हाकारा'बद्दल एक अक्षरही लिहिलेले नाही. बाबा आमटयावर टीका करण्यासाठी मात्र – पण ते जाऊ द्या; त्याबद्दल पुन्हा कधी तरी.

बहुतेक मार्क्सवादी विचाराच्या कार्यकर्त्यांनी आणीबाणीचे उल्लेख ओझरते केले आहेत वा त्याबद्दल लिहिणे पूर्णत: टाळले आहे, हा चक्क पलायनवाद आहे. त्या काळातील कार्यकर्ता म्हणून त्याची झालेली कुचंबणा वा त्याचा नाकर्तेपणा, अगतिकता वा त्यापैकी काहीनी आणीबाणीचे सुरुवातीला वा शेवटपर्यंत केलेले (चुकीचे) समर्थन याचा उल्लेख वा ऊहापोह नाही का त्या कालखंडाची या सर्वांना आठवणसुद्धा नकोशी वाटते?

संपादक श्री. संजीव खाडेकर यानी योजकता दाखवली; पण तिला व्यापक दृष्टिकोन, नीरक्षीर-विवेक व संपादनाचा अनुभव यांची जोड मिळती तर 'संकल्प' सिद्धीस गेला असता; पण ते होणे नव्हते तरी एक प्रयत्न म्हणून संकल्पचे स्वागत करणे आवश्यक आहे, हे पण नमूद केले पाहिजे

५ जुलै ८३ — न. आ दीक्षित, डोंबिवली

---

## उत्कृष्ट लेख

□ 'माणूस'च्या वर्षारंभ अंकातील 'त्याची माझी मैत्री' हा शोभा भागवताचा प्रदीर्घ सुरेख लेख वाचला! मानवी परस्परसंबंधाचे अनेक पैलू मैत्रीच्या म्हणजेच सहवास-सुखाच्या संदर्भात-तेही विशेषत: तारुण्यकाळातील रोचक वाटले 'एवढं लिहूनही अस वाटतं आहे की, अजून खूप राहिलय लिहायचं!' हा लेखाच्या अखेरचा लेखिकेचा अभिप्राय वाचकाच देखील मनोगत सांगून जातो. कुणीसं म्हटलं आहे की, 'मानवी परस्पर संबधावर अखेरचा शब्द कधी काळी तरी लिहिला जाईल असं वाटत नाही'—कदाचित हेच त्यातले सत्य, हाच त्यावरील अखेरचा शब्द ठरावा!

'मैत्री' ही केवळ कल्पना न करता ती जेव्हा वास्तवता म्हणून पाहिली जाते तेव्हाच व तरच निकोप समाजात माणसाचे तुकडे पडू नयेत, तर समाजात लहान-मोठया, तरुण-वृद्ध स्त्रीपुरुषाना एकत्र राहता आलं पाहिजे, एकमेकाशी सवाद साधता आला पाहिजे, अनुभवाना कायम आपल्या मनाचा दरवाजा खुला राहिला पाहिजे ही लेखिकेची अपेक्षा सार्थ होणे संभवनीय आहे मग मैत्रीचे स्वरूप वैयक्तिक वा केवळ परावलंबी न राहता माणुसकीचा तो एक अविभाज्य, एकसंध, एकजिनसी भाग असल्याचे प्रत्ययास येईल आणि मनोभंग, पश्चात्ताप, प्रतिक्रियाची कटुता आणि जळमटाना वावच उरणार नाही! मनाचा कायम उघडा असणारा दरवाजा सर्वांना सामावून घेईल, समजावून घेईल! एका उत्कृष्ट लेखाबद्दल अभिनंदन!

११ जुलै ८३ — सदाशिव मंगरूळकर, पुणे


'प्रबोधन गोरेगाव' या संस्थेचे पहिले गौरवशाली प्रकाशन

स्वा. सावरकर-जन्मशताब्दी-निमित्त प्रकाशित होणारे,

**एका पैलूवर एक अशी सुमारे साठ भाषणे असलेले**

सहजसुदर शैलीतील एकमेव पुस्तक

**शतपैलू सावरकर**

**लेखक :** (प्रा) हरिश्चंद्र त्र्यबक देसाई

**पृष्ठे :** सुमारे डेमी ३००. **मूल्य :** रु. ३०

प्रकाशन-दिनाक – १५ ऑगस्ट १९८३

**प्रकाशन-पूर्व सवलत – मूल्य रु. २५**

**संपर्क :** 'प्रबोधन गोरेगाव'

गणपती भुवन, म. गांधी मार्ग, गोरेगाव (पश्चिम) मुबई – ६२

**दूरध्वनी :** ६९४१५७

# इथून–तिथून

## रामचंद्र काशीरामची गोष्ट

बिहारमधल्या पचेचाळीस वर्षांच्या रामचंद्र काशीरामच्या दृष्टीने तुरुंगातून सुटका मोठा पेच ठरली. रेल्वेतून विनातिकीट प्रवास करण्याबद्दल त्याला २९ वर्षे तुरुंगात काढावी लागली. त्याला न्यायालयापुढे हजर करण्यासाठी आवश्यक असलेली कागदपत्रे हरवल्यामुळे अधिकाऱ्यांनी त्याला न्यायालयात आणलेच नाही. 'नागरी स्वातंत्र्य' यासंबंधी काम करणाऱ्या दोन वकिलांना ही घटना अचानक समजली. त्यांनी रामचंद्र काशीरामला जामिनावर मुक्त केले. कुठे जावे, काय करावे हे त्याला समजले नाही. कारण स्वत:ची काळजी घ्यायला तो असमर्थ होता; पण या जगात माणुसकी, उदारता शिल्लक असल्याचा अनुभव पुढे त्याला मिळाला.

लंडनच्या 'संडे टाइम्स' ने ही बातमी दिली आणि जगातल्या इतर अनेक वृत्तपत्रांनी ती उचलली. लौकरच संडे टाइम्सच्या कार्यालयात टोरांटोहून एका भल्या माणसाचे पत्र पोहोचले आणि सोबत २५ डॉलर्सची आंतरराष्ट्रीय मनीऑर्डरही ! या गृहस्थाने लिहिले होते, 'हे पैसे त्या भारतीय माणसाला पाठवून द्या आणि सांगा कुणी तरी तुझी काळजी घेत आहे म्हणून !'

दरम्यान रामचंद्र-प्रकरणातील दुर्लक्ष, बेपर्वा वृत्तीबाबत जगातील अनेक भारतीय दूतावासाकडे निषेध करणाऱ्या, चौकशी करणाऱ्या प्रतिनिधींची गर्दी झाली. रामचंद्रला आम्ही मदत देतो असे अनेकांनी कळवले.

तीन मे रोजी सर्वोच्च न्यायालयात हे प्रकरण आले आणि बिहार सरकारने रामचंद्र काशीरामला नुकसानभरपाई म्हणून दरमहा तीनशे रुपये देण्याचा आदेश दिला. बिहार सरकारने रामचंद्रच्या सुटकेपासून असे पैसे देऊ असे निवेदन केले आहे. सर्वोच्च न्यायालय ऑगस्ट महिन्यात निकाल देईल तो त्याच्या बाजूने लागला तर त्याला सुमारे सात हजार डॉलर्स (७० हजार रुपये) इतकी रक्कम मिळेल !

## नैराश्याच्या गर्तेत

चिमुकल्या पण बळकट अशा इस्रायलच्या सरकारचा शत्रू आहे त्याचाच पंतप्रधान. पंतप्रधान श्री. बेगिन यांची झोप उडाली असून ते कमालीचे निराश झाले आहेत. गेल्या हिवाळ्यात त्यांची पत्नी वारल्यापासून ते अधिक निराश झाले आहेत.

आपल्या टीकाकारांना बेगिनसाहेब उत्तरेही देत नाहीत आणि सरकारी यंत्रणेचे सुकाणूही व्यवस्थित चाललेले नाही. लेबॅनॉनमधील सैन्य काढून घेण्याची मुदत आणि देशात चाललेला डॉक्टरांचा संप यासारख्या वादळी प्रश्नांचे आव्हान या अवस्थेत त्यांच्यासमोर उभे आहे. दरम्यान लेबॅनॉनविरुद्धच्या युद्धाचा पहिला वाढदिवस अत्यंत मौन पाळून पार पडला. या युद्धात ५०० इस्रायली सैनिक मृत्यू पावले होते.

पंतप्रधान बेगिन यांनी आपली निराशा झटकून कामाला लागले पाहिजे, अन्यथा सरकारी यंत्रणेवरची त्यांची पकड ढिली होईल असे पक्षश्रेष्ठींनी त्यांना बजावले आहे. गेल्या पंधरवड्यात निवडणुका होणार असल्याच्या अफवाही पसरल्या होत्या.

## छपराविना शाळा

खडू नाहीत, फळे नाहीत, खाली अंथरायला पोत्याचे तुकडे नाहीत आणि वर छप्परही नाही ! मध्यप्रदेशातल्या पंचवीस हजार शाळांची ही स्थिती आहे. या सगळ्या प्राथमिक शाळा असून त्यांत जाणाऱ्या गरीब मुलांचे उन्हात, पावसात होणारे हाल यांच्याकडे सरळ दुर्लक्ष केले जात आहे.

आश्चर्याची गोष्ट म्हणजे दूर डोंगरदऱ्यांत रहाणाऱ्या भटक्या समाजातल्या मुलामुलींनी अधिकाधिक प्रमाणात शाळेत जावे म्हणून मध्यप्रदेश सरकारने २ लाख मुलींना मोफत पोशाख आणि २ लाख मुलांना मोफत पाठ्यपुस्तकांची योजना सुरू केली आहे शिवाय १९९० पर्यंत सहा ते अठरा या वयोगटातली २४ लाख मुले शाळेत जावीत असे उद्दिष्टही सरकारने ठरवले आहे.

अशा या शाळांना शिक्षकही अपुरे आहेत. राज्यातल्या चोवीस हजाराहून अधिक शाळांतून एकच शिक्षक पाच–पाच वर्ग घेत असतो. या शाळांना शिकवण्यासाठी तातडीने आठ हजार प्राथमिक शिक्षकांची गरज आहे.

## वाचाळ गरुड

माणसाप्रमाणेच गरुड हेही अन्नासाठी झगडे करतात आणि पुन्हा वाटणीही कर-


**दलित–दलितेतर या भेदांना ओलांडून जाणारे**
**गोष्टीरूप आंबेडकर चरित्र**

सर्व मराठी मुलांच्या हाती हा 'कथा-संग्रह' देणे योग्य ठरेल ! दलित–दलितेतर या भेदांना ओलांडून जाणारा हा स्फूर्तिदायक कथा-संग्रह संस्कारक्षम मुलांना अत्यंत उद्‌बोधक वाटेल. इतिहासाचे सर्जनशील साहित्यात कथारूपाने जे रूपांतर होते, ते सिद्धहस्त लेखक कसे सोन्यासारखे करून दाखवितो त्याचा पुरावा बागुलांच्या या गोष्टीरूप चरित्रातून मिळतो.

**–ग. रा. जाधव**

(केसरी, रविवार, ६–१२–८१)

**आंबेडकर भारत**

**लेखक : बाबुराव बागुल**

**राजहंस प्रकाशन, पुणे. मूल्य : २० रुपये.**

तात. मानवी स्वभावाचेच अनेक पैलू गरुडात दिसतात, असे मत या विषयाचे अभ्यासक एस्. एम्. उस्मान यानी नुकतेच नव्या दिल्लीत एका भाषणात व्यक्त केले.

गरुड अतिशय वाचाळ असतात. आकाशात उंच भरारी घेतल्यानंतर गरुड जोराने ओरडला, तर त्याचा आवाज दोन मैलापर्यंत ऐकू येऊ शकतो; पण जोराने ओरडणारा गरुड मीलनाच्या वेळी आपला स्वर तेवढाच मऊ करतो. गरुडासारख्या भव्यता असलेल्या प्राण्याला नभांगणात मीलनाला जागा मिळावी ही निसर्गाची अगाध किमया आहे

गरुड जोडीने शिकार किंवा आपले भक्ष्य शोधण्यासाठी सहसा जात नाही. अतिशय वेगवान असलेला हा पक्षी सहजासहजी कोल्हा, लांडगा, काळवीट या प्राण्यांवर हल्ला करून आपला उदरनिर्वाह करू शकतो. आपल्या भक्ष्याजवळ कोणीही आला की, लगेच गरुड त्याच्यावरही हल्ला करतात.

## अंधांसाठी कॉम्प्युटर

अंध व्यक्तीही वापरू शकतील अशी नवी कॉम्प्युटर–पद्धती तयार करण्यात ओसाका ( जपान ) विद्यापीठाच्या संशोधकाना यश आले आहे यामुळे अंधाना कॉम्प्युटर-ऑपरेटर म्हणूनही काम करणे शक्य होणार आहे.

ही पद्धती प्रत्यक्षात सुरू झाल्यास वेगवेगळ्या भाषातली पुस्तके त्याच वेळी अंधाना समजणाऱ्या ब्रेल–लिपीतही प्रसिद्ध करता येणे शक्य होणार आहे. या पद्धतीत चिनी अक्षरे आपोआपच ब्रेल–लिपीत भाषांतरित होण्याची व्यवस्था आहे.

ही पद्धती कॉम्प्युटरमध्ये बसवण्यासाठी सुमारे २४ ते २८ हजार रुपये खर्चाचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे.

## लैंगिक शिक्षणाची प्रश्नावली

ब्रिटिश मेडिकल असोसिएशन लवकरच सोळा वर्षांखालील किशोरांसाठी लैंगिक शिक्षण देणाऱ्या प्रश्नावलीचे एक पुस्तक प्रसिद्ध करणार आहे 'सेक्स फॉर बिगिनर्स' असे या पुस्तिकेचे नाव असून त्यात ७७ प्रश्नाची उत्तरे दिली आहेत

'सेक्स्युअल मेडिसिन' या जर्नलचे संपादक डॉ एरिक ट्रीनर या पुस्तिकेचे संयोजक आहेत. शिक्षक, पालक यानाही ही पुस्तिका मोलाची ठरेल असे ब्रि. मे. असो. ला वाटते. असो.चे सल्लागार संपादक डॉ. ट्रिव्होट वेस्टन यानीही या पुस्तकाच्या निर्मितीत पहिल्यापासून रस घेतला आहे. लैंगिक विषयाच्या सगळ्या बाजू किशोराना समजल्या पाहिजेत आणि त्यातून काय करायचे आणि काय नाही हे त्याना कळू शकेल असा डॉक्टरांचा विश्वास आहे.

लैंगिकसबंधाच्या पद्धतीपासून तो अगदी प्राथमिक स्तरावरचे प्रश्न कसे विचारावेत याची प्रश्नोत्तरे त्यात आहेत. आपल्या मैत्रिणीचे समाधान कसे करावे, अंधारात प्रेम करावे की सौम्य उजेडात, संगीत असावे की नसावे अशा अनेक प्रश्नाची सरळ सोपी उत्तरे डॉक्टरानी दिली आहेत.

## रशियाचा बहिष्कार का ?

पुढील वर्षी लॉसएंजल्स येथे होणाऱ्या ऑलिंपिक सामन्यात सहभागी व्हायचे की नाही याबाबत अद्यापिही सोविएत रशियाने निर्णय घेतलेला नाही. जागतिक सामन्यासाठी होणाऱ्या रशियन शिष्टमंडळाच्या प्रमुखाच्या बोलण्याचा सूर तरी हेच दर्शवतो.

आंतरराष्ट्रीय ऑलिंपिक संघटनेच्या समितीने स्पर्धेसाठी सर्व त्या सोयी-सुविधा पूर्ण केल्याची पाहणी आम्ही पडताळून पाहू आणि मगच सहभागी व्हायचे की नाही याचा निर्णय घेऊ, असे शिष्टमंडळाच्या प्रमुखानी म्हटले आहे 'याचा अर्थ तुम्ही बहिष्कार घालणार काय ?' त्यावर ते म्हणाले, 'रशिया ऑलिंपिक चळवळीशी बांधलेला आहे.'

## पुढचं पाठ–मागचं सपाट

कॅलिफोर्नियातल्या जवळजवळ २००० शिक्षकाना लिहिणं–वाचणं आणि गणितातल्या प्राथमिक गोष्टींचा विसर पडला. कृष्णवर्णीय शिक्षकामध्ये हे प्रमाण जास्त आहे. तिथल्या शालेय शिक्षणाची परिस्थितीही चिंताजनक आहे.

स्टॅनफोर्ड विद्यापीठातल्या कायद्याच्या विद्यार्थ्यांना अजून एबीसी शिकायचे आहे ही परिस्थिती सुधारण्यासाठी कॅलिफोर्निया विद्यापीठाने बेसिक इंग्रजीचे वर्ग सुरू केलेत. तुम्हाला ही गोष्ट खरी वाटत नसेल !

तुम्हाला शाळेत शिकलेले २१ ते ३० चे पाढे धडाधडा म्हणता येतात का ? तुम्हीच विचार करा.

## 'बाबरनामा'

सोळाव्या शतकाच्या पूर्वार्धात भारतामध्ये मोगल साम्राज्याचे तख्त उभे करणारा सम्राट बाबर याच्या पाचव्या जन्मशताब्दीचे हे वर्ष आहे. १४ फेब्रुवारी १४८३ रोजी जहीरुद्दीन मुहम्मद ऊर्फ बाबर याचा जन्म मध्य आशियातील फरगना राज्यात झाला. सुप्रसिद्ध तैमूरलंग या वीरबहाद्दराच्या वंशाच्या सहाव्या पिढीतला बाबर त्याचे वडील या वंशाचे तर आई चेंगीझखानाच्या कुळातली.

वयाच्या बाराव्या वर्षी बाबरचे वडील वारले आणि राज्याचा उत्तराधिकारी म्हणून तो पुढे आला. त्यानंतर मध्य आशियात त्याने सत्ता संपादण्याचा प्रयत्न केला. येथपासून सुरू होते बाबरची रोमहर्षक जीवनकथा. १५२६ साली पानिपतवर झालेल्या पहिल्या युद्धात बाबरने भारतातल्या पराक्रमी वीरांना वैशिष्टयपूर्ण युद्धकौशल्याने पराभूत केले आणि तो इथे स्थिरावला.

जीवनाचे हे सगळे थरारक क्षण बाबरने तुजक ए बाबरी किंवा बाबरनामा या आपल्या आत्मचरित्रात शब्दबद्ध करून ठेवले आहेत. तुर्की भाषेत हे आत्मकथन आहे नामवत इतिहासकारानी त्याचे महत्त्व, मोल मान्य केले आहे. आपल्या यशापयशाबद्दल या मोठ्या वीराने प्रांजळपणे आत्मकथेत लिहिले आहे.

या आत्मकथेत एक गोष्ट ठळकपणे लक्षात येते व तो म्हणजे बाबर हा एक चांगला शायर होता अनेक प्रसंगी बाबराने शेर लिहिले आहेत आणि ऐकवलेही आहेत. तारुण्याच्या धुंदीत त्याने फारसीत शेर लिहिले होते. त्याचा हिंदी अनुवाद

'मेरे समान कोई अधिक
खराब तथा अपमानित नही हुआ है,
कोई माशुक तेरे जैसा निष्ठुर
एवं उपेक्षणीय नही हुआ है ।' □

# श्रीभगवान उवाच

## श्रीभगवान उवाच

कृष्ण म्हणे पंडुकुमरा
बहुत दिवसानी आला आज फेरा
कुठे दडविला होता चेहरा
दिन इतुके ।

दर्शन न झाले, नाही ठाव-ठिकाणा
पुसले मी वृत्त कितिकजणा
सागता न येई परी काही कोणा
खुशाली तुझी ।

म्हटले की पुन्हा अज्ञातवासी
कारणे काही तुम्ही बंधू गेलासी
विचार न अन्य शिवे चित्तासी
तुजवीण माझ्या ।

बरे आज कैसे आगमन झाले
अवचित दारी उभे ठाकले
चिंतेने जरी दिसे ग्रासलेले
रूप तुझे ।

करण्याचा आता पुन्हा लढाई
विचार ना नाही तुझ्या हृदयी
अस्वस्थ का तरी असा उभा राही
सत्वरी सांग ।

युद्धाचे मात्र आता काढू नको नाव
थकलो मी, केली अति धावाधाव
त्यातच तुझा नडला स्वभाव
कुरुक्षेत्री ।

अठरा अध्यायांची सागितली गीता
अवधी थोडा जरी तिथे मला होता
म्हणूनच आले युद्ध जिंकता
तुजला तेव्हा ।

आता परी नाही उरली शक्ती
कुणासाठी तरी कष्टायचे किती
घ्यावी म्हटले जरा आता विश्रांती
प्रासादी शातपणे ।

## श्रीअर्जुन उवाच

सांगतो देवा सारे तुजला
कुठे मी प्रवास केला
काय पाहिले, काय अनुभव आला
सागतो सारे ।

नको परी काही काळजी करू
युद्धाचीही भीती मनी नको धरू
बागेत स्वस्थ गप्पा चल मारू
छायेत वडाच्या ।

अवनीतला एक महाराष्ट्र देश
शूराना येथे स्थान विशेष
संत-महंताचा चाले उद्घोष
सतत येथे ।

त्यातही देवा आळंदी गाव
अवघ्या महाराष्ट्री थोर याचं नाव
भक्तगण येती इथे घेत धाव
प्रतिवर्षी ।

सत थोर इथे होऊन गेला
ज्ञानदेव नावे प्रसिद्धी पावला
भागवतधर्माचा पाया रचिला
महाराष्ट्री याने ।

कुरुक्षेत्री तू जी सांगितली गीता
समरप्रसंगी माझे मन ढळता
कर्मयोगाचा मंत्र दिला होता
मजसी तेव्हा ।

ज्ञानदेवाने तो मायबोलीत
अमृताहुनीही रसाळ शैलीत
गाभा तयाचा हळू फुलवीत
मांडिला जाण ।

बुद्धिमंतांनाही लाविला लळा
तेजाने याचा सूर्य झाकोळला
भक्तजनांचा दाटतसे गळा
कवतिके माउलीच्या ।

ऐसाच दुसरा संत निपजला
तुकोबाराय जन म्हणती त्याला
महाराष्ट्रदेशी बहु गाजला
लेखने अभंगाच्या

काय म्या वर्णावी याची महती
सोन्या-नाण्याची नव्हती कधी प्रीती
वृक्ष-वनचरे सोयरी होती
संकीर्तनी तुकयाच्या ।

अभगाची याच्या शक्ती निराळी
इंद्रायणीमध्ये जरी फेकली
तरंगत जळावरी राहिली
गाथा याची ।

ज्ञानदेवा नेरचिला जो पाया
जणू त्याचा कळस व्हावया
जन्मून सदेह वैकुंठी जावया
अवतार याचा ।

दोन या संताची कर्मभूमी एक
पुणे जिल्ह्यातच पसरली देख
आळंदी व देहू नाही दोन टोकं
भक्तजनांसी ।

आषाढमासी प्रतिवर्षाला
वाजत-गाजत जाती पंढरीला
विठाबाईच्या जणू भेटीला
पालख्या याच्या ।

म्हटले यदा आपणही जावे
सोहळ्यात या सहभागी व्हावे
आनदाच्या डोही तरंगत जावे
काया-मनाने ।

दिंड्या, पताका, मृदुंग नि टाळ
अभगाची धावे मधूनच ओळ
हृदयी उठे भक्तीचा कल्लोळ
सान-थोरांच्या ।

बुक्का कपाळी, तुळशीमाळ गळा
पंढरीच्या वाटेवर चाले हा मेळा
तुळशीवृंदावन घेई हिंदोळा
माथी अनेकांच्या ।

मार्गावरीही दर्शनास दाटी
पालखी येताच होई रेटारेटी
धावे पुढती, पोर मारी कासोटी
माउली कोणी ।

पंधरा दिवसांचा प्रवास हा चाले
राना-वनातून पडती पाउले
नादात अखंडित मन बुडाले
भान न काही ।

उच्च-नीच नाही, नाही रंक किंवा राव
मी-तूपणाचा उरला न भाव
नाही काही मोह, नसे काही हाव
मनी कोणाच्या ।

पाहून हे सारे पडे मज कोडे
कशाच्या आशेने यात्रा ही घडे
धागा कोणता सर्वांना जोडे
प्रवासी या ।

की धुवावया जुने काही पाप
चंद्रभागेमध्ये बुडविण्या ताप
अथवा शांतवण्या ईश्वरी कोप
यत्न हा चाले ।

कशासाठी देवा इतकी धडपड
क्षुधा-तृष्णेचीही शुद्ध नाही धड
दु:ख-यातनाचे न उरले जोखड
घडे कैसे ।

## श्रीभगवान उवाच

जाणिले वत्सा तव अस्वस्थपण
शंकानी कोणत्या ग्रासले मन
थोडक्यात त्याचे निराकरण
करतो येथ ।

जन्म-मरणाचा अगम्य फेरा
यत्न करूनही चुकतो न नरा
काय मिथ्या, मार्ग कोणता खरा
उमगे न काही ।

संसार-सागरी दु:खे अपार
चाचपडे जीव घेण्या आधार
टाकावया सारा चिंतेचा भार
शोध चाले ।

संकट-समयी ना त्याचा उपयोग
भोगावे लागती ज्याचे त्याला भोग
आशेने चालती तरी प्रयोग
आधाराच्या ।

याच कारणे भक्ती सगुण
दिंड्या-पालख्याही आल्या यातून
परंपरेचा धागा पकडून
प्रवाहो चालिला ।

—सतीश कामत

ह्या ना त्या निमित्ताने...

# आंबेडकर पुतळ्याखालचे ' गांधी '

फिरोझ रानडे

मुंबईत काही जागा अशा आहेत की तेथे जाण्याकरता बसकरता वगैरे न थांबता सरळ पायी-पायी जाणे सोयीचे व वेळ-बचतीचे पडते.

आता मंत्रालय ते चर्चगेट वा चर्चगेट ते मंत्रालय हा टप्पा बघा. बसकरता वगैरे न थांबता शेकडो लोकाचे दळण-वळण ह्या दोन ठिकाणात पायी-पायी चालू असते.

श्यामचे त्या दिवशी असेच झाले मत्रालयातले त्याचे काम आटपून तो बाहेर पडला. त्याला काढायची होती ॲटनबरोच्या ' गाधी ' सिनेमाची तिकिटे. आता मंत्रालय ते म्युझियम म्हणा वा रिगल म्हणा हा टप्पा पण मंत्रालय ते चर्चगेटसारखा आहे. पायी पायी जाणेच सोयीचे व वेळ व पैसा बचतीचे पडते. तेव्हा श्याम रिगलच्या दिशेने तडक चालायला लागला.

मंत्रालय ते रिगल तसे फारसे अंतर नाही. सुरुवातीला श्रीमंतांच्या काही रहिवास–इमारती आहेत– मग आहे भले मोठे कुपरेज मैदान, मग रॉयल सायन्स इन्स्टिटयूट, मग म्युझियम की आलेच रिगल !

ह्या कुपरेज-मैदानाच्या टोकाशी डॉ. बाबासाहेब आंबेडकराचा भव्य पुतळा आहे. हा पुतळा भव्य आणि छान असला तरी श्यामला त्याचे कौतुक वाटत नाही. कारण हा पुतळा म्हणजे दिल्लीच्या पार्लमेंट-प्रागणात उभारलेल्या पुतळ्याची सही-सही नक्कल आहे.

पार्लमेंट-प्रांगणातल्या बाबासाहेबांच्या पुतळ्याच्या एका हातात भारतीय सविधानाची भली जाडी प्रत आहे व दुसऱ्या हाताचे पहिले बोट पार्लमेंटची इमारत दर्शवते आहे.

श्यामने त्या पुतळेकाराला ह्याचा अर्थ विचारला होता. पुतळेकार म्हणाला होता, ' ह्यापुढील भारताचे भवितव्य ह्या घटनेच्या पुस्तकावर व ह्या पार्लमेंटमध्ये आहे ' श्यामला ही कल्पना फार आवडली होती. डॉ. बाबासाहेबांनी घटना बनवली असल्यामुळे ती कल्पना योग्य पण वाटली होती.

पण मुंबईला जी प्रतिकृती आहे त्या पुतळ्याच्या हाताचे बोट मात्र कोणा श्रीमंताच्या गगनचुंबी इमारतीकडे आहे. ह्याचा अर्थ दिल्ली जरी भारताचे भवितव्य पार्लमेन्टवर अवलंबून आहे असे म्हणत असली तरी मुंबई मात्र ते श्रीमंतांच्यावर अवलंबून आहे असे म्हणते आहे असा तर होत नाही ?

एवढे सगळे विचार मनात येईपर्यंत श्याम डॉ. आंबेडकरांच्या पुतळ्यापर्यंत पोहोचला होता. आज त्याला तेथे काही वेगळेच दृश्य दिसले.

पुतळ्याखाली काही दहा-पंधरा लोकाचा थवा होता. खाली सतरजीवर कोणी दोघे-चौघे लोक झोपले होते. त्यांच्या मागे एक मोठी कापडी पत्रिका लावली होती.

कोणा एका राष्ट्रीकृत बँकेच्या मागास-वर्गीयांच्या कर्मचाऱ्यांवर बढतीबाबत काही अन्याय झाला होता. जितके टक्का जागा दलिताकरता राखून ठेवल्या पाहिजेत त्यापेक्षा कमी टक्के जागा दिल्या गेल्या होत्या. त्या अन्याय-निवारणाकरता चार कर्मचाऱ्यानी आमरण उपासाचा मार्ग पत्करला होता.

आजकालच्या काळात उपासतापासावर कोणाचा विश्वास नाही. तो गाधीचा मार्ग व तोही काही वेळाच यशस्वी झाला ह्याचे कारण गांधी नसून त्या वेळचे कोमल हृदयाचे इंग्रज सरकार असे म्हणणाऱ्याचा वर्ग भारतात व महाराष्ट्रात फार मोठा आहे. गांधी–उपासाची मराठी नाटका–चित्रपटातून पुष्कळ वेळा रेवडी उडवली गेली आहे.

असे असता डॉ. आंबेडकराच्या चाहत्यानी अगदी त्यांच्याच पुतळ्याचे खाली बसून हा आमरण उपासाचा गाधीमार्ग चोखाळावा ह्याचे श्यामला खूप अप्रूप वाटले. पूर्वी श्यामला ' अप्रूप ' वगैरे वाटत नसे; पण हल्ली स्त्री–लेखिकेंच्या कथा–कादबऱ्या वाचून त्यालाही वेळोवेळी ' अप्रूप ' वाटू लागले होते. ते असो.

' गांधी ' चित्रपटाची तिकिटे काय नंतरही काढता येतील; पण ह्या उपास करणाऱ्या ' गांधी 'ची प्रथम चौकशी करावी असे श्यामच्या मनाने घेतले व तो त्या उपासकाच्या समोर जाऊन बसला.

आता दू. द. वर एकदम विचारतात तसे प्रश्न कसे विचारणार ? म्हणून तुम्ही कोण, आम्ही कोण, कुठले, काय वगैरे गप्पा झाल्या.

अशा बॅकवर्ड–क्लासच्या स्वतंत्र युनियन्स सगळ्या बँकेत आहेत हे कळल्यावर श्यामला खूप आश्चर्य वाटले. कारण जगातले सगळे कामगार एक आहेत, जगात फक्त दोनच जाती आहेत-पिळणाऱ्याची व पिळले जाणाऱ्याची वगैरे गोष्टी त्याने ऐकल्या होत्या. आता ह्या जातीत पण पोटजाती पडू लागल्या आहेत नाही ? श्यामच्या मनात प्रश्न आला.

' पण का हो, आजकाल मोर्चा, घेराव; रोको वगैरे भारी भारी व खात्रीलायक मार्ग मोकळे असता हा उपासाचा जुना–पुराणा व घटीया मार्ग तुम्ही का स्वीकारलात ?'

' त्याच काय आहे ' त्या चार उपासगिरातला एक चुटचुटतीत माणूस पुढे सरसावून म्हणाला, ' ते मार्ग धरायला म्हणजे मोर्चा काढायला, घेराव घालायला, रोको करायला खूप माणसे लागतात. आता आम्ही थोडे पडलो. आता माणसे कमी असतात तेव्हा हा उपासाचा मार्ग उत्तम ! व सोयीचा !'

' पण ह्या उपास-करी मार्गाने तुमच्या मागण्या पुऱ्या होतील ह्यावर तुमचा विश्वास आहे ?'

' आहे तर !' परत तो चुटचुटीत म्हणाला,

'परवा येथेच कोकणातली कोणी दलित शिक्षिका नोकरीबाबत काही अन्याय झाला म्हणून उपासाला बसली होती. सात दिवसांच्या उपासानंतर तिची मागणी मंजूर झाली. तशा आमच्या मागण्याही स्वीकारल्या जातील!' त्याच्या बोलण्यात जबर आत्मविश्वास दिसला.

'सध्या तुम्हाला काही १० टक्के जागा दिल्या आहेत. नियमाप्रमाणे तुम्हाला १५ टक्के मिळाल्या पाहिजेत असेच ना?'

'अगदी बरोबर!' श्यामसारख्याला देखील आपल्या मागण्या झटक्यात समजल्या ह्याचा त्या उपास करणाऱ्याला आनंद वाटला.

'मग ह्या पाच टक्के जागांवर सध्या सवर्ण हिंदु आहेत, असेच ना?'

'अगदी बरोबर! आम्ही म्हणतो त्या पाच टक्के जागा आमच्या लोकांना मिळाल्या पाहिजेत!'

'आणि मॅनेजमेंटचे लोक ऐकत नाहीत व म्हणून तुमचा आमरण उपास असेच ना?'

'अगदी बरोबर!' श्यामबाबत त्याचा आदर खूप वाढला. 'हे मॅनेजमेंटचे लोक म्हणजे...'

तीन-चार दिवस उपास करूनसुद्धा त्यांच्या जिवातला जोर कमी झाला नव्हता.

'हे बघा, ते मॅनेजमेंटचे लोक तर बोलूनचालून तुमचे शत्रूच मुळी; पण तुमचे सवर्ण-सहकारी तुम्हाला ह्या लढ्यात साथ देतात का?'

ह्या प्रश्नाला काय उत्तर द्यावे हे त्या चुटचुटीत माणसाला कळेना. त्याने गुळमुळीत उत्तर दिले, 'हो, तशी त्यांची सहानुभूती आहे.'

पण श्यामला त्याच्या प्रश्नामागची खोच माहीत होती. 'असे गुळमुळीत उत्तर नको. तुम्ही १० टक्क्यांचे १५ मागता म्हणजे सवर्णांच्या ९० च्या ८५ टक्के होणार– म्हणजे तेवढे सवर्ण कर्मचारी कमी होणार. मग ते तुम्हाला साथ तर सोडून द्या; पण सहानुभूती तरी कशी दाखवतील?'

'आता खरं सांगू? त्यांचे पुढारी उघड विरोध तर करू शकत नाहीत; पण आमच्या मागण्यांबाबत विशेष आस्था दाखवत नाहीत.'

'ते सहाजिकच आहे. सगळे कामगार एक म्हटले तरी त्यात त्यांच्या-त्यांच्या स्वार्थाप्रमाणे भेद पडणारच.' तो उपवासी थोडा खजील झाला होता म्हणून श्यामने विषय बदलला.

'हे बघा, महात्माजी नुसता उपवास करत नसत, तर त्याचा मोठा प्रचार वगैरे करून त्याचा सरकारवर दबाव आणत. तुम्ही तसं काही करता आहात का?'

'आम्ही काही वर्तमानपत्रांत दिले आहे. आम्ही पाच-सहा ठिकाणी असे उपवासाला बसलो आहोत. मंत्र्यांना आमचे काही कार्यकर्ते भेटत आहेत. हे मॅनेजमेंटचे लोक नक्की वठणीवर येतील!'

'मॅनेजमेंटचे लोक वठणीवर येतील हे खरे; पण तुमच्या आपल्या लोकांचे काय? सवर्ण सहकाऱ्यांचे काय? त्यांचे मन कसे वळवणार? त्याच्याकरता उपवास करणार?'

'त्यांच्याविरुद्ध काही उपास चालणार नाही. आपल्या लोकांच्याविरुद्ध लढण्याकरता काही उपास-तापास कामाला येत नाहीत.'

तुमचा उपवास यशस्वी होवो. तुमच्या मागण्या पुऱ्या होवोत, अशा शुभेच्छा व्यक्त करून श्याम उठला व रिगलच्या दिशेने चालू लागला.


महात्मा गांधींनी वेगवेगळ्या कारणांकरता ब्रिटिश सरकाराविरुद्ध उपवास केले; पण हिंदुस्थानचे विभाजन होऊ नये म्हणून काही उपवास केला नाही. आपल्या लोकांविरुद्ध उपवासाचे तंत्र कामी येत नाही हे त्यांनाही माहीत असेल, नाही?

एवढे विचार येईपर्यंत श्याम अॅटनबरोच्या 'गांधी'पर्यंत येऊन पोहोचला होता.

□


गांधींच्या सहवासातून शिररला दिसला ख्रिस्ताशी साधर्म्य सांगणारा एक महात्मा...आणि त्या महात्म्यात दडलेला माणूस. त्या महात्म्यालाही या माणूसपणाची जाणीव होती. अनेकदा तसं तो जाहीरपणे बोलूनही दाखवायचा....

**राजहंसचे आगामी प्रकाशन**



# महात्मा आणि माणूस

**लेखक : विल्यम शिरर । स्वैर रूपांतर : निखिल वागळे**

**लवकरच प्रसिद्ध होत आहे!**

राजहंस प्रकाशन, १०२५ सदाशिव पेठ, पुण ३०

# कोडं

● सुधा नरवणे ●



स्त्रीहृदय म्हणजे एक अगम्य कोडं आहे. ज्या जगन्नियंत्यानं या विश्वाची उत्पत्ती केली त्या महाभागाला तरी ते सुटलेलं आहे की नाही कुणास ठाऊक ! ते कोडं सोडवायचा प्रयत्न करताना आम्हा पामरांची तर मती गुंग होऊन जाते–

आता माझंच पहा ना– माझी बायको अॅग्नेस अशी एकाएकी मला सोडून जाईल याची मला कदापिही शंका आली नव्हती. किंबहुना तसं कुणी सुचवलं असतं तर मी त्याला वेडचात काढलं असतं.

मी काही आदर्श नवरा आहे असं नाही; पण तरीही तिनं मला असं एकाएकी न सांगता निघून जाणं तिला शोभलं का? तिला काय हवं होतं हे तिनं मला सांगितलं असतं तर ते दिल्याशिवाय मी राहिलो असतो का? एखादी अशक्यप्राय गोष्ट तिनं मनी धरली असती तर त्यावर मी चर्चा केली असती. त्या प्रश्नाची उलटसुलट बाजू तपासून पाहिली असती. काही तरी तोडगा शोधला असता. एकदम नाही म्हणून टाकणं असला अरेरावीपणा मुळी माझ्या स्वभावात नाहीच !

दोन वर्षांच्या वैवाहिक जीवनात अॅग्नेसनं एकदाही आपल्या असंतोषाची पुसटशी कल्पनाही मला दिली नाही आणि एक दिवस सकाळी आपली चक्क घर सोडून की हो गेली! मी घरात नव्हतो तेवढ्या वेळाचा तिनं फायदा घेतला. एखादी मोलकरीण दुसऱ्या चांगल्या नोकरीसाठी न सांगता-न सवरता काम सोडून जावी तसंच वागणं झालं हिचं–माझ्या बायकोचं ! सरळ उठली आणि चालती झाली !

आता या घटनेला सहा महिने होऊन गेलेत; पण अजून मला तिच्या जाण्याचं कारण उमगलेलं नाही...तिच्या जाण्याचा दिवस मला अजून स्पष्टपणे आठवतोय्.

आमच्या घराच्या जवळच्या मंडईत मी भाजी, मटण आणायला गेलो होतो-रोजच्यासारखा...हो रोजचा बाजार मीच करायचो. मला आवडतं बाजारात जायला. तिथं तऱ्हेतऱ्हेच्या भाज्या पाह्यच्या– दराची चौकशी करायची. घासाघीस करून चांगला सौदा करायचा–हे सारं मला मनापासून आवडतं. मांस, मच्छी, फळं सगळं काही मी रोजच्या रोज ताजं पाहून, नीट पारख करून आणतो. त्या दिवशी नेहमीसारखा बाजार उरकला. पिशव्या घरी आणून टाकल्या आणि मी पुनः बाहेर गेलो. जेवायच्या खोलीतल्या पडद्यांना झालर लावायची होती ती आणायला गेलो. या झालरीसाठी मला मोजकेच पैसे खर्चायचे होते म्हणून दोन–तीन दुकानात किंमतीची चौकशी करणं आवश्यक होतं. जरा हिंडाव लागलं; पण अगदी मनासारखी झालर योग्य किंमतीत मिळाली.

मी घरी परतलो तेव्हा बरोबर अकरा वाजून वीस मिनिटं झाली होती. नव्या झालरीचा रंग आणि पडद्याचा रंग एकमेकांशी ताडून पाहण्यासाठी मी जेवायच्या खोलीत गेलो. तेव्हा लगेच मला टेबलावर ठेवलेली चिठ्ठी, शाईची दौत आणि पेन दिसलं. खरं सांगायचं तर माझं लक्ष प्रथम कशानं वेधलं असेल तर टेबलक्लॉथवर पडलेल्या शाईच्या डागानं...किती धांदरट आहे ही अॅग्नेस...डाग पाडल्याशिवाय लिहिताच येत नाही का हिला?

मी ती दौत उचलली. पेन, ती चिठ्ठी सगळं उचलून दुसरीकडे ठेवलं. टेबलक्लॉथ काढला आणि स्वैपाकघरातल्या बेसिनपाशी नेला. लिंबाची एक फोड घेऊन त्या डागावर चोळली. डाग जवळजवळ घालवला आणि तो टेबलक्लॉथ पुनः टेबलावर अंथरला.

... आणि मगच मला त्या चिठ्ठीची आठवण झाली...चिठ्ठीवर माझंच नाव होतं. ती उघडून मी वाचायला लागलो–

'अल्फ्रेडो, मी घरातलं काम पुरं केलंय्. दुपारचं जेवण तुझं ते बनवून घे–नाही तरी

तुला स्वैपाकाची सवय आहेच. मी आईकडे जातेय् कायमची...गुड्बाय् . ॲग्नेस–'

एक क्षणभर मला काही समजलच नाही. मी पुन: एकदा ती चिठ्ठी वाचली आणि मग माझ्या डोक्यात प्रकाश पडला. ॲग्नेस मला सोडून गेली कायमची . दोन वर्षांच्या वैवाहिक जीवनानंतर ती घर सोडून गेली !

माझ्या नेहमीच्या सवयीनुसार मी ती चिठ्ठी नीट घडी घालून माझ्या टेबलाच्या खणात ठेवली–जिथं मी इतर पत्रव्यवहार आणि चिठ्ठ्या–पावत्या ठेवतो तिथ ती ठेवली.

तसा मी सुन्नच झालो होतो. अशी अकल्पित गोष्ट माझ्या जीवनात घडेल अस मला स्वप्नातसुद्धा वाटलं नव्हतं. बायकोचा आकस्मिक गृहत्याग हा एक मोठा धक्काच होता. माझा त्या चिठ्ठीवर विश्वास बसेना.

हे विचार मनात घोळत असता माझं लक्ष जमिनीवर पडलेल्या एका पिसाकडं गेलं. फर्निचरवरची धूळ झटकायला आमच्याकडे पिसाचा एक ब्रश आहे. त्यातलंच एक पीस निसटून खाली पडल असाव. ॲग्नेस झाड-झूड करताना ते पडलं असणार हे उघडच आहे. मी ते पीस उचललं आणि खिडकी-बाहेर टाकून दिलं. मग मी माझी हॅट घेतली आणि बाहेरच पडलो. घरात बसवेचना मला.

माझी चालण्याची सुद्धा एक ठराविक पद्धत आहे. फूटपाथवरच्या फरशीवरच्या चौकोनात एकाआड एक पाय टाकून मी चालतो. उगीच फतक् फतक् चाललेल मला मुळीच आवडत नाही.

डोक्यात विचार चालूच होते. का बरं ॲग्नेस घरातून निघून गेली असेल? अशा तऱ्हेनं मला न सांगता, काही स्पष्टीकरण न देता बेफिकिरीन सरळ निघून गेली म्हणजे काय? काय हेतू होता तिचा?

आता हा जो प्रश्न मला भंडावून सोडत आहे. त्यातल्या एकेका मुद्द्याची छाननी करायला मी सुरुवात केली. माझा स्वभावच असा आहे कोणताही प्रश्न असो त्याचा एकेक थर उलगडून, पापुद्रा सोलून त्याचं यथायोग्य विश्लेषण करायच– निष्कर्ष काढायचे, अनुमानं काढायची तसंच आत्ता केल. एकेक मुद्दा घेतला आणि त्याची उकल करायला लागलो.

तिला माझ्या चारित्र्याचा संशय आला असेल का? मी बेइमान झालो असं वाटलं असेल का? माझ दुसऱ्या बाईकडे लक्ष गेलय असा मत्सर तिच्या मनात उत्पन्न झाला का?

छे! शक्यच नाही अशा शकेला काडी-इतकी सुद्धा जागा मिळावी अस काहीच माझ्या हातून झालेलं नाही मी बायकाच्या माग लागणाऱ्या प्राण्यांपैकी नाही. खर तर बायकाचे स्वभाव मला कळत नाहीत आणि बायकाना माझा स्वभाव कळत नसावा. एकदा लग्न झाल्यावर तर काय माझ्या लेखी ॲग्नेसशिवाय कुणी स्त्री अस्तित्वातच राहिली नाही मी सर्वच स्त्रियांकडे पाठ फिरवली. कधीकधी ॲग्नेस मला दुसऱ्या स्त्रीवरून चिडवायला लागली की, मला रागच यायचा. ती पुष्कळदा विचारायची, 'तुझं दुसऱ्या स्त्रीवर प्रेम बसलं तर तू काय करशील?'

मी म्हणायचो, 'शक्यच नाही ते– माझं तुझ्यावर मनापासून प्रेम आहे आणि ते आमरण टिकेल!'

आता आठवतय की, मी माझ्या प्रेमाची अशी ग्वाही दिल्यावर ती खूष व्हायच्या-ऐवजी तिचा चेहरा पडला होता. माझं हे निःशंक आश्वासन ऐकून ती एकदम गप्प झाली होती.

दुसरा मुद्दा– तिनं मला पैशाच्या कारणा-वरून सोडलं असेल का? छे: हे तर अगदीच अशक्य. तिच्यासाठी मी पैशाची पिशवी नेहमीच सैल सोडली होती. तिला हवं ते सर्व मी आणून देत होतो. हे मात्र खर की, मी तिला हातखर्चाला स्वतंत्र असे पैसे देत नव्हतो; पण तिला पैसे हवे तरी कशाला होते? ती अन् मी सतत एकत्र बाहेर जात असू. केव्हाही, कुठही, काहीही खर्च करायला मी तत्पर होतो.

मी तिला वाईट वागणूक दिली का? माझा शत्रु सुद्धा माझ्यावर हा आरोप करणार नाही मी तिच्याकडे मुळीच दुर्लक्ष केल नाही. तिची सर्वतोपरी काळजी घेतली. आठवड्यातून दोनदा आम्ही सिनेमाला जात असू. दोनदा बाहेर जेवण किंवा सटरफटर खाणं. महिन्याच्या महिन्याला मनोरंजक मासिकं घरात येत होती. रोजच वर्तमानपत्र घरात येत होतं हे सांगायला नकोच. थंडीच्या दिवसात बाहेर फारसं हिंडणंफिरण जमायच नाही म्हणून आम्ही वरचेवर ऑपेराला जात असू उन्हाळ्याच्या दिवसात निसर्गरम्य ठिकाणी किंवा माझ्या वडिलांच्या घरी आम्ही जात असू.

आणि कपड्याबद्दल म्हणाल तर ॲग्नेसला तक्रार करायला मुळीच जागा नव्हती. तिच्याजवळ तऱ्हेतऱ्हेचे पोषाख भरपूर होते. फ्रॉक, गाऊन, स्कार्फ, अतर्वस्त्र, रुमाल कशाचीही तिला गरज पडली तर मी नेहमीच खरेदीला तयार असे. मी कधी दुकानात जायचा कंटाळा केला नाही. दुकानात कितीही कापडं, पोषाख बघावेसे वाटले तरी रागावलो नाही. तिला पोषाखाची निवड करताना मदत करायला मी उत्सुक असे. जे काय बिल येईल ते मी विनातक्रार देत असे. तिनं एखाद्या वस्तूची इच्छा व्यक्त केली अन् ती पुरी करायला मी सरसावलो नाही असा एकही प्रसंग नव्हता.

एक मात्र मी कबूल करतो की, ॲग्नेसला फारशी कशाची हौस नव्हती. वस्तूची हाव नव्हती. लग्नाच्या पहिल्या वर्षानंतर तर तिन एकही पोषाख स्वतःसाठी शिवला नाही. कधीकधी मीच आठवण करून देत असे, 'अग, तुला नवा ड्रेस करायला झालाय् किंवा बूट घ्यायला झालेत.'

कधीकधी मीच आग्रह करीत असे, 'घे की तुला नवा ब्रूच. नाही तर ही माळ–' पण ती आपलो नको नकोच म्हणायची. इतर नटव्या बायकापेक्षा ती खचितच वेगळी होती छानछोकीचा वाराही तिला लागला नव्हता.

एखादं लग्न मोडलं की लोक म्हणतात स्वभाव जुळले नसतील. घटस्फोटाचे खटले चालवणारे वकील तर हमखास हे कारण देतात की, स्वभावातला फरक–विजोडपणा इत्यादि; पण आमचे स्वभाव जुळले नव्हते असं म्हणताच येणार नाही. दोन वर्षांत एकदाही आमच भांडण झाल नाही की तंटा नाही. आवाज उचावून वादविवाद झाले नाहीत. ॲग्नेसनं मला कधी विरोध केला नाही. तशी ती मितभाषीच होती अबोल म्हटलं तरी चालेल. आम्ही जेव्हा बाहेर कॅफेमध्ये चहापाणी घेत बसायचो किंवा घरात काही करत बसायचो तेव्हा ती फारशी बोललेली मला आठवत नाही. बोलण्याचं काम नेहमी माझ्याकडे असायचं. मला

स्वत.ला बोलायला फार आवडतं स्वत:चा आवाज ऐकण्यात मला विशेष आनंद होतो शिवाय अॅग्नेससारखं अगदी जिव्हाळ्याचं माणूस जवळ असलं म्हणजे माझ्या वाणीला फार जोर येतो; पण माझं बोलणं नेहमीच साधंसुधं, दुसऱ्याला न दुखवणारं असं असतं. मोठ्या गहन तात्त्विक विषयावर मी कधी बोलत नाही. विषय आपले साधेसुधेच असतात. मात्र माझी सवय आहे विषयाची अथपासून इतिपर्यंत चिकित्सा करण्याची माळेतला एकेक मणी अलग करावा तसा एकेक मुद्दा घेऊन मी त्याचं खंडनमंडन करतो. विषय आपले हेच फर्निचरची मांडणी, स्वैपाकातले पदार्थ, बागेतली फुलं-पानं, नवा सिनेमा, जुना सिनेमा, फॅशन्स् या विषयात मी इतका रंगून जातो की, विचारता सोय नाही.

अॅग्नेस माझं बोलणं लक्षपूर्वक ऐकायची, निदान मला तसं वाटायचं तरी—एकदा मी तिला पाणी तापवायचा हीटर कसा चालतो हे समजावून सांगत होतो. मध्येच माझ्या लक्षात आलं की ती पेंगतेय्. शरमून मी तिला विचारलं, 'का ग ? कंटाळलीस का ?' तिनं गडबडीनं डोळे उघडले. ओशाळल्यासारखी दिसली. म्हणाली, 'नाही रे—काल रात्री नीट झोप लागली नव्हती ना—म्हणून जरा डोळा लागला !—'

बहुतेक सगळेच नवरे ऑफिसात जातात, दुकान चालवतात, प्रत्येकालाच पोटापाण्याचा काही व्यवसाय असतो. आपलं काम उरकलं की कितीकजण मित्रांबरोबर भटकण्यात वेळ घालवून बायकोकडं दुर्लक्ष करतात.

माझ्या बाबतीत तेही नव्हतं. माझ्या बापजाद्यांनी भरपूर पैसा कमवून ठेवला होता. वडील मला दर महिन्याला ठराविक रक्कम देत. त्यामुळं मला पोटासाठी बाहेर पडावं लागत नव्हतं. माझं ऑफिस, माझा उद्योग, व्यवसाय, सखेसोयरे सगळं काही अॅग्नेसमध्ये एकवटलं होतं मी सारखा तिच्याबरोबर रहात असे. तिला कधी एकटं सोडलं नाही. ती स्वैपाक करताना मी तिला मदत करायचो. कुठल्या कामाला कधी नाही म्हटलं नाही. बटाटे सोलणं असू दे की शेंगा निवडणं असू दे माझा हात पुढं व्हायचा. पॅटिसमधलं सारण मीच करीत होतो. चुलीवर काही शिजत असलं तर ते करपू नये, ऊतू जाऊ नये म्हणून मी तिथ्थं बसून रहात होतो. मी अॅग्नेसला स्वैपाकात इतकी पुरेपूर मदत करायचो की ती अनेकदा म्हणायची, 'बरं, आता पुढचं तूच कर माझं डोकं दुखतंय—'

पाकक्रियेवरच्या पुस्तकातून मी नवेनवे पदार्थ करायला शिकलो होतो. अॅग्नेसला खाण्याचीही फारशी आवड नव्हती. अलीकडे तिची भूकही मंदावली होती.

एकदा ती मला म्हणाली, म्हणजे गमतीनं बरं का 'तू पुरुषाच्या जन्माला आलास हे चुकलंच खरं तर बाईच्या जन्माला यायचंस. छान गृहिणी झाला असतास '—

हे अगदी शंभर टक्के खरंय. सैपाकाच्या बरोबरीनं मला घरातली इतरही कामं तितक्याच कुशलतेनं करता येतात. शिवणकाम, इस्त्री, रफू करणं, हातरुमालांना हेम घालणं. मला काही येत नाही असं नाहीच—

मी अॅग्नेसला एक क्षणही एकटेपणा वाटू दिला नाही सदैव तिला सोबत केली. तिची कुणी मैत्रिण किंवा आई आली की, मी तिच्यासमवेत संभाषणात भाग घेत असे. एकदा तिनं डोक्यात घेतलं इंग्रजी भाषा शिकण्याचं. मी तिला क्लासमध्ये जाता-येता सोबत करायला लागलो शेवटी मीही क्लासमध्ये नाव घालून टाकलं आणि अॅग्नेसनं मात्र क्लास अर्धवट सोडून दिला. आहे की नाही ?

कधीकधी ती मला म्हणायची, 'हे बघ, त्या अमुक ठिकाणी मी जातेय तिथं तुला इंटरेस्ट वाटेल असं काही नाही. तुझ्या ओळखीची माणसंही नाहीत तो. तेव्हा तू नाही आलास माझ्याबरोबर तरी चालेल.' मी म्हणायचो, 'त्यात काय मोठंसं. नसलं कुणी ओळखीचं म्हणून काय झालं ? ओळख करून घेईन. एवीतेवी दुसरं काही काम नाहीच आहे मला. येतो मी तुझ्याबरोबर '—

'नाही. पण तुला कंटाळा येईल.' तरी मी तिच्याबरोबर जायचो आणि परत आल्यावर उत्साहानं म्हणायचो, 'बघ मुळीच नाही कंटाळा आला मला, छान वेळ गेला '—

सारा वेळ या गोष्टी माझ्या मनात येत होत्या. दोन वर्षांच्या वैवाहिक जीवनाचा पट पुन्हा पुन्हा डोळ्यांपुढं उलगडत होता आणि पुन.पुन नवल वाटत होतं की, का गेली ती मला सोडून ?'

या प्रश्नाच्या तिरिमिरीत मी माझ्या वडिलांकडे गेलो. त्यांचं दुकान आहे मूल्यवान जुन्या वस्तू विकण्याचं

मी गेलो तेव्हा ते नेहमीप्रमाणे हिशोबाच्या वह्यात डोकं घालून बसले होते. काही प्रास्ताविक न बोलता मी एका धडाक्यात त्यांना सांगून टाकलं, 'पपा, अॅग्नेस मला सोडून गेली !'

त्यांनी माझ्याकडं पाहिलं. क्षणमात्र मनात शंका तरळून गेली की, ते मिस्किलपणे हसताहेत. आश्चर्याचा धक्का तर त्यांना नाहीच बसला, पण सौम्य नवलही वाटलं नाही. का ? कदाचित माझं हे वाटणं चुकीचं असेल.

ते मनापासून म्हणाले, 'अरेरे ! वाईट झालं; पण अशी कशी गेली ती तुला सोडून ?'

मी माझी सारी कहाणी त्यांना विस्तारानं सांगितली. काही आडपडदा ठेवला नाही. सगळं स्पष्टपणे सांगितलं. गुळमुळीतपणा माझ्या स्वभावात मुळी नाहीच—

म्हटलं, 'ती सोडून गेली याचं दुःख मला झालंच आहे; पण का ? का ? ते कारण कळण्याची माझी जास्त इच्छा आहे...' ...विचारमग्नतेतून बाहेर येऊन त्यांनी विचारलं, 'तुझ्या नाही का लक्षात आलं ?'

'नाही बुवा ...'

माझ्या या उत्तरावर ते थोडा वेळ गप्प बसले. मग अलिप्तपणे म्हणाले, 'अल्फ्रेडो, झालं ते वाईटच झालं, तू माझा मुलगा आहेस. तुझं चागलं व्हावं असंच मला नेहमी वाटतं. मी तुझा योगक्षेम आनंदानं चालवतोय. तू माझा लाडका आहेस; पण तू आणि तुझी बायको—तुमचे संबंध—हा माझा प्रांत नाही '—

'ते खरं सगळं; पण का गेली ती मला सोडून ? कारण सांगा, शोधून काढा '—

पप्पांनी हताशपणे मान हलवली. 'मी तुझ्या जागी असतो ना, तर या प्रकारात जास्त खोलात शिरलो नसतो. जाऊ दे ती गेली तर, सोडून दे हे प्रकरण इथंच. कारण कळून तरी काय करायचंय तुला ? स्त्रीहृदय म्हणजे अनाकलनीय कोडं आहे.

भल्याभल्यांना ते सुटलेलं नाही '–

'पण मला कारण कळलंच पाहिजे. माझ्या दृष्टीनं ते फार महत्त्वाचं आहे. मी केलं तरी काय तिला ?'–

–एवढ्यात पप्पांच्या दुकानात एक गिऱ्हाईक आलं आणि आमचं संभाषण तेवढ्यावरच राहिलं.

त्यांच्या दुकानातून मी बाहेर पडलो तेव्हा डोक्यातला विचारांचा गुंता अधिकच वाढला होता.

ॲग्नेसचं माहेर येथून जवळच होतं. मी तिकडं जायचं ठरवलं. तिच्या आईला भेटायचं आणि मला छळणाऱ्या या प्रश्नाचं उत्तर मागायचं. आता कुणी हे कोडं उकलू शकेल तर तिची आईच ! ––

मी त्यांच्या घरात गेलो तर ॲग्नेसचा कुठं मागमूस दिसेना. तिची आईच पुढं आली आणि मोठ्या कृत्रिमपणानं तिनं म्हटलं, 'अगबाई, अल्फ्रेडो, तू इथं कसा ?...'

मोठ्या प्रयासानं रागाची उकळी दाबून मी म्हटलं, 'कसा म्हणजे काय ? वेगळं सांगायला पाहिजे काय ? ॲग्नेस माझं घर सोडून गेली हे काय तुम्हाला माहीत नाही?'

'हो...माहीत आहे की ! आता त्याबद्दल मी काय करू ? हातं असं कधीकधी...'

'एवढंच म्हणायचंय् तुम्हाला यावर...?'

माझ्या या प्रश्नावर तिची आई थोडी घुटमळली आणि मग विचारायला लागली, तुझ्या आईवडिलांना सांगितलंस् का हे ..? '

मला आणखीनच राग आला. यांना काय पंचाईत आहे या गोष्टींची ? माझ्या आईवडिलांना सांगितलं का नाही याची उचापत ह्यांना कशाला ? मोठ्या अनिच्छेनंच मी उत्तर दिलं, 'हो...मी सांगितलं पपांना...'

'मग काय म्हणाले ते ?'

'ते ... ते ना ? ते तसं काही विशेष म्हणाले नाहीत – म्हणाले, तू माझा आवडता आहेस ..पण ... तुझी बायको हा तुझा प्रश्न. ... आणि हो ... म्हणाले, जास्त खोलात शिरू नकोस ... ...'

हो ... अगदी बरोबर आहे त्यांचं ... ' करायचं काय जास्त खोलात शिरून ... ... तिला तुझं घर सोडावंसं वाटलं ... तिनं ते सोडलं ... बस् ... खतम् मामला ... ...'

'पण का ? का ? ... ... मी ओरडून विचारायला लागलो ... आता माझा क्रोध अनावर झाला. मी बडबडायला लागलो... 'काय केलं मी तिला ? छळलं ? का मारलं? का डागलं ? ... सांगा ना सांगा ... का नाही सांगत ? ... ... '

एवढा माझा राग पराकोटीला पोचला होता तरी माझं लक्ष त्या खोलीतल्या टीपॉयवर गेलं. त्यावर अंथरलेला जाळीचा टेबलक्लॉथ वाकडा अंथरला होता. त्यावर ठेवलेली फुलदाणी पण अस्ताव्यस्त दिसत होती ... ...

रागात होतो तरी आपोआपच सवयीनुसार माझे हात त्या टीपॉयकडे गेले. मी ती फुलदाणी उचलली ... टेबलक्लॉथ नीट झटकून अंथरला...फुलदाणी नीट अगदी मधोमध ठेवली ... माझ्या हालचाली पाहून ॲग्नेसच्या आईला हसू फुटलेलं दिसलं...मला म्हणाली, 'छान ! छान ! किती व्यवस्थित आणि टापटिपीचा आहेस रे तू ... पण आता गेलास तरी चालेल ... '

एवढं बोलून ती उठलीच. त्यामुळं मलाही उठावं लागलं. वास्तविक मला ॲग्नेसला भेटायचं होतं; पण ही बया आमची भेट घडू देणार नाही हे स्वच्छ दिसत होतं ... ...

तिथून मी निराश मनानं बाहेर पडलो. त्या दिवसापासून आजतागायत माझी न् माझ्या बायकोची भेट झालेली नाही.


मला आशा आहे की, ती एक दिवस माझ्या घरी येईल. कारण माझ्यासारखे सरळमार्गी अन् सत्प्रवृत्त नवरे पावलोपावली भेटत नसतात !

ती परत आली ना की, बघतच रहा तुम्ही ... प्रथम मी तिला विचारणार आहे का घर सोडून गेलीस त्याचं कारण सांग ! पहिल्यांदा कारण सांग मगच घरात घेईन !

का ? का ?... तिनं उत्तर दिल्याशिवाय पाऊल नाही टाकू देणार आत तिला... □

(इटालियन लेखक, अल्बेर्टो मोराव्हिया यांच्या कथेचे स्वैर रूपांतर)





# दि इस्लामिक बॉंब

लेखक : स्टीव्ह वेसमन
हर्बर्ट क्रोस्ने

रूपांतर : मो. ग. तपस्वी, दिल्ली

लेखांक : पहिला

## मुलतान येथील गुप्त बैठक....खलीद हसन

पाकिस्तान मोडण्याच्या बेतास आलेले होते. २५ मार्च १९७१ ची मध्यरात्र. काही महिन्यांपूर्वीच पाकिस्तानच्या सशस्त्र फौजा फुटून वेगळ्या होऊ चाहणाऱ्या तेव्हाच्या पूर्वपाकिस्तानातील बंगाल्यांचा निःपात करण्यासाठी अत्यंत निर्घृणपणे पाशवी उच्छाद मांडीत तेथे घुसल्या होत्या. त्या फौजात मुख्यत्वेकरून पश्चिम पाकिस्तानातील लोकांचाच भरणा होता. त्यांनी खेडोपाडी विध्वंस आणि नरसंहाराचे भीषण कांडच चालवले होते. असंख्य बंगाली खेडी त्यांनी बेचिराख करून टाकली होती. बंगाली बायकांवर पाशवी बलात्कार केले होते आणि निःशस्त्र व असहाय बंगाली पुरुषांची अक्षरशः लांडगेतोड केली होती. याबरोबरच त्यांनी अगदी पद्धतशीरपणे मोजून अनेक बंगाली बुद्धिजीवी, विद्यार्थी आणि राजकीय पुढारी यांना अटकेत घेऊन 'सफाई मोहीम' सुरू केली होती. या मोहिमेला सफाई मोहीम हे नाव पाकिस्तानी लष्करशहांनीच दिले होते. या सर्व अटक केलेल्यांचे अखेरीस ते शिरकाण करणार होते. त्यांनी अशाच शिरकाणासाठी अवामी लीग या बंगाली राजकीय पक्षाचे नेते शेख मुजीब-उर-रहमान यांनाही अटक केलेली होती. पाकिस्तानात झालेल्या पहिल्या-वहिल्या मुक्त निवडणुकी मुजीबने जिंकलेल्या होत्या ना, म्हणून !

'वीस लक्ष लोकांची कत्तल करावी लागली तरी बेहत्तर; पण फुटून निघू पाहणाऱ्या या पूर्वपाकिस्तानातील बंगाल्यांचा सफाया करून तो भाग यथार्थाने पाक करण्याचा आमचा निर्धारच आहे !' एका तरुण पाकिस्तानी लष्करी अधिकाऱ्याने एका पाकिस्तानी वार्ताहराला स्पष्टच सांगितले होते. तो म्हणाला होता की, 'काय वाटेल ते होवो, आम्ही आमचा हा निर्धार तडीस नेणारच ! भलेही

' इस्रायल आणि दक्षिण आफ्रिका यांच्यापाशी अण्वस्त्रक्षमता आहे हे आम्हाला माहीत आहे. ख्रिश्चन, ज्यू आणि हिंदू समाजापाशीही ही क्षमता आहे. कम्युनिस्ट जगतातही ती आहे फक्त इस्लामी दुनियेतच ती नाही; पण ही परिस्थितीही अगदी लवकरच बदलणार आहे. '

–झुल्फिकारअली भुत्तो
पाकिस्तानचे माजी पंतप्रधान (१९७९)

त्यानंतर तीन दशके या प्रांतावर एक वसाहत म्हणून आम्हाला हुकूमत गाजवावी लागो !' हा भयंकर नरसंहार आणि रक्तपात हे पाकिस्तानी लष्करशहाचे मुजीबने निवडणुकीत मिळवलेल्या विजयाला उत्तर होते.

मुजीब आणि त्याचे सहकारी याच्यात लेखी हा आता त्यांच्या जीवन–मरणाचा प्रश्न बनला होता. त्यानी पूर्वपाकिस्तान स्वतंत्र झाल्याची घोषणा केली. भयंकर गनिमी युद्ध झाले. आपल्या प्रांतातील बिगरबंगाली लोकावर त्यानी तितकेच भयंकर प्रतिहल्ले चढवले तशातच पूर आणि दुष्काळ याची भर पडून सर्वत्र हाहा.-कार माजला. परिस्थिती हातची जाते की काय अशी अवस्था झाली. त्यांनी भारताला मदतीची हाक दिली.

भारताने त्या हाकेला ' ओ ' दिली.

बंगाली निर्वासिताचे लोंढेच्या लोंढे भारतात आलेले होते. भारताची अर्थव्यवस्था त्यामुळे भयकर ताण सोशीत होती. १९६५ चे पाकिस्तानशी झालेले युद्ध अद्याप फार मागे गेलेले नव्हते दीर्घद्वेषी पाकिस्तानला धडा शिकवण्याची ही संधी भारताने घेतली. पूर्व आणि पश्चिम पाकिस्तानातील फौजावर त्यांनी दुहेरी चढाई केली. वास्तविक भारताच्या विशाल माणूसबळापुढे आणि प्रचंड युद्धसामर्थ्यापुढे पाकिस्तानचा काय पाड ! महिन्याभराच्या आतच १६ डिसेंबर रोजी पूर्वबंगालची राजधानी ढाका रेसकोर्सवर पाकिस्तानी फौजानी निमूटपणे भारतीयांसमोर शरणागती पत्करली !

पाकिस्तानचा याहून जास्त नि:पात असूच शकला नसता !

सुप्रसिद्ध ब्रिटिश इतिहासकार ट्रेव्हररोपर यानी लिहिले आहे– ' डिसेंबर १९७१ मध्ये पाकिस्तानचे तुकडे झाले, त्याचा पराभव झाला, त्याचे मनोधैर्य खचले आणि साऱ्या जगात त्याची दारुण नाचक्की झाली! '

स्वतंत्र बांगलादेशचे पहिले पंतप्रधान ताजुद्दीन अहमद यानी जाहीर केले, ' पाकिस्तान मेले आहे आणि प्रेताच्या पर्वताखाली खोल गाडले गेले आहे ! '

पाकिस्तानचा पूर्वभाग त्याने गमावला होता. ६० टक्के लोकसंख्या हातची घालवली होती. जे बाकिस्तान उरले होते ते तरी एकसंध राहील का ? की त्याचे इतर प्रांतही–विशेषेकरून बलूच आणि पठाण लोक–फुटून वेगळी राष्ट्रे बनतील ? हा प्रश्न आ वासून उभा होता.

पूर्वीच्या पूर्वपाकिस्तानची जागा आता स्वतंत्र बांगलादेशने घेतली होती आणि ते भारताचे अशील–राष्ट्र झालेले होते. शिवाय पूर्वेकडे भारताच्या ताब्यात ९०,००० हून जास्त पाकिस्तानी युद्धकैदी आणि पश्चिमेकडे ५,००० चौरस मैल पाकिस्तानी टापू होता. पाकिस्तान कायमचे पंगू आणि भारत दक्षिण आशियाई उपमहाद्वीपाचा निर्विवाद स्वामी झाल्यासारखे वाटत होते

रणांगणावर नामुष्की पत्करावी लागल्याने पाकिस्तानच्या लष्करशहाना निमूटपणे आपापल्या बराकीत परतून, बाकिस्तानास तरी एकसंध राखण्याची ज्याला थोडी–फार आशा आहे अशा मुलकी राजकीय नेत्याच्या हाती सत्तेची सूत्रे देण्याखेरीज गत्यंतरच नव्हते. हा इसम होता पाकिस्तान पीपल्स पार्टीचा नेता, सर्वोत्तम राजकीय मोहिमा चालवणारा पुढारी आणि अतिशय मोहिनी घालणाऱ्या व्यक्तिमत्त्वाचा अहमन्य झुल्फिकार अली भुत्तो !

नीटनेटका पोषाख, भपकेबाज वागणूक, उर्मटपणा आणि अमोघ वक्तृत्व अशा व्यक्तिमत्त्वाचे भुत्तो हे अतिशय महत्त्वाकांक्षी नेते होते. सहाजिकच जागतिक व्यासपीठावर आणि खुद्द पाकिस्तानातसुद्धा भुत्तो याच्याभोवती एक प्रकारचे आकर्षक वलय निर्माण झाले. अमेरिकेच्या राष्ट्रपतीचे राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार हेन्री किसिंजर यांनी बांगलादेशच्या पेचप्रसंगाच्या काळात भुत्तो याच्याशी निकट संपर्क राखून काम केले होते. किसिंजर याना भुत्तो हे अत्यंत हुषार, लोभस आणि जागतिक जाण असलेले नेते असल्याचे आढळून आले होते. प्राध्यापक ट्रेव्हर-रोपर, भुत्तो याना ते ऑक्सफर्ड विद्यापीठात विद्यार्थी असतानापासूनच जाणत. नंतर पाकिस्तानचे पंतप्रधान म्हणूनही त्याना जाणून घेण्याची संधी प्राध्यापकमहाशयाना मिळालली होती. त्याच्या मते भुत्तो हे ' आशियातील सर्वात जास्त क्षमता असलेले नेते होते. अपवाद असलाच तर चीनच्या चौ–एन–लाय याचाच असू शकत होता. ' पण इतराच्या लेखी भुत्तो हे लोकभावना उद्दीपित करून राजकारण करणारे एक चळवळे नेते, दिमाख मिरवणारे, पराकाष्ठेचे संधिसाधू आणि जुलमी नेते होते.

स्वतः भुत्तो यांना मात्र आपण राष्ट्राचे भाग्यविधाते पंतप्रधान आहोत, भारतावर एक इस्लामी राष्ट्र या नात्याने सत्ता गाजवणाऱ्या मोगल बादशहाचे वंशज आहोत असेच वाटायचे. स्वत.ला आणि आपल्या दुर्दैवी आणि दरिद्री राष्ट्राला समस्त तृतीय जगताच्या शिखरावर नेऊन पोहोचवण्याच्या दुर्दम्य महत्त्वाकांक्षेने पछाडलेला भुत्तो हा त्याच्या लोकांचा लाडका नेता होता.

१९७७ मध्ये भुत्तो याचे सरसेनापती जनरल मोहंमद झिया–उल–हक यांनीच अखेरीस त्यांचा पाडाव करून लष्करी–क्रांतीने सत्ता हाती घेतली आणि भुत्तो याना तुरुंगात टाकले. तेव्हा त्यानी

तुरुंगातून लिहिले होते– 'एक राष्ट्र निर्माण करण्यासाठीच माझा जन्म आहे. सर्वनाशाचे भयानक संकट चारीकडून कोंदून येत असताना त्याच्यावर मात करण्याकरिता लोकांची सेवा करण्यासाठी माझा जन्म आहे. काळ-कोठडीत झिजून सपून जाण्यासाठी मी जन्माला आलेलो नाही. एका कृतघ्न आणि विश्वासघातकी माणसाची सूड-पिपासा शमविण्यासाठी, फासावर चढण्यासाठी माझा जन्म झालेला नाही. जंगली आणि खुनशी टोळक्यांनी माझा पाणउतारा करावा आणि मला अपमानित करावे यासाठी मी जन्माला आलेलो नाही. माझ्या समाजाचा उद्धार करावा आणि एक स्वाभिमानी जिण्याचे भाग्य त्यांना बहाल करून त्याचा गौरव करावा म्हणून माझा जन्म आहे!'

भुत्तो यांची स्वत:बद्दल अशी अभिजात भावना होण्याला अनेक घटना कारणीभूत झाल्या होत्या. जातिवंत घराण्यात एका फार मोठ्या जमीनदाराच्या घरी सिंध प्रांतात त्यांचा जन्म झाला. त्यांचे वडील ब्रिटिशांचे सेवक होते. त्याबद्दल त्यांना 'नाइट' ही पदवीही मिळाली होती ब्रर्कलेचे कॅलिफोर्निया विद्यापीठ आणि ऑक्स्फर्ड क्राइस्ट चर्च यासारख्या पाश्चात्य जगतातील उत्तमोत्तम शिक्षण-संस्थांमधून त्यांचे शिक्षण झाले होते त्यांची भरभराटही चकित करणारी होती.

१९५८ मध्ये, वयाच्या अवघ्या तिसाव्या वर्षी फील्डमार्शल मोहंमद अयूबखान यांच्या लष्करी सरकारात त्यांना मंत्री म्हणून घेण्यात आले. पाचच वर्षांत ते परराष्ट्रमंत्री झाले आणि १९६६ मध्ये, भारताशी झालेल्या युद्धानंतर जो ताश्कंद-करार झाला तो भारतापुढे हात टेकल्याचे द्योतक आहे असे मानून त्यांनी सरकारचा राजीनामा दिला आणि समाजवादी विपक्ष स्थापन केला हाच पक्ष पुढे पाकिस्तान पीपल्स पार्टी बनला. पाकिस्तानातील तो पहिला विशाल लोकपक्ष ठरला. १९६८ मध्ये याच पक्षाच्या वतीने आयूब-खान यांच्या विरुद्ध जन-आंदोलन चालवल्याबद्दल भुत्तो यांना तुरुंगात डाबण्यात आले.

हा कारावास हे भुत्तोसाठी राजकीय हौतात्म्यच ठरले आणि त्याचा त्यांनी पुरेपूर लाभ उठवला. त्यांनी चालवलेल्या आंदोलनाचा एक परिणाम म्हणून पाकिस्तानात एक नवी लष्करशाही अधिकारा-वर आली. अतिशय कठोर वास्तववादी सेनापती जनरल याह्याखान तिचे प्रमुख होते. याच वास्तवाच्या जाणिवेमुळे याह्याखानांनी डिसेंबर १९७० मध्ये पाकिस्तानात निवडणुका घेतल्या. भुत्तो आणि त्यांची पीपल्स पार्टी यांनी पश्चिम पाकिस्तानातल्या सर्व जागा जिंकल्या. मुजीब-उर-रहमान यांनी पूर्वपाकिस्तानात मिळवलेले यश अर्थातच भुत्तो यांच्या यशापेक्षा अधिक भक्कम होते; पण शेख मुजीब 'वाचीवीर' आहेत असे भुत्तो नेहमी म्हणत असत. अखेरीस भुत्तो आणि मुजीब यांना परस्पर सहकार्याने काम करण्याचा कोण-ताही मार्ग सापडला नाही असे दिसताच जनरल याह्याखानाने प्रदीर्घ काळ छळ सोशीत आलेल्या बंगाली लोकांवर दडपशाही, जुलूम आणि दहशतीचे साम्राज्य पसरविले.

भुत्तो यांच्या जागी एखादा तितका जातिवंत नसलेला किंवा वेचक संवेदनशीलतेचा कुणी दुसरा माणूस असता तर बंगालमध्ये चालू असलेल्या भयानक रक्तपातामुळे, एरव्ही अतिशय उमेदीची ठरू शकणारी राजकीय कारकीर्द समोर दिसत असतानाही तिच्या-पासून, थोडा काळ तरी, विचलित झाला असता; पण भुत्तो सेना-पतीच्या पाठीशी उभे राहिले बंगाली लोकांनी स्वायत्ततेची जी मागणी केली होती तिला तत्त्व म्हणून त्यांनी विरोध करायला सुरुवात केली. या मागणीच्या बुडाशी देशाच्या ऐक्याला धोका आहे असे ते सांगू लागले आणि देशाची सूत्रे आपल्या हाती येण्याची शक्यता आहे, तिच्यावर एक डोळा नेहमीच ठेवून त्यांनी जनरल याह्या-खानाशी एकनिष्ठ राहण्याचा निश्चय केला. नरसंहार सुरू झाला त्या सकाळीच भुत्तो यांनी जाहीर केले, 'पाकिस्तान बचावले आहे!'

पाकिस्तानच्या लष्कराने हा जो रानटी नरसंहार चालवला होता त्याचे समर्थन करण्यासाठी संयुक्त राष्ट्रांतील विविध चर्चां-मधून भुत्तो यांनी आपले वक्तृत्व खर्ची घातले आणि अखेरीस *बंगाल्यांची सरसहा कत्तल करीत असलेल्या सरकारात उपपंतप्रधानाचे* पद कृतज्ञतापूर्वक स्वीकारले. डिसेंबर १९७१ मध्ये भारतापुढे दाती तृण घेऊन शरण जाण्याची नामुष्की पत्करावी लागल्यामुळे अखेरीस याह्याखानांना सत्ता सोडणे भाग पडले, तेव्हा पाकिस्तानचे नेतृत्व स्वाभाविकपणे भुत्तो यांच्याचकडे येणार हे स्पष्ट झाले. पश्चिम पाकिस्तानातील प्रचंड बहुमत आपल्या पाठीशी आहे, इतकेच नव्हे तर अत्यंत बहुमोल असे लष्कराधिपत्याचे जे मत आहे तेही आपल्या हाती सुरक्षित आहे असा रास्त दावा ते करू शकत होते

सत्ता हाती आल्याबरोबर भुत्तो यांनी क्षणाचाही वेळ वाया घालवला नाही. मूर्खांची संगत आनंदाने सोसणे त्यांच्या स्वभावातच नव्हते. तृतीय जगतातील समाजवादी नेता म्हणून मानमान्यता पावण्याची आस त्यांना कधीची लागून राहिलेली होती. किसिंजर यांनी वर्णिल्याप्रमाणे भुत्तो खरोखरच 'पाकिस्तानी लष्करी नेत्यांच्या बरोबरीने कठिण असे मार्गक्रमण करीत शांतपणे आपले हत्यार परजीत वेळ काढीत होते'. आता त्या लष्करी नेत्यांच्या वाटेला घोर अपयश आणि दारुण मानखंडना येताच भुत्तो यांना कधीची हवी होती ती संधी अखेरीस आली होती. आता ते सर्वोच्च स्थानी पोहोचले होते आणि त्यांच्या ठायी 'उत्तुंग पर्वतांना धराशायी करण्याचे, वाळवंटाचे हिरवेगार उद्यान करण्याचे आणि भुकेपायी किंवा मानखंडना झाल्यामुळे लोकांना मरण पत्करावे लागणार नाही असा समाज निर्माण करण्याचे' सामर्थ्य होते.

पाश्चात्य जगतातील निरीक्षकांना शक्य कोटीतील वाटतील त्याच्याही किती तरी पलीकडे भरारी घेणाऱ्या महत्त्वाकांक्षा भुत्तो यांनी स्वत:साठी आणि त्यांच्या खंडित देशासाठी उराशी बाळगल्या होत्या. ब्रिटिश पत्रकार जॉर्ज हचिन्सन यास भुत्तो म्हणाले होते– 'युरोपातील कोणत्याही देशाच्या तोडीला तोड ठरतील अशा सामाजिक मापदंडांचा पाकिस्तान मला निर्मावयाचा आहे. यासाठी मला निरक्षरता आणि अज्ञान यांच्याविरुद्ध लढाई पुकारावी लागणार आहे. पूर्वग्रह आणि पुराणमतवाद यांच्याशी टक्कर द्यावी लागणार आहे. या लढ्यात स्त्री आणि पुरुष यांच्यातील समानता अभिप्रेत आहे. लोकांच्या सामूहिक शक्ती त्यासाठी संघटित कराव्या लागणार आहेत. शेकडो आव्हाने यात आहेत. हा प्रवास खूप लांबचा आहे; पण आम्ही त्यासाठी आता सुसज्ज झालो आहोत!'

त्यांचा तो उत्साह झपाटून टाकणारा होता स्वत:च्या कर्तृत्वा-

वरचा विश्वास आणि पाकिस्तानातील लोकांच्या सामूहिक इच्छाशक्तीचा पाठिंबा यामुळे पहाता पहाता भुत्तो यांच्या महत्त्वाकांक्षेने त्यांचा सारा देश झपाटला गेला इतिहासातील एका जादूच्या क्षणाला तर असे वाटले की, भुत्तो यांच्या तळहातावर सत्ता आणि जनशक्ती दोन्ही हात जोडून उभ्या आहेत

*तथापी भुत्तो यांची अत्यंत खळबळजनक महत्त्वाकांक्षा भयानक* अणु–विज्ञानाच्या क्षेत्रात जावयाची होती. ही गोष्ट अशक्य कोटीतील आहे असेच बहुतेक पाश्चात्य निरीक्षकांना वाटत होते कारण पाकिस्तानचा बिनलष्करी शास्ता झाल्यानंतर लगेचच भुत्तो यांनी इस्लामी दुनियेसाठी पहिला अणु–बॉम्ब तयार करण्यासाठी पावले टाकायला सुरुवात केली होती. हे काम तातडीचे म्हणूनच त्यांनी हाती घेतले होते. डिसेंबर १९७१ च्या मध्याला ते सत्तेवर आले आणि जानेवारी ७२ मध्येच त्यांनी पाकिस्तानातील सुमारे पन्नास उच्च वैज्ञानिकांची आणि सरकारी अधिकाऱ्यांची एक अत्यंत गुप्त अशी बैठक बोलावली

¤

त्या वेळी नवे सरकार अजूनही प्रचंड गोंधळलेले होते आणि भुत्तो यांच्या सहकाऱ्यांनी ही बैठक मुळात बलुचिस्तानची प्रांतिक राजधानी क्वेटा येथे बोलावली होती. क्वेटा हे खुरटे शहर. सकाळच्या उंट–बाजाराकरताच मुख्यत्वे प्रसिद्ध. महिना जानेवारीचा, म्हणजे कडाक्याच्या थंडीचा. अफगाणिस्तानातून उत्तरेकडे झोंबरे–चावरे बर्फाळ हिवाळी वादळवारे त्या दिवसांत वाहायचे आणि निवडक शास्त्रज्ञांसाठी व उच्च सरकारी अंमलदारांसाठी उबेच्या निवाऱ्याची अथवा उष्णतेची कोणतीच सोय क्वेट्यात नसलेली. माणसांची मने उचंबळून टाकील आणि त्यांच्या रक्ताचे तपमान वाढवील असे तेथे काहीही नव्हते आणि अतिशय कडक प्रशासक या नात्याने भुत्तोंना नेमकी हीच गोष्ट साधायची होती.

म्हणूनच जेव्हा लष्करी विमाने या गारठल्या–काकडल्या शास्त्रज्ञांना घेऊन सरकारी आदेशावरून तिथून आग्नेयेला पंजाबातील मुलतानकडे निघाली तेव्हा कुणीच कुरकुर केली नाही. मुलतान भारताच्या सीमेला लागून होते दिवस कुंद नव्हता. स्वच्छ उन्हे पडलेली होती आणि भुत्तोंनी बैठकीसाठी ब्रिटिशांनी बांधून ठेवलेल्या एका शाही निवासाच्या हिरवळीवर डौलदार शामियाना उभारून घेतला होता

बैठकीला बोलावलेली शास्त्रज्ञ आणि अंमलदारमंडळी पाकिस्तानातील सर्वांत बुद्धिमान मंडळी होती आणि त्यातली काही तर जगातल्या सर्वोत्तम तत्सम मंडळींच्या तोडीची होती. पाकिस्तानात दरिद्री खेडी आणि माणसांचा बुजबुजाट असलेल्या झोपडपट्ट्यांची भर फार असली तरी पाकिस्तान्यांनी आणि त्यांच्या इस्लामी पूर्वजांनी समृद्ध विज्ञान–परंपरा जतन केली होती. देश तसा मागासच असला तरीही त्यांच्यापाशी आश्चर्यकारक असे मजबूत वैज्ञानिक अधिष्ठान होते. तीन नावांचा विशेष उल्लेख करायला हवा.

पहिले अब्दुस सलाम–सहकारी भक्तजन यांना 'प्रोफेसर' म्हणत यांनी तृतीय जगतासाठी सैद्धांतिक भौतिकशास्त्राचे एक आंतरराष्ट्रीय केंद्र इटलीमध्ये ट्रीस्ट येथे काढले होते आणि कालांतराने १९७९ चे भौतिकशास्त्राचे नोबेल पारितोषिक त्यांना मिळायचे होते

दुसरे डॉ इशरत उस्मानी – पाकिस्तान अणुशक्ती–आयोगाचे *अध्यक्ष म्हणून नावाजल्यानंतर संयुक्त राष्ट्रांत ऊर्जा–समस्यांवरील* तज्ज्ञ आंतरराष्ट्रीय सनदी नोकर म्हणून हे न्यूयॉर्कला आणखी नाव काढण्यासाठी जायच्या तयारीत होते

तिसरे मुनीर अहमद खान – गमत अशी की, व्हिएन्ना येथील आंतरराष्ट्रीय अणुशक्ती एजन्सी या अण्वस्त्रांचा प्रसार रोखण्यासाठी काढण्यात आलेल्या संस्थेने अत्यंत कर्तबगार म्हणून गौरविलेल्या आपल्या कर्मचाऱ्यांपैकी हे एक आणि परमाणु कार्यक्रमाचे मुख्य असलेल्या उस्मानी यांच्या जागी नेमण्यासाठीच भुत्तो यांनी या गृहस्थांना व्हिएन्नामधून परत बोलावलेले

मुलतान येथे त्या शामियान्यात त्या काहीशा अपूर्व आणि गुप्त बैठकीत भुत्तो यांनी आपल्या मनातील तो हेतु स्पष्ट केला तेव्हा त्यांची सारी भिस्त याच तिघांवर होती

¤

आम्हाला ( लेखकद्वयाला ) बैठकीची माहिती कित्येक महिन्यांनी कळली. तोवर आम्ही त्या मागावर लागलेलोही होतो, पण अशी एखादी बैठक झाली आहे याचा आम्हाला काहीच पत्ता नव्हता. अर्थातच त्या बैठकीत काय झाले, काय ठरले याची गंधवार्ताही आम्हाला असणे कसे शक्य होते ? अगदी सहज, एखाद्या अपघातात घडावे तसे आम्ही खडा टाकून पाहिला आणि योगायोगाने ती माहिती आमच्या हाती लागली.

त्याचे असे झाले–लंडनच्या एका अलिशान आणि महागड्या हॉटेलात खलीद हसन नावाच्या एका माणसाबरोबर मद्य घेत असताना आम्ही रंगलो होतो कॅफे रॉयल हे त्या हॉटेलचे नाव खलीद हसन हा पाकिस्तानी पत्रकार आहे काही काळ तो भुत्तो यांचा प्रेस-सेक्रेटरीही होता. चाळिशीतला खलीद ठेंगणा परंतु नेहमीच अत्यंत नीटनेटका पोषाख केलेला असे त्याच्या सहवासात भरपूर करमणूक व्हायची. मनोरंजन कसे करावे यात त्याचा हातखंडा होता काहीसा गोष्टीवेल्हाळ, डोळ्यात पौर्वात्य चमक, व्यवस्थित कापलेल्या मिशाखालून डोकावणारे खोडकर मिस्किल हास्य. तेव्हा तो ब्रिटनमध्ये रहात होता आणि 'गार्जियन' या वृत्तपत्रात नियमितपणे जाहिरातवजा 'द थर्ड वर्ल्ड रिव्ह्यू' या नावाची जी पुरवणी प्रसिद्ध होत असे, तिचा तो प्रबंध संपादक होता. त्यांच्या देशातून बाहेर पडलेल्या अशा काही पाकिस्तान्यांची, की ज्यांनी देशाच्या परमाणु-कार्यक्रमात प्रत्यक्षात काही ना काही काम केलेले आहे, नावे तरी तो आम्हाला सांगेल अशा कल्पनेनेच आम्ही त्याच्याशी ही भेट वेळ मागून ठरवून घेतली होती.

अंधारात कुठे तरी तीर मारावा तशातलाच हा प्रकार होता. बी.

**बैठकीला बोलावलेले शास्त्रज्ञ आणि अंमलदार पाकिस्तानातील बुद्धिमान मंडळी होती.**

बी. सी. च्या ' पॅनोरमा ' चित्रपटासाठी, स्वत. प्रत्यक्ष माहिती असलेल्या लोकाच्या शोधात आम्ही होतो; पण आम्हाला पाकिस्तानातील एकाही परमाणु शास्त्रज्ञाची माहिती नव्हती. ओळख असणे तर दूरच. तेव्हा इतर पत्रकारांशी–त्यातल्या त्यात पाकिस्तानी पत्रकारांशी बोलून याबाबत पुढे कोणत्या दिशेने प्रयत्न करता येतील तेच आम्ही पहात होतो.

खलीदने आम्हाला मदत करण्याचा प्रयत्न केला. त्याने आपल्या संपर्काच्या नोंदवह्या चाळल्या आणि कुठे योग्य माणूस सापडतो का ते पाहिले. तसे करीत असताना त्याने आम्हाला भुत्तो याच्याबद्दल कित्येक आश्चर्यकारक कथा मोठ्या सुरस रीतीने सांगितल्या; पण परमाणु शास्त्रज्ञाची त्याच्याजवळ असलेली यादी काही कामाची ठरली नाही आता आणखी कुणाला गाठावे याचा आम्ही विचार करीत असतानाच स्कॉच आणि पाण्याचा तिसरा पेग रिचवून खलीद आमच्याकडे पहात म्हणाला, ' अर्थातच तुम्हाला मुलतान येथे झालेल्या त्या बैठकीची माहिती आहे, खरे ना ? '

' कुठली बैठक म्हणालास ? ' आम्ही पुटपुटलो.

' मुलतानची, तिथेच तर भुत्तो यानी आम्हाला पहिल्यादा सांगितले की, आम्ही अणुबाँब मिळवणार आहोत ! '

आम्ही सपशेल चाटच पडलो आम्ही काही माणसांची यादी शोधत असतानाच साक्षात् आमच्या पुढ्यात, ज्या दिवशी या बाँबचा जन्म झाला त्या दिवशी प्रत्यक्ष तेथे असलेला माणूसच उभा होता की ! खलीदच्या मुलाखतीचे चित्रणच का करू नये ? आम्ही खलीदला विचारले.

त्याने नकार दिला. आपण श्रोत्यांसमोर काही सांगावे याची वास्तविक खलीदला चांगलीच हौस होती; पण तरीही बी. बी सी. च्या चित्रपटात त्याला यायचे नव्हते. पाकिस्तानातील नव्या शासकाच्या मर्जीतून उतरलेल्यांच्या यादीत आधीच त्याचे नाव आलेले होते. कारण भुत्तो याच्याशी असलेला त्याचा संपर्क. म्हणूनच आपण मुलाखतीच्या चित्रीकरणासाठी बसलो आणि त्यातही पाकिस्तानी शासक ज्या परमाणु-महत्त्वाकांक्षा गुप्त राखून आहेत त्याबाबत उघड-उघडपणे बोललो तर ते आपल्याला त्रास दिल्याशिवाय राहणार नाही अशी धास्ती त्याला वाटत होती.

पण त्याचा नकार स्वीकारायला आम्ही तयार नव्हतो. त्याने आम्हाला जे सांगितले होते त्याने आम्ही चांगलेच खळबळलो होतो. गोष्टी सांगण्याची त्याची शैली आम्हाला मोहवून गेली होती. त्याला कोणताही अपाय होणार नाही असे आम्ही आंधळ्या आत्मविश्वासाने मानत होतो. म्हणून त्याच्या नकाराकडे आम्ही कानाडोळा केला, त्याला खूप आग्रह केला, अगदी गळ घातली, त्याची खूप मनधरणीही केली. अखेरीस त्याने चित्रीकरणासाठी आम्हाला एक मुलाखत दिली; पण या निर्णयाचा त्याला लगेचच पश्चात्ताप झाला आणि त्यापायी अखेरीस त्याला नोकरीसही मुकावे लागले !

' थर्ड वर्ल्ड रिव्ह्यू ' आणि त्याची इतर संलग्न प्रकाशने याच्यासाठी खलीद काम करीत होता. त्या प्रकाशनाचे जे मुख्य पतपुरवठाकेंद्र होते ते अगदी जगजाहीर होते. ' बँक फॉर क्रेडिट अँड कॉमर्स इन्टरनॅशनल ' हे त्या केन्द्राचे नाव. पाकिस्तानातल्या सावकारांनी आखाती देशातून मिळालेल्या तेल-सपत्तीच्या बळावर ते चालवले होते. बी. बी. सी. ने तो चित्रपट प्रसारित करताच पाकिस्तान सरकारने या बँकेवर दडपण आणले. बँकेने ' रिव्ह्यू ' वर दबाव आणला आणि खलीदला नोकरीवरून कमी केले ! आम्हाला खेद वाटतो असे म्हणायला देखील आता उशीर झाला होता आणि तसा खेद व्यक्त करून काही व्हायचेही नव्हते.

खलीदने जेव्हा त्या शास्त्रज्ञाच्या आणि भुत्तो यांच्या भेटीचे वर्णन केले तेव्हा त्याची शब्दयोजना अत्यंत वास्तविक आणि बोलकी होती ते वर्णन करताना तो वार्ताहरापेक्षाही जास्त चांगला संकलननिवेदक आहे असे वाटत होते. खलीद सांगत होता, 'ती बैठक मोठीच भपकेबाज होती आणि भुत्तो यांच्या उत्कर्षाची द्योतक होती. एखादा मेळावाच होता. तेथे अमाप उत्साह, असीम आनद नुसता सळसळत होता ..

भुत्तोनी सुरुवात सावकाश केली. आधी त्यांनी पाकिस्तानला भारताशी झालेल्या युद्धात पत्कराव्या लागलेल्या पराभवाची आणि नामुष्कीची चर्चा केली आणि देशाचा झालेला हा अपमान धुऊन काढण्याची त्यांनी प्रतिज्ञा केली. भुत्तो म्हणाले की, ' पाकिस्तानने परमाणू-अस्त्रधारी बनले पाहिजे असे माझे पहिल्यापासूनच मत होते; पण माझे कुणी ऐकतच नव्हते; परतु आता भाग्याने मी स्वतःच निर्णय घेण्याच्या पदावर आलो आहे. पाकिस्तानची सर्व जनता माझ्या पाठीशी आहे. आता थांबायची माझी इच्छा नाही. मला सतत पुढेच जायचे आहे. पाकिस्तानजवळ अणुबाँब असणार आहे आणि इथे या शामियान्यात बसलेले शास्त्रज्ञच तो बाँब माझ्यासाठी तयार करणार आहेत .. ! '

## ....भुत्तोंनी स्मित केले, हात उंच नेला आणि नाटकी पद्धतीने तीन बोटे

खलीदने सांगितले आणि त्याच्यानंतर आम्ही ज्या तिघांशी बोललो आहोत त्यांनीही खलीदच्याच म्हणण्याला दुजोरा दिला की, भुत्तो याचे ते निवेदन ऐकताच शास्त्रज्ञमंडळी सर्दच झाली. एकजण तर म्हणाला की, ' ते ऐकताच शास्त्रज्ञाची जीभच टाळूला जाऊन चिकटली! ' सर्वजण एखाद्या तंबूत सर्कस बसते तसे बसून होते आणि भुत्तो त्याना अणुबाँब तयार करायला सांगत होते.

जणु तो प्रसग आजही आपल्या डोळ्यासमोर आत्ता घडतो आहे अशा मूडमध्ये खलीद सांगत होता की, कशी प्रचंड खळबळ उडाली आणि ती सतत वाढत कशी चालली होती. त्याच्या चेहऱ्यावर मद स्मित अजूनही तरळतच होते...अशा प्रकारे भुत्तोंनी सर्वांना एकत्र आणले होते. शास्त्रज्ञ, वरिष्ठ नोकर, अतिशय ज्येष्ठ अधिकारी आणि परमाणू-भौतिकीत पीएच. डी. झालेले तरुण अधिकारी असे सर्व भुत्तोंच्या समोर बसले होते आणि भुत्तो त्याना सांगत होते, ' हे पहा, आपल्याला अण्वस्त्रे तयार करायचीच आहेत.' जणु आपल्याला एखादी मेजवानी करायचीच आहे अशा थाटात

भुत्तो बोलत होते आणि अखेरीस त्यानी या मंडळीना विचारले, 'तर मग देणार ना तुम्ही मला अण्वस्त्र ?' आणि एखाद्या शाळेतल्या मुलानी उत्तेजित होऊन ओरडावे तसे ती सर्व मंडळी जोरदारपणे म्हणाली-- 'हो, हो, नक्कीच देणार आम्ही तुम्हाला अण्वस्त्रे ! '

पण भुत्तोना आणखीही काही हवे होते. त्यानी आणखी तातडी दाखवीत त्यांना विचारले, 'किती काळ लागेल यासाठी ? ' .. शास्त्रज्ञांचे याबाबतीत एकमत काही होईना ... खलीद सांगत होता. सागताना त्या बैठकीत निर्माण झालेला उत्साह त्याने अचूक उभा केला होता, पण त्या चित्रपट मुलाखतीत भाग घेणाऱ्या इतरानी मात्र थोडे वेगळे चित्र रंगवले. त्या बैठकीला आलेल्यापैकी काही ज्येष्ठ मडळीनी याबाबतच्या आपल्या शंका उपस्थित केल्या असे ते म्हणाले. त्यांच्या मते काही जणाना असे वाटत होते की, अणुबाँब तयार करणे अशक्य नसले तरी ही योजना किती काळात पूर्ण होईल ते अचूक सागणे नक्कीच कठिण आहे काहीनी तर स्पष्टपणे असेही सागितले की, 'ही एवढी प्रचड कामगिरी आहे की, पाकिस्तान स्वतःच्या शास्त्रीय आणि तात्रिक क्षमतेच्या पलीकडल्या काही क्षेत्रात त्यामुळे आपोआपच ढकलला जाईल ! '

चर्चा चालू होती. अखेरीस एक शास्त्रज्ञ-त्याचे नाव कुणालाच काही केल्या आठवेना-साहस करून म्हणाला की, 'कदाचित् पाच वर्षांत हे काम होऊ शकेल असे मला वाटते.' भुत्तोनी स्मित केले, आपला हात उच नेला आणि नाटकी पद्धतीने तीन बोटे पुढे करीत ते म्हणाले-'तीन वर्षे ! मला तीन वर्षांत बाँब हवा आहे !'

आणि ते सारे म्हणाले- 'होय, होय, आम्ही तो करू शकतो. फक्त त्यासाठी लागणारे धन आणि सोयी उपलब्ध असल्या पाहिजेत. भुत्तोंचे उत्तर साधे होते- 'आवश्यक ते धन आणि जरूर त्या सर्व सोयी मी तुम्हाला उपलब्ध करून देईन...!'

ते भुत्तो राजवटीचे सुरुवातीचे दिवस होते आणि ते काय वाटेल ते बोलू आणि करूही शकत होते. त्याचा अधिकार निर्विवाद होता. का असे त्याना विचारणारे कुणी नव्हते. त्याच्या ठायी लोकाची निष्ठा अनन्य होती. लोक त्याना महान मसिहाच मानत होते. खलीदचे निवेदन सपले.

¤

मुलतान येथे झालेल्या त्या बैठकीत इस्लामी बाँबच्या जन्माची कहाणी अशा प्रकारे सुरू झाली. पाकिस्तानचे अण्वस्त्र-विश्वातील पदार्पण त्या बैठकीत जणू पक्के होऊन गेले. त्या क्षणापासून आपल्या पदरी अणुबाँब पडावा यासाठी पाकिस्तान धडक कार्यक्रम हाती घेणार होता हा प्रसंगच ऐतिहासिक कारण त्यातच परमाणु-विश्वातील आणि औद्योगिक क्षेत्रातील गुपिते पळवण्यासाठी आणि मिळवण्यासाठी अचाट साहसी हेरगिरीची बीजे अंकुरली होती आणि ती सारी कहाणी आम्ही खलीद हसनकडून मिळवली होती. बिचाऱ्याला त्याची फार मोठी किमत चुकवावी लागली होती.

मुलतान बैठकीने रंगमंच सज्ज झाला आणि त्यावर भूमिका कुणी व कोणत्या करावयाच्या तो नट-संचही निवडण्यात आला. बहुतेक सर्वच शास्त्रज्ञ या महानाट्यात भाग घ्यायला तयार झाले. फक्त काहीनीच नकार दिला भुत्तो यांच्या ठायी इतराची मने

## पुढे करीत ते म्हणाले, 'तीन वर्षे! मला तीन वर्षात बाँब हवा आहे!'

वातावरणात क्षणार्धात विजेचे चैतन्य सळसळले; पण एक कनिष्ठ म्हणाला, 'होय हे काम तीन वर्षांत होऊ शकेल.' हा कनिष्ठ अधिकारी म्हणजे एस ए. बट. बाँबनिर्मितीमध्ये या माणसाची कामगिरी पुढे मोलाची होणार आहे तर हा बट ताडकन् उभा राहिला. आपल्या नेत्याचे ध्यान आकर्षून घेत त्याने उत्तेजित होऊन सागितले, 'हे काम तीन वर्षांत पूर्ण केले जाऊ शकते.'

पण तेवढ्यात आणखी एक अनुभवी आणि ज्येष्ठ शास्त्रज्ञ उभे राहिले आणि त्यानी ते झपाटलेले, मतरलेले वातावरण भंगून टाकले. ते म्हणाले, 'फटाके तयार करण्यासारखा हा काही पोरखेळ नव्हे, हे आपणही जाणता. हे काम पूर्ण करायला किती काळ लागेल आम्हाला सागता येणार नाही. तसे सागणे शुद्ध वेडेपणाचे आहे. असली कामे अशी मुदत बाधून करताच येत नाहीत!'

इतरानीही आपापले विचार माडले खलीद हसन सागत होता... 'मला चागले स्मरते, त्या चर्चेतून पुन्हा हरवलेला उत्साह निर्माण झाला. भुत्तोंना याची मजा वाटली. ते म्हणाले, 'तुमच्या या उत्साहाचे मर्म मी जाणतो; पण लक्षात ठेवा हा फार गभीर असा निर्णय आहे; पण पाकिस्तानला हा निर्णय करावाच लागेल, कदाचित सपूर्ण तृतीय जगालाही तो करावाच लागेल, एक ना एक दिवस ! कारण अणुबाँब येणारच आहे. तेव्हा मला सांगा तुम्ही तो करू शकता काय ?'

वळवण्याची केवढी मोठी कला होती; पण त्यानाही काही ज्येष्ठ शास्त्रज्ञाचे मन काही वळवता आले नाही. अशा लोकातच त्याचे बराच काळ मित्र आणि सल्लागार राहिलेले नोबेल पारितोषिकाचे भावी मानकरी अब्दुल सलामही होते.

मुलतान बैठकीत भाग घेणाऱ्यामध्ये जे काही शंकासुर होते, त्यातल्या एकाने आम्हाला सागितले की, सलामसारख्या शास्त्रज्ञाने जर या अण्वस्त्रयोजनेचा उघड धिक्कार केला तर पाकिस्तानच्या शास्त्रज्ञामध्ये-विशेषतः अणुशास्त्रज्ञामध्ये भयंकर फूट पडेल अशी स्वतः भुत्तोंना आणि त्याच्या उच्च सल्लागाराना धास्ती पडली होती. शास्त्रज्ञात अशी फूट पडणे घातक होते कारण त्यातल्या अनेकाना भुत्तो याच्याबद्दल कमालीचा आदर होता. सलाम यानी विरोध चालवल्याचे जाहीर झाले असते तर त्यामुळे शास्त्रज्ञाच्या आणि परदेशी वकिलातीच्या गोटामध्ये भयघटा खणाणल्या असत्या म्हणून त्या बैठकीनंतर काही दिवसांनी सलाम याच्याकडे एक खास दूत पाठविण्यात आला तोवर सलाम ब्रिटनमध्ये आपल्या घरी परतले होते हा संपूर्ण अणुविकासाचा कार्यक्रम खरोखरच शातिपूर्णच आहे अशी सलाम याची खात्री पटविण्याचे काम या खास दूताकडे सोपवण्यात आले होते.

जो खास दूत पाठवण्यात आला तोही सलाम याच्या कित्येक

वर्षांपासून चांगला ओळखीचा होता. तो पाकिस्तानच्या तरुण शास्त्रज्ञापैकी एक होता. सलाम याचा त्याच्यावर लोभ होता आणि विश्वासही होता. या तरुण दूताने सलाम याच्याशी खूपच सविस्तर बोलणी केली मुलतानच्या बैठकीत जे झाले ती एक निव्वळ सर्कस होती आणि हा कार्यक्रम अगदी विशुद्धपणे शांततापूर्ण आणि पूर्णपणे सभ्यपणाचा आहे, अशी सलाम यांची खात्री पटविण्यासाठीच हा तरुण शास्त्रज्ञ त्यांच्याशी इतक्या खोलात जाऊन बोलला.

वास्तविक या तरुण शास्त्रज्ञाने जे काही केले ती अतिशय चाणाक्षपणे केलेली शुद्ध फसवणूक होती, मुलाने बापाची करावी तशी.

'सलाम याच्याशी असे चक्क खोटे बोलताना तुम्हाला काहीच कसे वाटले नाही ?' आम्ही (लेखकद्वय)त्या तरुण शास्त्रज्ञाला नंतर विचारले.

सुमारे आठ वर्षांनंतर आमच्या प्रश्नाचे उत्तर देताना त्याला शब्द सुचेनात. अकस्मात डोळ्यात उभी राहिलेली आसवे लपविण्यासाठी त्याने फक्त दोन्ही हातांनी आपले तोंड झाकून घेतले होते

या उपक्रमात आणखी एक, त्यामानाने कमी गंभीर अडथळा होता. तो म्हणजे पाकिस्तानी परमाणुशक्तिआयोगाचे बराच काळ अध्यक्ष राहिलेले डॉ. इशरत उस्मानी. न्यूयॉर्कमध्ये सयुक्त राष्ट्राच्या कचेरीत आम्ही त्याची भेट घेतली तेव्हा त्यानी या प्रकरणाची आपली बाजू आम्हाला सांगितली.

ते म्हणाले, 'खरं म्हणाल तर आमचा परमाणु-कार्यक्रम अणुबाँब तयार करण्यापर्यंत राबवावा असे भुत्तोनी मला सागितले होते; पण मी त्याला नकार दिला. तशा प्रकारचा परमाणु-कार्यक्रम राबवण्यासाठी आवश्यक ती प्रारंभिक उभारणीदेखील पाकिस्तानात झालेली नव्हती. अशी उभारणी म्हणजे काही कुठून तरी दहा किलो प्लुटोनियम मिळवणे नव्हे बाँब तयार करण्यापूर्वी ज्या ज्या म्हणून पायाभूत गोष्टी असतात त्या म्हणतोय मी. म्हणजे असे पहा, पाकिस्तानजवळ या कामासाठी लागणारा धातु-उद्योग नव्हता. पोलादाचा एकही साधा कारखाना नव्हता.' डॉ. उस्मानी आम्हाला विश्वासात घेऊन सागत होते. ते किंचित मिस्किलपणे हसून पुढे म्हणाले, 'अर्थातच तुम्हाला राजकीय जुगारच खेळायचा असेल आणि हातात तसा डाव नसेल तर तुम्ही पोकळ पंजाच मारीत जाणार, आणखी काय करू शकणार ?'

भुत्तो यांनी उस्मानी यांचा हा दृष्टिकोन लक्षात घेऊन सर्वांआधी त्याना त्या पदावरून काढून टाकले; पण सरकारात जसे नेहमी होत असते ना, नको असलेल्या माणसाला बढती व पदोन्नती देऊन इतरत्र पाठवा, तसेच भुत्तोनी केले. त्यानी विज्ञान आणि तंत्रशास्त्र या नावाचे नवे मंत्रालय काढले आणि डॉ उस्मानी याना त्या खात्याचे सचिव नेमून टाकले. त्या ठिकाणी ते नुसते शोभेचे अधिकारी होते. साहजिकच त्यांनी लवकरच पाकिस्तानला रामराम ठोकला आणि संयुक्त राष्ट्रातील नोकरी पत्करली. डॉ. उस्मानी यांच्या जागी भुत्तो यानी पाकिस्तानच्या परमाणुशक्ति-आयोगाचे अध्यक्ष म्हणून त्याचे अणुबाँब तयार करण्याचे स्वप्न साकार करण्यासाठी उत्साहाने होकार भरणारे मुनीर अहमद खान यांची नेमणूक केली.

अमेरिकेतील ऑरगोने राष्ट्रीय प्रयोगशाळेत शिक्षण घेऊन मुनीर अहमदखान बराच काळ आंतरराष्ट्रीय अणुशक्तिमंडळाचे सभासद कर्मचारी राहिले आहेत. अणुबाँब तयार करण्याचे स्वप्न पाहणारे भुत्तो आता हयात नाहीत; पण मुनीर खान मात्र तृतीय जगताच्या अणुशक्तिविषयक आकाक्षाचे प्रेरक आणि प्रतीक बनले आहेत. नागरी आणि परमाण्वस्त्रांचा प्रसार या दोन्ही क्षेत्रांतील या विश्वाच्या आकांक्षाचे ते केंद्र बनले आहेत आणि तरीही मुनीर खान म्हणजे एक गूढच आहे.

त्यांच्याबाबत त्याचेच सर्वाधिकारी डॉ. उस्मानी यांचे मत काही फारसे चांगले नाही. उस्मानी म्हणाले– 'हा महापाताळयंत्री आणि महत्त्वाकांक्षी माणूस आहे. आपल्या अशा कारवायानी त्याने पाकिस्तानला आंतरराष्ट्रीय क्षेत्रात कित्येकदा बदनामच केले आहे.' परंतु आम्ही आणखी काही लोकाना विचारले, तर त्याचे म्हणणे पडले की, मुनीर खान हाडाचा देशभक्त आहे आपल्या देशाला परमाणुशक्तीचा लाभ व्हावा आणि तो अण्वस्त्रधारी बनावा यासाठी हा माणूस वाटेल ते आणि सर्व ते करील. मुनीर खान याना चांगले जाणणारे आणि त्यांच्याबाबत आमच्याशी बोलायला तयार झालेल्या लोकाचे म्हणणे असे की, मनुष्य मोठा मोहक आहे; पण त्याच्यात प्राजळपणाचा अभाव आहे. त्याचे बोलणे-चालणे बिनभरवशाचे वाटते आणि प्रसंगी तर तो अतिशय निर्दय वाटतो. एक शास्त्रज्ञ या नात्याने तो तसा लायक आहे; पण असामान्य प्रज्ञेचा मात्र नाही.

त्याच्याबाबत आमचे मत जे काही आहे ते साहजिकच अतिशय मर्यादित माहितीवर आधारलेले आहे मुनीर खानांनी एक कायम संकेत घालून घेतला आहे की, अण्वस्त्राशी ज्या गोष्टीचा दूरान्वयाने का होईना पण संबंध येतो, अशा कोणत्याही विषयावर ते कुणालाही मुलाखत देत नाहीत. 'आम्हाला तृतीय जगताच्या मुख्य व्यक्तीच्या दृष्टिकोनातून ऊर्जा–सकटावर बी. बी. सी. टेलिव्हिजनसाठी एक मालिका तयार करायची आहे' असे सागितल्यावर त्यानी आम्हाला भेट दिली. अर्थातच आम्हीदेखील असे सागताना तितकेसे प्राजळ नव्हतोच हे मान्य केलेच पाहिजे, पण इस्लामाबादच्या शिवेवर असलेल्या त्याच्या प्रशस्त कार्यालयात ही भेट झाल्यानतरही त्यांनी अगदी शातपणे पण तितक्याच मनमोहक रीतीने पाकिस्तानच्या परमाणु–कार्यक्रमाबाबत काही एक विचारू नका असे आम्हाला सागून टाकले.

तरीही दोन गोष्टी या भेटीतून आमच्या लक्षात प्रकर्षाने आल्या की, या माणसाला पाश्चात्य जगताची–विशेषेकरून अमेरिकेची–चांगली जाण आहे व आमच्याच व्यवसायबंधूना वाटते त्यापेक्षा पाकिस्तानी लोकाबाबतचे आमचे मत पुष्कळच चागले बनले आहे. दुसरी गोष्ट ही की, पौर्वात्य अथवा पाश्चात्य मापदडाने पाहिले तरी मुनीर खान या माणसामध्ये जगण्याची आणि तगण्याची कमालीची चिवटता आहे. जनरल झियानी भुत्तोला सत्तेवरून पदच्युत करून अखेरीस फाशी दिल्यानंतरही हा माणूस नुसता जिवंतच राहिला नाही तर आपल्या त्याच पदावरही कायम राहिला यावरून त्याचा हा चिवटपणा जगातील तत्सम चिवट माणसाच्या तोडीचा असल्याचे सिद्ध झाले आहे. आमच्या प्रश्नांना उत्तरे द्यायला मुनीर खानाने नकार दिला असला तरी लष्करातील आपल्या जुजबी वरिष्ठाबाबत त्याला जी कस्पटाची भावना वाटत होती ती काही त्याने लपवायचा प्रयत्न केला नाही. इतके असूनही, त्या लष्करप्रमुखांचा अजूनही त्याच्यावर विश्वास आहे आणि पाकिस्तानी

अणुबाँब–योजनेचा अजूनही तोच सर्वाधिकारी आहे.

मुलतान–बैठकीतील आणखी एक उत्साहवीर म्हणजे एस. ए. बट. तीन वर्षांत बाँब तयार करता येऊ शकेल असे यानेच चुकीचे विधान केले होते. अण्वस्त्र–कार्यक्रमात या बटनेही खूपच नाव कमावले. मुनीर खानच्या मार्गदर्शनाखाली बटने पॅरिसच्या शिवेलगत एक छोटेसे कार्यालय उभारले आणि तिथूनच त्याने परमाणु–गुपिते पळविण्यासाठी हेरगिरीचे नाना उपक्रम यशस्वीपणे चालवले. दुसऱ्या महायुद्धाच्या काळात आणि त्या युद्धानतर, ब्रिटन आणि अमेरिका यानी परमाणु–अस्त्रे तयार करण्यासाठी जे प्रयत्न चालवले होते, त्याची बित्तंबातमी मिळवण्यासाठी रशियाने जी हेरगिरी केली होती, त्यानतर बटने योजलेली हेरगिरीच इतिहासात नमूद होईल!

पण मुनीर खानने आम्हाला निदान त्याच्या कचेरीत तरी येऊ दिले होते; परतु या बटमहाशयाने आम्हाला आपल्या कार्यालयात पायसुद्धा ठेवू दिला नाही!

¤

झुल्फिकार अली भुत्तो अशा प्रकारे अणुबाँब प्राप्त करण्याच्या दिशेने वाटचाल करू लागले भुत्तो कसकसे चढत गेले याचा ज्यानी मागोवा घेतला असेल, ते काय काय म्हणत आले हे ज्यानी ऐकले असेल आणि त्यानी जे काही लिहून ठेवले आहे, ते ज्यानी वाचले असेल, त्याना याचे कोणतेही आश्चर्य वाटू नये १९५० नतरचे दशक सरतासरता ते जेव्हा अयूब खान याच्या मंत्रिमंडळात नैसर्गिक सशोधनमंत्री होते तेव्हापासूनच जनाब भुत्तो पाकिस्तानजवळ अण्वस्त्रे असली पाहिजेत असे उघड उघड बोलत होते आणि १९६४-

'आमच्या जमान्यातील सर्वच युद्धे ही संपूर्ण युद्धे बनली आहेत. संपूर्ण युद्धाच्या सल्पकनेवरच युरोपातील सर्व राजनीती आधारलेल्या आहेत. तेव्हा पाकिस्तानविरुद्ध सुरू होणारे कोणतेही युद्ध हे संपूर्ण युद्धच असणार आहे हे गृहीत धरूनच चालले पाहिजे. ते यापेक्षा काही कमी असेल असे समजून आपल्या योजना आखणे धोक्याचे होईल. म्हणून आमच्या योजनामध्ये अण्वस्त्रे प्राप्त करण्याचा समावेश असायलाच हवा आहे...

'कठिण असले तरी पाकिस्तानला परमाणु-तत्रविज्ञानाचा विकास करण्यावर सर्वांत जास्त लक्ष केन्द्रित करावे लागेल. आज ज्याच्याजवळ अण्वस्त्रे आहेत त्यांच्याच हातात ती रहावीत आणि अण्वस्त्राचा आणखी प्रसार होऊ नये यासाठी जी आतरराष्ट्रीय संधी पुढे करण्यात आली आहे त्याच्या मायाजाळात पाकिस्तानने अडकण्याचे कोणतेही कारण नाही. परमाणुअस्त्रांची मक्तेदारी इतराच्याकडे असावी हे भारत कधीही मान्य करणे शक्य नाही. भारताचा परमाणु–कार्यक्रम आणि विशेषेकरून जिनिव्हामध्ये त्याने आपल्या राजदूतामार्फत चालवलेल्या हालचाली लक्षात घेतल्या तर आपल्या स्वत.च्या परमाणु-बाँबचा लवकरात लवकर चाचणीस्फोट करण्याचा भारताने चंगच बाधला आहे हेच दिसून येते. अशा परिस्थितीत पाकिस्तानने आपल्या परमाणु–कार्यक्रमाना आवर घातला किंवा ते तहकूब केले, तर भारत त्याच्या परमाणु–तत्रविज्ञानातील प्रगतीच्या बळावर पाकिस्तानला नेहमीच धाक दाखवू शकेल आणि त्यामुळे पाकिस्तानचा विज्ञान आणि तंत्रविज्ञानाचा विकास लुळापागळा होऊन जाईल. ते संकट आमच्यावर येऊन कोसळण्यापूर्वीच आम्ही

## 'आमच्या योजनांमध्ये अण्वस्त्रे प्राप्त करण्याचा समावेश असायलाच हवा!'

६५ अखेर तर त्याचे हे मत आग्रही बनले होते.

हा काळ लक्षात घेण्यासारखा आहे. १९६४च्या एप्रिलमध्ये चीनने आपल्या पहिल्या अणुबाँबचा सिंकियाग प्रातात लॉप नोर येथे चाचणीस्फोट केला आणि त्याच वर्षी नोव्हेंबरात भारत सरकारने 'शाततेसाठी परमाणु–विस्फोट' करण्याचा निर्णय घेतला. त्यानंतर बरोबर १० वर्षांनी, मे१९७४ मध्ये हिंदुस्थान स्वत.च्या अणुविस्फोटात यश मिळवणार होते. भारताने हा निर्णय अत्यंत गुप्तपणे घेतला होता; पण भुत्तो यांना भारत काय करीत आहे याचा वारा लागला असावा असे दिसते. कारण तेव्हापासून पाकिस्तानचे परराष्ट्रमंत्री या नात्याने आणि नंतर विरोधी नेत्याच्या भूमिकेतूनसुद्धा भुत्तो यानी पाकिस्तान अण्वस्त्रधारी बनलेच पाहिजे याचा अगदी उघड उघड पुरस्कार केला.

भुत्तो यांनी या विषयावर अगदी अत्यंत सुस्पष्ट अशी भूमिका त्याच्या 'द मिथ ऑफ इन्डिपेन्डन्स' या पुस्तकात माडली. हे पुस्तक काही काही भागात अतिशय ओजस्वी उतरले आहे. भुत्तो यानी हे पुस्तक लिहून पूर्ण केले १९६७ साली आणि लंडनमध्ये ते प्रकाशित झाले १९६९ साली. त्यात भुत्तो यानी दिलेला इशारा पाश्चात्य जगतातील फारच थोड्या लोकानी वाचायची तसदी घेतली; पण कोणीही तो गंभीरपणे घेतला असे दिसत नाही. भुत्तो त्या पुस्तकात म्हणतात–

स्वत: अणुअस्त्रे कशी प्राप्त करायची हाच काय तो प्रश्न आमच्या पुढे आहे.'

"भारताच्या परमाणुतत्राचा इतका विकास झाला आहे की, त्यातून तो अणुबाँबच नव्हे तर अन्य परमाणु–अस्त्राचा विकास सहज करू शकतो आणि या सकटाची सुरुवात भारत त्याला हव्या त्या क्षणी करू शकतो. त्याच्या परमाणुविकास-कार्यक्रमासाठी भारताला परराष्ट्राची मदत मिळत आहे आणि पुढेही मिळत राहणार आहे. म्हणून पाकिस्ताननेही तसलाच कार्यक्रम हाती घेणे अत्यंत अगत्याचे आहे!"

भुत्तो यांनी हे १९६७ मध्ये लिहून ठेवले आणि भारताच्या संभाव्य आक्रमणापासून पाकिस्तानचे रक्षण करण्यासाठी त्याने अणुबाँब मिळविलाच पाहिजे असा उघड उघड पुरस्कार केला. इतरत्र आणि विशेषेकरून आपल्या सहकाऱ्यांशी खाजगीत केलेल्या संभाषणातून भुत्तो याना अणुबाँब कशासाठी हवा होता याचे आयाम निव्वळ संरक्षणाच्या सिद्धान्ताच्याही किती तरी पलीकडे गेलेले असल्याचे जाणवत होते.

त्याचे माजी प्रसिद्धि–चिटणीस खलीद हसन यांच्या लंडनमध्ये आम्ही ज्या अनेक मुलाखती घेतल्या त्यांपैकी एका मुलाखतीत खलीद म्हणाला होता– 'पाकिस्तानची मान अखिल जगात ताठ

राहावी, उंच रहावी म्हणून भुत्तोना अणुबाँब हवा होता. अण्वस्त्राच्या प्रचाराला कोणीही आळा घालू शकणार नाही हे त्यानी अचूक ओळखले होते. उत्तरोत्तर अधिकाधिक देश अण्वस्त्रधारी बनणार याबद्दल त्यांच्या मनात कोणतीही शंका नव्हती. प्रत्येकजण आपल्या तळघरात अणुबाँब बाळगणार असेल तर मग आपणही तो का न बाळगावा असे ते म्हणत असत. म्हणूनच आपल्यात धमक असेल तर आपणही तो मिळवला पाहिजे असे त्यांचे म्हणणे असे.

तृतीय जगतातील काही इतर नेत्यांच्या मनात कालांतराने असा विचार उत्पन्न होण्याच्या किती तरी आधीच भुत्तो यानी असा विचार केला होता, इतकेच नव्हे तर अत्यंत तर्कशुद्धपणे तो अगदी सुस्पष्ट शब्दांत बोलूनही आणि लिहूनही ठेवला होता. त्याची विचारसरणी स्वतःचा अणुबाँब बनविणाऱ्या ब्रिटन आणि फ्रान्स यांच्या विचारसरणीशी नाते सांगणारी होती. इराकसारखा देश आज ज्या नव्या परमाणु–राष्ट्रवादाचा मोठ्या हिरीरीने पुरस्कार करीत आहे, त्याच्या तद्दन एक दशकाआधीच फक्त पाकिस्तानने आणि त्याच्या भुत्तोने तो विचार केलेला होता.

खलीद म्हणाला होता– 'तृतीय जगताचा एक नेता या नात्याने आणि पाश्चात्य वातावरणातच शिक्षण घेतलेले असल्यामुळे पश्चिमेला चांगल्या प्रकारे ओळखणारा एक बुद्धिजीवी या नात्याने भुत्तो नेहमी प्रतिप्रश्न विचारीत की, 'पाश्चात्य देशांपैकी कुणी आणि रशियाने अण्वस्त्रे धारण केली तर त्यांना कुणीही हरकत घेत नाहीत, असे का ? आणि सर्वजण हे असे चालायचेच असे म्हणून या राष्ट्रांचे अण्वस्त्रधारी होणे म्हणजे मोठेसे काहीच नाही असे मानतात, ते का ?' अण्वस्त्रे धारण करायची आणि तरीही जबाबदारीने वागायचे ही क्षमता फक्त पाश्चात्य जगतातच आहे या सर्वसाधारण समजुतीलाच भुत्तो हरकत घेत होते.

भुत्तो यांचे तर्क वजनदार होते यात वादच नाही. १९६३ मध्ये ते पाकिस्तानचे परराष्ट्रमंत्री झाल्यानंतर तर त्यांच्या या तर्कांना जास्तच धार चढली; पण त्या वेळी पाकिस्तानचे लष्करी सर्वेसर्वा असलेले फील्ड मार्शल अयूबखान यांनी नेहमीच भुत्तोना मोडता घातला. जुन्या पठडीतील सैनिक आणि अतिशय उमदा आणि शालीन माणूस या नात्याने अयूबखानला कळेना की, पाकिस्तानसारख्या देशाला अणुबाँब हवाच कशासाठी ?

खलीद हसन म्हणाला होता–'अयूब विचारायचे, तुम्ही लोक उगाचच नाही नाही ते आणि फारच वाचत असता, हवा कशाला पाकिस्तानला बाँब ? पाकिस्तान एक गरीब देश आहे. अणुबाँबचे चोचले आपल्याला कसे परवडतील ? त्यापेक्षा आपण आपला पैसा शाळांमध्ये, इस्पितळे बांधण्यासाठी आणि उद्योगधंदे उभारण्याकरिता लावला पाहिजे, असे ते भुत्तोना नेहमी म्हणायचे.'

पण शेवटी सरशी व्हायची ती भुत्तोची, अयूबची नव्हे आणि हा ज्वलज्जहाल समाजवादी आणि राष्ट्रवादी जेव्हा बांगलादेशच्या युद्धानंतर सत्तेवर आला तेव्हा, देशापुढील सर्वांत आधी हाती घ्यावयाच्या कामगिरीत अणुबाँबची प्राप्ती या विषयाला त्यानी अग्रक्रम दिला यात तसे काहीच आश्चर्य नव्हते.

१९४७ मध्ये स्थापना झाल्यापासून पाकिस्तान पश्चिमेशी विविध संघटनांतून संलग्न झालेला होता. आपण अमेरिकेचे सर्वांत निकट संलग्न राष्ट्र आहोत असे पाकिस्तान मोठ्या अभिमानाने सांगत असे. १९५९ मध्ये तर त्याने अमेरिकेशी परस्पर संरक्षणाचा तहच केला होता. फारसा गाजावाजा न करता पाकिस्तान्यानी पेशावरमधला बादा बेर विमानतळ अमेरिकनांच्या हवाली केला होता. हा विमानतळ अफगाणिस्तानच्या सरहद्दीला अगदी लागून आहे आणि येथूनच अमेरिकेची 'यू–२' ही हेरगिरी करणारी विमाने रशियावर नियमितपणे टेहळणी–उड्डाणे करीत असत. मे १९६० मध्ये गॅरी पॉवर्सचे जे विमान रशियाने पाडले होते ते याच विमानतळावरून निघाले होते.

अण्वस्त्रसंघर्षाचा खरा अर्थ काय याचा पहिला वास्तुपाठ या घटनेनेच पाकिस्तानला मिळाला. रशियाचे पंतप्रधान निकिता ख्रुश्चॉव यांनी पाकिस्तानला एक सणसणीत इशारा पाठविला, 'तुमच्या विमानतळावरून तुम्ही अमेरिकनाना रशियावर टेहळणी करण्यासाठी उड्डाण करू देणार असाल, तर आम्ही अमेरिकनांची ती विमाने तर पाडूच ! पण तुमच्या विमानतळावरदेखील आमच्या रॉकेट्सचा मारा करायला कमी करणार नाही !'

त्या वेळी तरी पाकिस्तानने या धमकीला भीक घातली नाही. काही महिन्यानी अमेरिकी कॉंग्रेससमोर केलेल्या आपल्या सुप्रसिद्ध भाषणात फील्ड मार्शल अयूबखान यानी ठणकावून सांगितले, 'खरोखरच असे काही प्रसंग उभे राहिले, तर लक्षात ठेवा, ज्याचा भरवसा तुम्ही धरावा असे आमच्याखेरीज अख्ख्या आशियात दुसरे कुणीही असणार नाही ! फक्त पाकिस्तानची जनताच काय ती तुमच्या पाठीशी उभी राहील !'

अमेरिकेशी दाखवलेल्या या इमानाखातर पाकिस्तान्यांना अत्यंत तातडीने हवे होते ते सर्व मिळत गेले. केनेडी आणि जॉन्सन दोघांनीही आपापल्या सरकारमार्फत पाकिस्तानला अनेक गुप्त आश्वासने दिली. त्या सर्वांचा मथितार्थ एकच होता की, फक्त 'कम्युनिस्ट आक्रमणापासूनच' नव्हे तर–आणि हेच पाकिस्तानच्या लेखी अत्यंत महत्त्वाचे होते–भारताकडून होणाऱ्या कोणत्याही संभाव्य हल्ल्यापासूनही अमेरिका पाकिस्तान्यांचे रक्षण करील !

अमेरिकेला माहीत असलेले पाकिस्तान हे असे होते. अर्थातच असे पाकिस्तान अमेरिकेला केव्हाही आवडणारेच होते. 'संरक्षणाच्या प्रचंड हमी' देऊन तेच पाकिस्तान सध्याचे अमेरिकन सरकार आपल्या बाजूला राखण्याचा प्रयत्न करीत आहे. या हमीबरोबरच लष्करी आणि आर्थिक मदतीचाही ते पाकिस्तानवर पाऊस पाडीत आहे; पण हे असे पाकिस्तान म्हणजे भुत्तो यांच्या स्वप्नातील पाकिस्तान मात्र खासच नव्हे.

कारण भुत्तो यांची राजकीय जडणघडण सुरुवातीपासूनच वेगळ्या प्रकारची झालेली होती. त्या जडणघडणीतूनच पाकिस्तानजवळ अण्वस्त्रे असलीच पाहिजेत ही त्यांची प्रामाणिक श्रद्धा आकाराला आलेली होती. तृतीय जगतातील एक राष्ट्रवादी नेता या नात्याने त्यांचा अमेरिकेने पाकिस्तानच्या संरक्षणाबाबत दिलेल्या हमीवर आणि आश्वासनावर तसा विश्वासच नव्हता. त्यामुळे पाकिस्तानच्या 'आजच्या' गरजांची सांगड अमेरिकेच्या धोरणाशी अशी कायमची घालून बसणे त्याना कधीही रुचणारे नव्हते. अयूबखानांच्या सरकारात मंत्रीपद स्वीकारल्यानंतर १९५० नंतरच्या दशकाच्या अखेरी

अखेरीला त्यांनी आपल्या सहकारी मंत्र्यांना चक्कच बजावले होते की, अमेरिकेशी आपण आपली अशी कायमची गाठ बांधून घेण्याची काहीही आवश्यकता नाही. भारताशी आपले युद्ध झाल्यास अमेरिका आपल्या मदतीला धावून येणार नाही हे लक्षात असू द्या !'

१९६५ च्या युद्धाच्या वेळी वर्जित केलेली अमेरिकन शस्त्रास्त्रे समरांगणावर दोन्ही बाजूंना उपलब्ध असल्याचे त्यांनी परराष्ट्रमंत्री या नात्याने स्वतः पाहिले व अनुभविलेले होते. या अशा धोरणाचा पाकिस्तानला फार तोटा सहन करावा लागला होता. शिवाय बांगलादेश युद्धाच्या वेळी राजकारणाच्या अगदी केंद्रस्थानची व्यक्ती असल्यामुळे त्यांनी अमेरिकेचे प्रत्यक्ष सामर्थ्य आणि मदत करण्याची बांधिलकी किती आहे ते स्वतः अनुभविलेले होते. किसिंजर यांच्या हातात हात घालून त्यांनी कार्य केलेले होते आणि तेही युद्ध अगदी निर्णायक अवस्थेला आलेले असताना. निक्सन-प्रशासनाचा कल पाकिस्तानकडे 'झुकलेला' आहे आणि त्यामुळे बंगालच्या उपसागरात युद्धनौका नेण्यापर्यंत त्या प्रशासनाने मजल मारली आहे हे त्यांना माहीत होते. अमेरिकेच्या या युद्धनौका त्या उपसागरात पोहोचल्याने भारताला आणि त्याच्या रशियन मित्रांना धोका निर्माण होऊ शकतो हेही ते जाणत होते. शिवाय खुद्द चीनचे पंतप्रधान चौ-एन-लाय यांच्याचकडून त्यांना कळले होते की, अमेरिकेने आपल्या सामर्थ्याचे हे असे प्रदर्शन केल्यामुळेच पश्चिम पाकिस्तानचा आणखी काही प्रदेश पादाक्रांत करण्याचा भारताचा विचार थबकला होता.

या सर्व गोष्टी आणि घटना इतर कुणापेक्षाही भुत्तोंना जास्त या नात्याने, रशियाने धमकी दिली होती की, यापेक्षा जास्त पुढे जाल तर रशियन रॉकेट्स लॉप नोर येथील चीनची परमाणुअस्त्र-योजना आणि केंद्र उध्वस्त करून टाकतील ! या धमकीसरशी चीनने माघार घेतली होती. कारण रशियाशी अणुयुद्ध विकत घेण्याइतके काही पाकिस्तान चीनचा निकट मित्र नव्हते. अण्वस्त्रधारी बनणे किती आवश्यक आहे याचा भुत्तो यांना मिळालेला हा दुसरा वास्तु-पाठ होता. अण्वस्त्रे दुसऱ्या कुणाच्या—अगदी पाकिस्तानचा कितीही दोस्त म्हणविणाऱ्या देशाच्या—हाती असून भागणार नाही, ती आपल्या हक्काची आणि आपल्या स्वतःच्याच ताब्यात असणे हाच यावर एकमेव उपाय आहे याची भुत्तो यांना ही दुसऱ्यांदा आलेली प्रचीती होती. पाकिस्तानचे अस्तित्वच धोक्यात आलेले असताना आणि त्याची शकले उडायच्या बेतास आलेली असताना चीन त्याचे रक्षण करण्यास असमर्थ ठरला होता आणि अमेरिकाही अपेशी ठरली होती. परिणाम असा झाला की, भारत विजयाच्या परमानंदात होता आणि पाकिस्तानी लोक मात्र मर्महत होऊन नव्या मित्रांच्या आणि नव्या रणनीतीच्या शोधात होते. भुत्तो यांची कुशाग्रता ही की, या समस्येचे गांभीर्य इतर कुणाच्या लक्षात येण्याच्याही किती तरी आधीच त्यांनी त्या समस्येचे उत्तरही शोधून घेतले होते आणि त्या उत्तरातच भुत्तो यांची स्वतःची परमाणु-महत्त्वाकांक्षाही तृप्त होणार होती.

साहजिकच भुत्तो यांची नजर अन्य इस्लामी देशाकडे आणि विशेषतः तेलसमृद्ध अरब देशातील अमीर आणि शेख यांच्याकडे वळली. ब्रिटीश राज्यातील मुसलमानांना पाकिस्तानच्या रूपाने

## त्या वेळी भारत विजयाच्या परमानंदात तर पाकिस्तात नव्या रणनीतीच्या शोधात होता.

चांगल्या प्रकारे माहीत होत्या आणि तरीही निक्सन-प्रशासन, या सर्व सद्भावना बाळगूनही, पाकिस्तानची भारताने जी शकले केली ती थांबवायला अमेरिका असमर्थ होती आणि अनिच्छुकही होती हेही त्यांनी अनुभविले होते. भारताच्या आक्रमणाविरुद्ध पाकिस्तानचे रक्षण करण्याचे आश्वासन अमेरिकनांनी दिले होते आणि ते आश्वासन ते पाळू शकलेले नव्हते. भुत्तोसारख्या अत्यंत वास्तववादी नेत्याच्या लेखी शेवटी काय निष्पन्न झाले तोच भक्कम पुरावा होता. पाकिस्तानच्या इतर दोस्त राष्ट्रांनाही भुत्तो हा निकष लावीत होते आणि म्हणूनच ते याबाबत कुणाच्याही आश्वासनावर विसंबून निर्धास्त राहणे नामंजूर करीत होते. अमेरिकेबाबत त्यांचे मूल्यमापन असे प्रत्यक्ष अनुभवावर आधारलेले आणि वास्तववादी होते, तसेच चीनबाबतही होते.

भुत्तो चांगल्या प्रकारे जाणत होते की, १९७१ च्या युद्धकाळात भारताविरुद्ध पाकिस्तानला मदत करण्याची चीनने शिकस्त केली होती. चीनने पाकिस्तानला शस्त्रे पुरविली होती. इतकेच नव्हे तर नवी दिल्लीचे तोंड उघडण्यासाठी त्याने भारतीय सरहद्दीवर आपले सैन्यदेखील आणून युद्धासाठी जय्यत तयार ठेवले होते; परंतु तरीही जेव्हा अण्वस्त्रांचा प्रश्न आला तेव्हा चीनने माघार घेतली होती. युद्ध अगदी घनघोर अवस्थेला आलेले असतानाच भारताचा मित्र मायभूमी मिळाली होती साहजिकच पश्चिम आशियातील इस्लामी देशांना पाकिस्तानबाबत एक जवळीक होती, एक आपलेपणा होता. भुत्तो यांनी या गोष्टीचा पुरेपूर फायदा घेण्याचे ठरविले. त्यांनी तुर्कांशी, इराण्यांशी, अरबांशी इस्लामचे नाते सांगत सख्य जोडले. त्यामुळे बांगलादेशाच्या युद्धात अनेक अरब राष्ट्रांनी पाकिस्तानला मदत केली. सौदी अरबस्तानने ७५ विमाने उसनी दिली होती. लिबियाने तर आणखी किती तरी दिली होती. इवल्याशा जॉर्डनने देखील — अर्थातच अमेरिकेच्या परवानगीने — प्रतिबंधित अमेरिकन एफ- १०४ जातीची दहा विमाने त्याला पुरवली होती. ही सर्व मदत तशी अल्प आणि सांकेतिकच असली आणि त्यायोगे भारताच्या विमानदलाच्या वरचष्म्याला थोडी वेसण बसली असली तरी या देशांशी यापुढे फार मोठे सहकार्य शक्य आहे हे भुत्तोंनी अचूकपणे हेरले होते.

पाकिस्तानी स्वतःला पश्चिम आशियाचाच भाग मानीत होते. पाक-व्यापारी इराणच्या आखातापर्यंत आपला व्यापार-उदीम विस्तारित होते. पाक-यात्रेकरू हज करायला मक्केला जातच होते. इतकेच नव्हे तर इराण आणि इराकमधल्या मशिदीही त्यांनी आपल्या नमाजांचे केंद्र बनविल्या होत्या. संपूर्ण अरबविश्वातील नव्या आखाती देशामध्ये पाकिस्तानी अधिकारी आणि सैनिक भरती

झालेले होते. साऱ्या अरब दुनियेत ते लवकरच लष्करी प्रशिक्षणाचे तळ सुरू करणार होते आणि अक्षरशः हजारो-लाखो पाकिस्तानी धंदेवाईक, डॉक्टर्स, शिक्षक आणि इंजिनियर थेट लिबियासारख्या दूरच्या देशापर्यंत महत्त्वाच्या व मोक्याच्या हुद्द्यांवर काम करीत होते.

आपल्या भावी रणनीतीसाठी भुत्तो यांनी ह्याच पाया मानला. संपूर्ण इस्लामी इतिहासात दक्षिण आशियातील मोगल साम्राज्य हा परमोत्कर्षबिंदू मानला जातो. पाशवी लष्करी सामर्थ्यापासून तर थेट ताजमहालसारखी कलाकृती निर्माण करण्यापर्यंत मोगल साम्राज्याची आठवण प्रत्येक इस्लामभक्ताला आहे. आता नेतृत्वाच्या त्याच परंपरेनुसार, त्या मोगल सम्राटाचेच वंशज, आपल्या आधुनिक शास्त्रीय आणि तंत्रवैज्ञानिक वर्चस्वाचा वापर पश्चिम आशियातील नवश्रीमंत आणि नवस्वतंत्र देशामध्ये, इस्लामी सख्य बळकट करण्यासाठी करतील, असे भुत्तोनी योजले.

खलीद हसनने आम्हाला सांगितले. 'पाकिस्तानजवळ तेल नाही हे तुम्हाला माहितच आहे. १९७० च्या सुमारास पश्चिम आशियातील अनेक इस्लामी देशाच्या वाट्याला आली तशी अमाप संपत्तीही पाकिस्तानजवळ नाही; परंतु भुत्तो यानी पाकिस्तानजवळ जे आहे त्याचेच भाडवल करायचे ठरविले. पाकिस्तानजवळ होते– कमालीचे कौशल्य, विविध उद्योगधंद्यात वाकबगार असलेले प्रचंड माणूसबळ ! शास्त्रज्ञ, तंत्रज्ञ...

म्हणजे नेमके तेच लोक ज्यांना त्यांनी मुलतानच्या बैठकीला बोलावले होते. शेख आणि शाह आणि लष्करीराजे याच्यासारख्या अर्धशिक्षित लोकांची क्षुधा प्रज्वलित करून त्याच्या औदार्याला प्रोत्साहन देण्याचा नामी मार्ग भुत्तो यानी पाहून काढला होता. त्यांनी या मंडळीना पटविले की, तुम्ही लोक आपल्याजवळच्या अब्जावधी रुपयांची संपत्ती खर्चूनदेखील स्वतः कधीही जे प्राप्त करू शकणार नाही ते–म्हणजे इस्लामी अणुबाँबचे आश्वासन–मी तुम्हाला देतो. या मंडळीच्या संपत्तीचा कौशल्याने वापर करून घेण्याचा यापरता आणखी चांगला मार्ग तो कोणता असणार ? ¤

# ओसिराक अणुकेंद्रावर हल्ला

३० सप्टेंबर १९८०. इराण आणि इराक यांच्यातील आखाती युद्धाचा नववा दिवस. इराणची फँटम विमाने बगदादच्या परिसरातील एका वीजकेंद्रावर बाँबहल्ला करून नुकतीच परत आलेली. तोच दोन फँटम्स क्षितिजावर अगदी खाली आली आणि त्यांनी एका नव्या लक्ष्याकडे सूर मारला.

त्याच दिवशी लंडन, पॅरिस आणि न्यूयॉर्क येथील वरिष्ठ कार्यालयात, नीटनेटक्या पोषाखातील अधिकारी मंडळी नाइलाजाच्या भावनेने इराणी फँटम आणि इराकी मिग विमानानी बसरा आणि आबादान येथील तेलकारखान्याना आणि पंपिंगकेंद्राना किती नुकसान पोहोचवले आहे याचा डॉलर आणि सेन्ट्समध्ये हिशोब करीत होती. तेलामुळेच आजचे जग फिरते आहे आणि म्हणूनच पाश्चात्य जगतापासून बऱ्याच दूर चालू असलेल्या या युद्धातील उतार-चढावावर पश्चिमी दुनियेचे भवितव्य हेलकावे खात होते. तरीही आमच्यापैकी फक्त काहीच्याच– त्यात मूठभर पत्रकार होते, काही शास्त्रज्ञ होते आणि सरकारी कचेऱ्यांतील गमतीदार वाटणारे लहान लहान लोक होते. नजरा आणि कान अगदी वेगळ्याच प्रकारच्या लक्ष्यावर केंद्रित झाले होते. त्याच लक्ष्याचा वेध करण्यासाठी ती दोन इराणी फँटम विमाने खाली सूर घेत होती. त्याना ते लक्ष्यच उध्वस्त करायचे होते.

विमानातून तरी ते लक्ष्य मोठेसे लक्ष वेधून घेणारे नव्हते. बगदादच्या पूर्वेला वारा मैलांवर ओलितामुळे हिरव्यागार वाटणाऱ्या त्या जागेवर थोडीशीच बैठी घरे होती; पण नीट लक्ष देऊन पाहिल्यास त्या वस्तीत एक मोठा काँक्रीटचा घुमट दिसत होता. करड्या रंगाच्या त्या काँक्रीट घुमटावर धूळच धूळ होती. अणुकेंद्रे दडविण्यासाठी आणि उभारण्यासाठी वापरतात तशाच प्रकारचा तो घुमट होता. इराकी लोक त्याला तुवैताह म्हणत. परमाणुसंशोधनकेंद्र तेथेच आहे. याच जागी इराकी शास्त्रज्ञ अरब विश्वाचा पहिला अणुबाँब तयार करण्याच्या कामात गुंतलेले होते !

या केंद्रावर हल्ला होईल याची इराकी नेत्याना कल्पना होती निदान त्यानी तसे जाहीर केलेले होते; परंतु बचावासाठी त्यानी सुयोग्य क्षमतेच्या प्रक्षेपास्त्रांचा तळ तेथे उभारलेलाच नव्हता. विमानवेधी तोफांचा एक लहान संच तेथे होता आणि तोच काय तो चाल करून येणाऱ्या जेट विमानांच्या हल्ल्यापासून रक्षण करण्याचा थोडा-फार प्रयत्न करीत होता.

फँटम विमाने लक्ष्यावर येताच त्यांनी रॉकेटसचा मारा केला. प्रचंड आवाज आणि गोंधळ उडाला. किती नुकसान झाले कुणालाच कळेना. सुरुवातीच्या घोषणा सांगत होत्या की, रॉकेटस्चा नेम हुकला आहे. तैमूझ–१ या प्रचंड अणुकेंद्रावर मारा झालाच नाही. जवळच्या इमारतीची थोडीशीच पडझड झाली आहे; परंतु नतर 'एक्स्प्रेस' या फ्रेंच नियतकालिकाने दावा केला की, 'अणुवीज' केंद्राच्या त्या घुमटावरच रॉकेट्सचा मारा झाला आणि संपूर्ण उभारणीचे फारच नुकसान झाले आहे या हल्ल्यामुळे इराकच्या परमाणु-कार्यक्रमाची किमान एक वर्ष तरी पीछेहाट झाली आहे. हा हल्ला झाला तेव्हा तैमूझ–१ चे बांधकाम पूर्ण व्हायचे होते आणि फ्रेंच तत्रज्ञ त्याच्या उभारणीत गर्क होते. या तंत्रज्ञाच्या मते आणखी तीन महिने तरी या अणुकेंद्रात उत्पादन झाले नसते. तथापि या केंद्रात फ्रान्सहून मागविलेली एक छोटी आणि रशियाकडून घेतलेली एक जुनी भट्टी मात्र त्या केंद्रात चालू होती आणि त्यांच्यावरच हा हल्ला झाला होता.

युद्धकाळात अणुवीजकेंद्रावर लष्करी हल्ला यापूर्वी कधीही झाला

नव्हता आणि हीच तर या हल्ल्याची अपूर्वता होती. हे जे अपूर्व होते, त्यामुळेच कदाचित 'द एक्स्प्रेसने' स्वतःचाच एक बॉंब टाकला असावा. कारण तीस फॅंटम विमाने मुळात इराणहून आलेलीच नव्हती असे या नियतकालिकाने म्हटले. त्याच्या मते ती इस्रायली विमाने होती आणि इराण–इराक युध्दाचा लाभ उठवून त्यांनी इराकच्या अणुबॉंबनिर्मितीकेंद्रासच उध्वस्त करून टाकले.

'द एक्स्प्रेस' मध्ये आलेली या हल्ल्याची कथा एखाद्या रहस्य-मालेतील कथानकासारखी सर्व मालमसाला भरलेली आणि थरारक होती. तीत म्हटले होते की, इस्रायलने आपली दोन 'एफ–४–इ' जातीची फॅंटम विमाने घेतली. त्याच्यावर असलेल्या इस्रायलच्या सर्व खाणाखुणा मिटवून टाकल्या. मग त्यांना सरळ पूर्वेकडे जॉर्डन आणि सीरियाच्या पलीकडे इराकमध्ये पाठविले. या विमानाचे सर्व उड्डाण अगदी खालून म्हणजे अवघ्या २५० फूट उंचीवरून होत गेले. हेतू हा की, शत्रूच्या राडारवर त्याचा मागोवा येऊ नये. एकदा तुवैताहवर पोचल्यावर मात्र वैमानिकानी अणुभट्टया असलेल्या त्या घुमटावर अचूक नेम धरून अग्निबाण सोडले. कारण तेथे बचावाची व्यवस्था अगदीच तोकडी होती. अशा प्रकारे हा हल्ला चढवून ती विमाने इस्रायलकडे कुणाच्या लक्षातही न येताच पसार झाली.

ही सर्व कहाणी खरी असल्याचे इराकचे संरक्षणमंत्री आदनन खेरल्ला यांनी आपल्या घोषणेत जाहीर केले. त्यांनी जाहीर केले की, हा हल्ला ज्यूनी अथवा इस्रायलनेच केलेला होता. या प्रकाराच्या दोन महिने आधी, जुलै महिन्यात इराकी प्रवक्त्यांनी, इराकच्या परमाणु–कार्यक्रमाबाबत इस्रायल निष्कारण 'प्रक्षोभक' विधाने करतो याचा धिक्कार केला होता. ही विधाने म्हणजे इराकवर आक्रमण करण्यासाठी इस्रायल शोधीत असलेली निमित्तेच आहेत असेही इराकने म्हटले होते. इराकी नेत्यांची ही भीती साधार असल्याचे सांगून त्याचे कारणही इराकी नेत्यानी दिले होते की, शत्रूजवळ इराकी भूमीवर सरळ मारा करू शकतील अशी अमेरिकन बाधणीची लढाऊ विमाने आहेत.

अधिकृत पत्रकात असेही म्हटले होते की, इस्रायल इराकमधील अणु–भट्टीवर हल्ला चढविण्याची तयारी करीतच होता. कारण तेणेकरून त्याला इराकच्या शास्त्रीय आणि तंत्रविज्ञानक्षेत्रीय विकासाला खीळ घालायची होती. इतकेच नव्हे तर या अरब राष्ट्राला या क्षेत्रात पुढे जाऊ द्यायचेही नव्हते; पण यापेक्षा आणखीही काही यामागे होते.

लंडनहून सुप्रतिष्ठित 'संडे टाइम्स'ने आपल्या वाचकांना आठवण करून दिली की, इराणमध्ये शाह रेझा पहेलवीच्या जमान्यात इस्रायलींनी इराणी विमानदलाला प्रशिक्षण देण्यास हातभार लावला होता आणि साहजिकच इराणच्या शहानी त्यांच्या इराकी शत्रूची बलस्थाने कोणकोणती आणि कुठे कुठे आहेत याबाबतची माहितीही इस्रायलींना पुरविली होती अशा माहितीमध्ये बगदादची विमान-हल्ल्यापासून संरक्षण करण्याची सिद्धता आणि क्षमता, तो प्रदेश आणि त्याची मर्मस्थाने याबाबतचीही वित्तंबातमी होती.

पॅरिसहून स्वतंत्र डावे दैनिक 'लिबरेशन'ने रहस्यभेद केला की, पेन्टॅगॉनमधील अमेरिकी लष्करी अधिकाऱ्यांना या युद्धात हवाई चाचेगिरीचे हल्ले होऊ शकतील अशी आधीपासूनच अपेक्षा होती.

तेलअवीवहून इस्रायली रेडियोने बातमी दिली की, तेहरानने या हल्ल्याचा इन्कार केला आहे.

आणि सर्वच बाजूनी एका गोष्टीची दखल घेतली की, इस्रायलच्या लष्करी हेरखात्याचे सरसेनापती जनरल येहोशुवा सॅग्वी यानी इराकच्या अणुभट्टीकेंद्रावर हल्ला चढवा असे इराणला जाहीर आवाहन करून या हल्ल्याची सारी तयारीच जणू पूर्ण केली होती. ते म्हणाले होते– 'मी इराणी असतो तर, १९८० नंतरच्या दशकात इराक अगदी निर्विवादपणे अण्वस्त्रधारी देश होणार आहे याची मलादेखील चांगलीच काळजी वाटली असती.' हा हल्ला झाल्यानंतर लगेचच या जनरल सॅग्वीने या हल्ल्यामुळे नेमके किती नुकसान झाले असावे याचा ताबडतोब हिशोबही सांगून टाकला. ते म्हणाले– 'या बॉंबहल्ल्यामुळे अण्वस्त्रधारी होण्याचे इराकचे मनसुबे किमान दोन–तीन वर्षे तरी मागे फेकले गेले आहेत!'

हा हल्ला इस्रायलनेच केला असे पटावे यासाठी देण्यात आलेली तर्कसंगत माहिती ही फक्त युक्तिवादावर आणि निदानालस्तीवर आधारलेली होती. फ्रान्सला इस्रायल बदनाम झाला तर हवाच होता आणि या सर्व तर्कवितर्कांचा उगम फ्रेंच गुप्त माहितीखाते होते; पण कोणीही एकही भक्कम पुरावा देऊ शकत नव्हते आणि त्यावरूनदेखील पहा ना, इस्रायली किती चतुर आहेत हेच सिद्ध होते असेच भासविण्यात येत होते. सहाजिकच ही सारी कहाणी काळाच्या ओघात लवकरच लोप पावली.

सत्य मात्र इतके रोमांचक नव्हते. पुढे पदच्युत करण्यात आलेले इराणचे राष्ट्रपती अबुलहसन बनी-सद्र यानी मान्य केले की, ती फॅंटम विमाने त्याची होती. बनी–सद्र हे इराणचे लष्कराधिपतीही होते. शिवाय तुवैताहवर ज्या प्रकारे हल्ला झाला तो प्रकार इस्रायलच्या अत्यंत निष्णात ख्यातीला साजेसा नव्हता. म्हणजे असे की, इस्रायलला जर खरोखरच तैमूझ–१ वर हल्ला करून इराकची परमाणुक्षमताच उध्वस्त करायची असती तर त्याने अगदी जबरदस्त आणि यशस्वी हल्ला एकदम अचानक चढवला असता; पण या हल्ल्यात दोनच रॉकेटस सोडण्यात आली. एक स्फोटच पावले नाही आणि दुसऱ्याने अणुभट्टी ज्या घुमटाखाली आहे त्या भवनाच्या घुमटालाच थोडा मार दिला आणि अत्यंत संवेदनक्षम अशी शीतलीकरणव्यवस्था निकामी केली; पण यापरते या अणुकेंद्राचे कोणतेही नुकसान झाले नाही. बगदादच्या परिसरातील एका वीजकेंद्रावर हल्ला करून परतत असलेल्या त्या दोन फॅंटम विमानांना जाता जाता संधी लाभली म्हणून त्यानी दोन रॉकेट्स टाकली एवढेच. योजना आखून एखाद्या लक्ष्यावर मारा करावा असे या हल्ल्याचे स्वरूपच नव्हते.

म्हणून इराकी परमाणुकेंद्रावरील हल्ले काही थांबले नाहीत. इराकी परमाणु–कार्यक्रमाचा इतिहासच अनेक संकटांनी भरलेला आहे. १९७९ मध्ये एप्रिलात कुणा अज्ञात घातपात्यानी फ्रेंच रिव्हिएरावरील तूलोनजवळील एका इंजिनियरिंग फर्मच्या हॅंगरमध्ये घुसून, इराकला पाठविण्यासाठी जहाजावर चढवण्यात यावयाच्या ओसिराक किंवा तैमूझचा सर्व गाभाच उडवून दिला! जून १९८० मध्ये ओसिराक परियोजनेमध्ये प्रमुख कामगिरी बजावीत असलेल्या एका इजिप्शियन परमाणु–इंजिनियरचा पॅरिसमधल्या त्यांच्या

हॉटेलातील खोलीत शिरून कुणा अज्ञात इसमाने दंडुक्यांनी खून केला! फ्रेंच आणि इटालियन इजिनियरिंग कंपन्यांना त्या ओसिराक परियोजनेला सामान पुरवीत असल्यामुळे ऑगस्टमध्ये अनेक बाँब-हल्ल्यांना आणि पत्राद्वारे व टेलिफोनवरून येणाऱ्या धमक्यांना तोंड द्यावे लागले. त्यामुळे सर्वत्र दहशत पसरली होती.

परंतु ७ जून १९८१ रोजी मात्र इस्रायलने इराकी अणुभट्टी-केंद्रावर जबरदस्त हल्ला चढवला. दुसऱ्याच दिवशी ज्यूंचा शावुआत नावाचा धार्मिक सण होता. साइनाई येथे मोझेसला ज्या दहा धर्माज्ञा देण्यात आल्या त्याची स्मृती म्हणून हा दिवस ज्यू लोक मोठ्या उत्साहाने साजरा करीत असतात. सहाजिकच बहुतेक इस्रायली सणाच्या मनःस्थितीत होते. सुटीच्या मूडमध्ये होते. रणांगणाचा विचार क्वचितच कुणाच्या मनात असेल! अनेकांनी यानिमित्त आलेल्या लांबलचक सुटीचा फायदा घेऊन आपापल्या घरी चक्क आराम करण्याचा विचार केला होता. अनेकानी आपापल्या नात-लगांना आणि मित्रांना भेटायला जाण्याचे, तर इतर काहीनी चौपाट्यावर जाण्याचे कार्यक्रम आखले होते.

माध्यान्हानंतर काही वेळाने ताबड्या समुद्राच्या काठी वसलेल्या सेलात या इस्रायली थंड हवेच्या ठिकाणी बर्था एडवर्ड आपला पती स्टीव्ह आणि गाय व क्लॉदिया या मुलांसह बसली असता अचानक-पणे तिने काही अंतरावरून इस्रायलची लढाऊ विमाने व्यूह बांधून सेलातच्या आखातापलीकडे वेगाने जाताना पाहिली. आखातापलीकडे ती विमाने सौदीअरबस्तानात निघून गेली. जॉर्डनच्या अकाबा नगराच्या दक्षिणेला सुमारे दहा किलोमीटरवर सौदीअरबस्तान आणि जॉर्डन यांच्या सरहद्दी मिळतात त्या ठिकाणावर ही विमाने झेपावताना दिसली. 'काही तरी आंतरराष्ट्रीय भानगड दिसते', बर्थाने विनोद फेकला होता; पण त्यानंतर तिने त्या विमानांकडे पुन्हा पाहिलेसुद्धा नाही! सेलात चौपाटीवर सहलीला जाऊन तेथेच स्वयंपाक करण्याच्या बेतात ती गढून गेली.

हा प्रकार घडला त्याच्या थोडा वेळ आधी इस्रायली पंतप्रधान बेगिन यांचे लष्करी सल्लागार ब्रिगेडियर जनरल इब्राहिम पोरान यांनी इस्रायल सरकारच्या प्रत्येक मंत्र्याला फोन करून सांगितले की, 'आज संध्याकाळी साडेपाच वाजता पंतप्रधान तुम्हाला भेटू इच्छितात' कशाकरता बुवा हे बोलावणे असे मनातल्या मनात विचार करीत आपले सर्व बेत रद्द करून सर्व मंत्री जरुसलेमला परतले. कुणाला वाटले पंतप्रधान नक्कीच आपला राजीनामा मागणार असावेत!

मंत्र्यांच्या गाड्या भराभरा येऊ लागल्या. जरुसलेमच्या जेहाविया भागात बेगिन यांचा बंगला दुतर्फा वृक्षांच्या राईत होता. इस्रायली गुप्त-पोलीस-विभागाची माणसे समोर आली आणि त्यांनी मंत्र्यांच्या ड्रायव्हरांना आपापल्या गाड्या शहरात पांगून पार्क करण्याच्या सूचना दिल्या. हेतू हा की, इथे काही तरी गडबड दिसते याची कुणालाही कल्पना येऊ नये. बेगिन यांच्या माजघरात मंत्र्यांची बैठक भरली. अचानक योजलेल्या पार्टीचे स्वरूप तिला आले होते. 'अरे तुम्ही इथे कसे?' हाच प्रश्न मंत्री चकित होऊन एकमेकांना विचारू लागले. कारण प्रत्येकाची कल्पना होती की, पंतप्रधानांनी फक्त आपल्याला एकट्यालाच भेटीस बोलावले आहे.

काही क्षणातच पंतप्रधान बेगिन माजघरात आले. आपल्याला काय सांगायचे आहे ते त्यांनी कोणतेही प्रास्ताविक न करता एकदम मुद्द्यावर येऊन सांगून टाकले. सणासुदीच्या आदल्याच दिवशी दिलेला तो एक चकित करून टाकणारा संदेशच होता. अतिशय गंभीर आवाजात बेगिन यांनी जाहीर केले, 'आपली लढाऊ विमाने बगदादच्या वाटेवर आहेत!'

उपस्थितांपैकी एकाला वाटले बेगिन दमास्क्स म्हणत आहेत. सीरियाविरुद्ध इस्रायलचा गंभीर लढा खुल्लमखुल्ला चालूच होता. लेबेनॉनमध्ये दक्षिण भागात प्रक्षेपास्त्रे बसविण्याची प्रक्रियाही चालू होती. त्यामुळे या इसमाला कळेना की, पंतप्रधान सीरियाच्या राज-धानीवर सरळ बाँबहल्ला का करायला निघाले आहेत. प्रक्षेपास्त्रे काढून टाकणे वेगळे आणि सरळ दमास्कसवरच हल्ला चढवणे वेगळे!

पण हा गोंधळ फार काळ टिकला नाही. इस्रायली विमाने ठरल्या दिशेने केव्हाच निघालेलीही होती. त्यांचे लक्ष्य होते बगदादजवळ तुवैताह येथे इराकने परमाणु-कार्यक्रमासाठी जो कारखाना उभा केला होता तो याच ठिकाणी इराकने परदेशाकडून विकत घेतलेली अत्यंत बहुमोल अशी तैमूझ-१ ही परमाणु भट्टी होती आणि तीच कालांतराने इराकला अणुबाँब तयार करून देणार होती! ते सर्व केंद्र पार उध्वस्त करून टाकण्यासाठी, कुणाच्या ध्यानी-मनीही नस-ताना अगदी सर्व शक्तीनिशी अभूतपूर्व असा संपूर्ण नि:पात करणारा हल्ला ही विमाने त्या भट्टीवर चढवणार होती!

## प्रत्यक्ष हल्ला तंतोतंत योजनेबरहुकूम झाला. संध्याकाळी चारच्या सुमारास अमेरिकेकडून

या हल्ल्याची लष्करी योजना अगदी बारिकसारिक तपशिलासह किती तरी दिवसांपासून चालू होती. अडचणी अनंत होत्या. १९६७ च्या सहा दिवस चाललेल्या युद्धात इस्रायली विमानदळाला त्या अड-चणींचा अनुभव आलेला होता. जॉर्डनच्या सीमेलगत असलेल्या इराकच्या 'एच-३' या नावाने ओळखल्या जाणाऱ्या भागावर बाँबहल्ला करण्यासाठी इस्रायली विमाने गेली असताना त्यांनी इराकची अनेक विमाने नेस्तनाबूत केली होती हे तर खरेच; पण तसे करताना त्यांनाही आपली दोन 'व्हॉटर्स' आणि एक 'मिराज' विमान गमवावे लागले होते तैमूझ किंवा ओसिराक केंद्रावर हल्ला तर त्याहूनही कठिण असणार होता म्हणून इस्रायली विमानदळाच्या नियोजनकारांना खूपच सावधगिरी घ्यावी लागणार होती.

इस्रायलच्या उड्डाणतळापासून इराकमधल्या 'ओसिराक' लक्ष्या-पर्यंतच्या मार्गावर वाटेत अरबांचे सात अतिशय दक्ष आणि सुसज्ज असे विमानतळ होते. आपल्या आकाशात येणाऱ्या परकी विमानांची त्यांनी धडगत ठेवलीच नसती. विशेषत. जॉर्डनजवळ असलेल्या 'एफ ५-ई' किंवा खुद्द इराकजवळ असलेल्या 'मिराज-४०००', 'मिग

२३ ' आणि मिग-२५ ' या वेधक आणि भेदक लढाऊ विमानांचा इस्रायली विमानांना चांगलाच धोका होता. तेव्हा इस्रायली नियोजनकारांसमोर आधी ' लक्ष्यापर्यंत ' पोहोचण्याचा सर्वांत चांगला मार्ग निवडण्याचे काम होते. प्रत्यक्ष ' लक्ष्यावर ' पोहोचल्यानंतर इराकने फ्रान्सकडून मिळविलेल्या ' रोलाँ ' आणि रशियाकडून घेतलेल्या ' साम ' या जमिनीवरून हवेत मारा करणाऱ्या प्रक्षेपकास्त्रांना तोंड देण्याची योजनाही आखावी लागणार होती. प्रत्यक्षात आपली किती विमाने मोहिमेवर पाठवायची, कोणती पाठवायची, गरजेनुसार हवेतल्या हवेतच त्यांना इंधन-पुरवठा कसा करावयाचा आणि सर्वांत महत्त्वाचे म्हणजे अत्यंत मजबूतपणे उभारलेला तो घुमट फोडून आतली अणुभट्टी उध्वस्त कशी करायची हेही ठरवावे लागणार होते. हे सर्व व्यवस्थित आखून घेण्यास कित्येक आठवडे व महिने लागले दरम्यान फ्रेंच आणि इराकी मंडळींनी चालवलेल्या हालचालींमुळे इस्रायलची झोप उडाली होती. ओसिराक अणुभट्टी—केव्हा या मुद्द्यावर नंतर वाद माजणारच होता—लवकरच ' तापणार ' होती. ती तापून उत्पादन देऊ लागण्याच्या आधीच तिचा विध्वंस केलाच पाहिजे असे इस्रायलींनी ठरवले होते.

हा राजकीय निर्णय करणे तसे सोपे मुळीच नव्हते. सहाच महिन्यापूर्वी म्हणजे डिसेंबर १९८० मध्ये इस्रायली पंतप्रधान बेगिन यांनी इराकच्या या अणुभट्टीवर बाँबहल्ला करण्याच्या शक्यतेवर विरोधी पक्षनेत्यांशी चर्चा केली होती. लेबर पार्टीचे अध्यक्ष शिमॉन पेरेस हे विरोधी पक्षनेते होते. त्याची लोकप्रियता चढतीवर होती आणि आगामी इस्रायली निवडणुका ते जिंकणार असा समज पसरू लागलेला होता. बेगिन याच्या अपेक्षेप्रमाणेच पेरेस यांनी या कल्पनेला विरोध केला. तसे पाहिले तर शिमॉन पेरेस हा काही लेचापेचा माणूस नव्हता. इस्रायलच्या अण्वस्त्रसामर्थ्याचा तोच शिल्पकार होता पण माणूस अत्यंत सावध होता. इराक अण्वस्त्रधारी देश बनेल आणि त्यामुळे इस्रायलला जो धोका निर्माण होईल, त्यापेक्षा, अशा मुळावरच घाव घालण्याची पहिली संधी म्हणून पत्करण्यात यावयाच्या अवचित बाँबहल्ल्यामुळे, राजनैतिक संबंधात इस्रायलची जी कोंडी होईल तिचा धोका जास्त गंभीर आहे. कारण इस्रायल विश्वमतामध्ये एकाकी पडण्याचा संभव राहील. शिवाय अशा अवचित हल्ल्यामुळे अरब देशांना याहूनही जास्त अण्वस्त्र-सामर्थ्य प्राप्त करण्यास चेव येईल, असे त्याचे मत पडले. त्याने बेगिन याना तसे पत्र लिहून कळवलेही.

शिमॉन पेरेसने हे पत्र १० मे रोजी लिहिले त्याच दिवशी फ्रान्समध्ये राष्ट्रपतीची निवडणूक व्हायची होती आणि संकल्पित बाँबहल्ल्यासाठी बेगिन यांनी हीच तारीख निवडली होती. पेरेस यांनी लिहिले—' आपण ठरवलेली तारीख काही वास्तववादी आहे असे मला वाटत नाही. तुम्ही आज एक सामग्री नष्ट कराल; पण तिच्या जागी दुसरी सामग्री येऊ शकेल आणि ज्याला आपण आळा घालू इच्छितो, त्याचाच नेमका प्रसार होत जाईल. आपण या भरीस पडू नका अशी माझी कळकळीची विनंती आहे. अन्यथा इस्रायल एकाकी पडेल, वाळवंटातल्या झाडासारखा ... हे असे करू नका असे मी तुम्हाला बजावतो आणि असा इशारा देणारा मी एकटा नाही हेही आपण लक्षात घ्यावे. असे काहीही करू नका. निदान आजच्या घटकेला आणि आजच्या परिस्थितीत तरी नकाच ! '

पण अखेरचा निर्णय इस्रायल सरकारनेच करायचा होता. विशेषतः मंत्रिमंडळाची जी एक संरक्षणविषयक खास समिती होती तिनेच हा निर्णय करायचा होता. स्वतः बेगिन हल्ला करावा या मताचे होते. त्याचे परराष्ट्रमंत्री झियाक शामीर आणि कृषिमंत्री माजी युद्धवीर एरील शेरॉन हेही त्याच मताचे होते. या कल्पनेच्या प्रमुख विरोधकात इस्रायलमध्ये नेहमीच प्रभावशाली रहात आलेल्या धार्मिक पक्षाचे दोन प्रतिनिधी शिक्षणमंत्री झोवुलुन हॅमर आणि मुरब्बी गृहमंत्री युसुफ बर्ग हे होते लष्करी कारवाईचा प्रश्न निघाला रे निघाला की ही माणसे एकाएकी मोठीच शांततावादी बनत असत हे एक आश्चर्यच आहे. उपसंरक्षणमंत्री मोर्देचाई झिपोरी यांना असा बाँबहल्ला करणे तत्त्वतः मान्य होते; परंतु त्यासाठी ठरवलेली तारीख पसंत नव्हती. त्याचे म्हणणे असे होते की, अमेरिकेत नुकत्याच सत्तारूढ झालेल्या रिगन प्रशासनाशी इस्रायलचे लष्करी क्षेत्रातील संबंध उत्तरोत्तर चांगले होत असताना आपल्या अशा हल्ल्यामुळे त्यात निष्कारण गुंतागुंत निर्माण होईल.

शेवटी मतदान झाले आणि मंत्रिमंडळाने ओसिराक अणुकेंद्रावर अवचित तुफानी बाँबहल्ला चढविण्यास इस्रायलला हिरवी झेंडी दाखवली. जहालपंथी शेरॉनने नंतर ' मारीव ' इस्रायली वृत्तपत्राला दिलेल्या मुलाखतीत म्हटले— ' इस्रायलच्या इतिहासात त्याच्या कोणत्याही सरकारपुढे इतका कठीण निर्णय घेण्याची वेळ यापूर्वी आली नव्हती. ' आता दिवस आणि तारीख ठरविण्याचे काम पंतप्रधान बेगिन, परराष्ट्रमंत्री शामीर, लष्कराचे मुख्य सेनापती रफाएल ऐतान या तिघांवर सोपवण्यात आले आधी १० मे ठरली होती; पण फ्रेंच निवडणुकामुळे ती बदलण्यात आली. आणखीही एक-दोन तारखा उगाच चाळा म्हणून सुचवण्यात आल्या; पण अखेरीस शावुआतच्या आदल्या दिवशी, रविवारी ७ जून रोजो हा हल्ला करण्याचे आदेश बेगिन यांनी दिले.

**मिळविलेल्या ' एफ-१६ ' तांड्यातील आठ विमाने एत्झिऑन विमानतळावरून निघाली.**

प्रत्यक्ष हल्ला अगदी ततोतंत योजनेबरहुकूम झाला. संध्याकाळी चारच्या सुमारास अमेरिकेकडून मिळवलेल्या ' एफ १६ ' विमानांच्या ताड्यातील आठ इस्रायली विमाने साइनायमधल्या एत्झिऑन विमानतळावरून निघाली. ही लढाऊ विमाने अतिशय वेगात असतानाही शत्रु विमानाशी झोंबाझोंबी करण्यासाठीच मुद्दाम बनविण्यात आली होती. या विमानात खूप दूरवर जाता यावे म्हणून जादा इंधनटाकी बसविलेल्या होत्या. शिवाय बाँब ठेवण्यासाठी जादा अलमाऱ्याही होत्या. त्यात दोन दोन हजार पौंडी ' एम के- ८४ ' जातीचे लोखंडी बाँब ठेवण्याची सोय होती.

हवेत उडाल्यानंतर या ' एफ- १६ ' विमानांना रक्षक म्हणून

सहा 'एफ–१५' जातीची विमाने मदतीला मिळाली. ही विमाने कोणत्या कामगिरीवर निघाली आहेत याची यदाकदाचित अरबांना कल्पना आली तर त्याच्या विमानाचा अचूक भेद करण्याची सर्व युद्धसामुग्री या रक्षक विमानात होती. खास मोठाल्या इंधनटाक्या असलेली आणखी काही 'एफ १५' विमानेही इस्रायलने या मोहिमेवर मुख्य ताफ्याच्या मदतीला ठेवली होती. हवेतच गरज भासल्यास विमानात पुन्हा वरच्या वर इंधन भरण्याची यामुळे सोय झाली होती लक्ष्यावर जाऊन हल्ला करून पुन्हा मायदेशी परत येण्यासाठी या विमानाना १८०० किलोमीटरचा प्रवास करावा लागणार होता. शिवाय प्रत्यक्ष बाँबहल्ला करताना जास्त इंधन खर्च होत असते. ते सर्व जमेस धरता 'एफ–१६' विमानाची इंधनक्षमता अगदी शेवटच्या थरापर्यंत वापरली जाणार होती. म्हणूनच आखून दिलेल्या मार्गाहून थोडे जरी बाजूला जावे लागले असते, शत्रु-विमानांशी मधेच दोन हात करावे लागले असते किंवा लक्ष्यावर गरजेपेक्षा जास्त घिरट्या घालाव्या लागल्या असत्या तर या विमानांना पुन्हा इंधन-पुरवठा घ्यावा लागला असता आणि ते काम शत्रूच्या आकाशात करावे लागले असते.

म्हणून सर्व ती दक्षता घेऊन आठ एफ–१६ आणि सहा एफ–१५ अशा चौदा विमानाचे पथक अकाबाच्या आखातावरून पलीकडे जॉर्डन सीमेलगतच्या सौदीअरबस्तानाच्या उत्तर भागावरून पुढे निघाले एव्हाना जनरल सॅग्वीच्या लष्करी हेरखात्याने अरब देशाच्या राडार-प्रणालीमधील अंधस्थाने हेरली होती आणि इराणच्या आखातापलीकडे रोखलेली सौदीअरबस्तानातील अमेरिकेची आगाऊ इषारा आणि आदेश देणारी विमाने आपल्या विमानापासून खूपच दूर आहेत हेही लक्षात घेतले होते त्यामुळे त्या विमानांपासून इस्रायली विमानाना कोणताही त्रास होण्याचा संभव नव्हता. या हेरखात्याने त्या भागावरून उडणारी व्यापारी वाहतूक विमाने कशी दिसतात आणि जॉर्डन व सौदी विमानाच्या त्या भागात उडण्याच्या वेळा कोणकोणत्या आहेत याचीही सचित्र माहिती कळविली होती.

या माहितीच्या आधारे इस्रायली विमानांचा आक्रमक ताफा अगदी जवळजवळ अंतराने गोट बांधून प्रवास करीत होता. असे करण्यातील हेतू हा की, अरबांच्या राडारवर ती विमाने दिसली तर ती एकच मोठे वाहतूकविमान आहे असेच चित्र राडारवर यावे. एकदा इराकच्या आकाशात प्रवेश करताच ही विमाने भयंकर वेगाने बगदादच्याही पलीकडे तुवेताहच्या दिशेने घोघावत गेली. तसे करताना त्यांनी आपले उड्डाण खूपच कमी उंचीवरून नेले. हेतू हा की, राडारवर ती दिसूच नयेत. आणखी एक चालाखी करण्यात आली. आधी एका एफ–१५ विमानाने जोराचा आवाज केला. एखादी विमानवेधी तोफ सोडण्यातच आली तर ती अंगावर घेण्यासाठी असे करण्यात आले. तोवर एफ–१६ विमाने उंच गेली आणि त्यातील वैमानिकांनी बरोबर नेम धरून मावळत्या सूर्याच्या नेपथ्यावर ओरिसाकच्या घुमटावर सूर मारला आणि घुमटाच्या कमजोर स्थानावर बाँब टाकले.

अनेक महिने सराव करून इस्रायली वैमानिकांनी हे तंत्र अगदी सूक्ष्ममापक अचूकतेने आत्मसात केले होते. हा सराव त्यांनी सिनायच्या वाळवंटात लुटुपुटीच्या लक्ष्यावर संधान बांधून केलेला होता. घुमटाच्या उभारणीतील मर्मस्थाने कोणती आहेत याची जी माहिती त्यांना हेरखात्याने आधीच दिली होती तिच्या अनुषंगानेच हा सराव केलेला असल्यामुळे त्याचा हल्ला यशस्वी झाला. घुमटाच्या बाजूच्या वर्मांवर प्रहार करण्यात आणखी एक हेतू हा होता की, त्या गोलाकार घुमटावर आपटून बाँब परत उसळी घेऊन भलतीकडे जाऊ नयेत. कारण घुमटाच्या बांधणीत शिसे आणि काँक्रीट ओतण्यात आले होते. म्हणून या घुमटावर आधी टाकण्यात आलेल्या बाँबचे स्वरूप विलंबाने स्फोट पावणारे बाँब असे होते. हे बाँब येऊन आदळल्यावर काही सेकंदांनी स्फोट पावले. त्यानी घुमटाच्या शिसे आणि काँक्रीटच्या मिश्रणात आधी मुसंडी मारली आणि आत शिरल्यावर मग त्यांचा स्फोट झाला. परिणामी घुमटामध्ये चांगली मोठमोठाली भगदाडे आणि भोके पडली. त्यापाठोपाठच कोसळलेली बाँबची दुसरी फेरी अगदी टाचणीच्या टोकावर नेम धरून मारावा इतक्या अचूकपणे काही सेकदातच आली आणि त्या बाँब्सनी आतली अणुभट्टी उध्वस्त केली

याआधीचा हल्ला सप्टेंबरमध्ये झाला होता आणि तेव्हापासून इराकी नेत्यांनी अणुभट्टीच्या तिन्ही बाजूना मातीचे मोठमोठे डोंगरच उभारून घेतले होते; परतु जमिनीवर तैनाती इराकी सैनिकांना, त्याची क्रोटेल आणि रोलां ही जमिनीवरून हवेत मारा करणारी प्रक्षेपास्त्रे उडवताच आली नाहीत आणि विमानवेधी तोफांचा एक लहानसा सच तेथे होता तो इस्रायलची ती आठ 'एफ–१६' विमाने जणु सूर्यबिंबातून सरळ आपली शिकार साधण्यासाठी बाँब टाकीत खाली आली तेव्हा, हवेत निरुपद्रवी 'अॅक–अॅक' करीत राहिला आणि ती विमाने आपली शिकार साधून परत निघूनही गेली !

काही दिवसानंतर जीन–फ्रँकॉइस मॅस्किओला नावाच्या एका फ्रेंच इलेक्ट्रिशियनने आम्हाला सांगितले, 'त्या विमानांनी अचूक बाँबफेक केल्याचे मी माझ्या डोळ्यांनी पाहिले. मी ओसिराक परियोजनेवरच कामाला होतो. त्यांनी ते काम फारच उत्तम रीतीने केले. अगदी बिनचूक मारा केला.' मॅस्किओलाने तो प्रसंग जणु काही आता आपल्या नजरेसमोर घडतो आहे इतक्या व्यवस्थितपणे आम्हाला सांगितला. तो म्हणाला– 'इराकी उगीचच काळवंडलेल्या आकाशात दिसेल त्याच्यावर आग ओकीत होते; पण तेथे काहीही नव्हते. दोन मिनिटांच्या आत ती विमाने निघूनही गेली होती !'

आणखी एका फ्रेंच तंत्रज्ञाने सांगितले, 'बाँबहल्ला झाल्याबरोबर घुमटातून सिमेंटचे लोटच्या लोट उडाले आणि लगेचच अणुभट्टीला आत कुठे तरी भयकर आग लागली. अणुकेंद्राची इमारत पीसा–मनोऱ्यासारखी एकीकडे झुकली, कदाचित त्याहूनही जास्तच झुकली असेल. तिसरा फ्रेंच तंत्रज्ञ दॅमिन चॉसोपिए भट्टीच्या अत्यंत कठिण अशा शीतलीकरण कामगिरीवर होता. तो बाँबहल्ल्यात ठार झालेला आढळून आला.'

पंतप्रधान बेगिन मुख्यालयाशी सतत संपर्क राखून होते. हे मुख्यालय या मोहिमेत 'कुठून तरी' काम करीत होते. विमानदलाकडे ही कामगिरी सोपवली असली तरी त्याबाबतचे आदेश नेहमीच्या पायरी–पायरीने न देता सरळ मुख्यालयानेच अगदी कमीत कमी लोकांना दिले होते. हेतू हा की, अशी काही कामगिरी विमानदलावर सोपवली आहे याची माहिती फारच थोड्या लोकाना असावी.

एकदा तर—म्हणजे नेमके केव्हा ते कुणालाच स्मरतही नाही—मुख्यालयातून कुणी तरी उद्गारले— 'सर्व कामगिरी अगदी स्विस घड्याळासारखी किंबहुना त्याहीपेक्षा जास्तच बिनचूक पार पडली आहे !'

अखेरीस सरसेनापती रफाएल ऐतान याना सर्वजण राफुल म्हणत—यानी फोन उचलला आणि ते स्वतः पंतप्रधान बेगिन यांच्याशी बोलले 'कामगिरी अगदी सोळा आणे फत्ते झाली असून आपली पराक्रमी पोरे आता आपल्या घरी परतली आहेत !' असे त्यानी बेगिन याना सांगितले.

पंतप्रधानानी ताबडतोब आपल्या मंत्रिमंडळाला ही बातमी दिली, 'आपली विमाने शांतपणे परत येत आहेत !' ऐकून खोलीत सर्वांनी सुटकेचा श्वास टाकला; परंतु इतक्यातच हे यश साजरे करण्याची वेळ आली नव्हती. या हल्ल्याचे परिणाम फार भयंकर होतील हे प्रत्येक जण चांगले जाणून होता. इस्रायलीना आपल्या स्वतःच्याच अत्यंत अशांत इतिहासाच्या अनुभवावरून चांगले ठाऊक होते की, लष्करी विजयाच्या पाठोपाठ राजनैतिक विजयही येतोच असे नाही !

दुसऱ्या दिवशी, म्हणजे ८ जूनला दुपारी सरळ पंतप्रधान—कचेरीतूनच एक पत्रक जाहीर करण्यात आले— 'रविवार दि. ७ जून, १९८१ रोजी इस्रायली विमानदलाने बगदादजवळच्या ओसिराक अणुकेंद्रावर हल्ला केला. आमच्या वैमानिकानी ही कामगिरी यशस्वीपणे पार पाडली. अणुकेंद्राचा पार विध्वंस झाला आहे आणि आमची सर्व विमाने सुखरूप आपल्या तळावर परत आली आहेत.'

जरुसलेमच्या बेइत आगरोन या सरकारी प्रसिद्धीकेंद्रात विजयोत्सवी पत्रकारपरिषदेत प्रचंड उत्साह संचरला होता. गोष्ट हल्ल्यानंतरच्या मंगळवारची. कारण सोमवारी शावुआत सणाची सुट्टी होती. या सर्व प्रकरणातील वीरपुरुष म्हणून बेगिनच सर्वांच्या आकर्षणाचा केंद्रबिंदु बनले होते. बेइत आगरोनच्या प्रेक्षागारात त्यानी खूपच आत्मविश्वासाने प्रवेश केला आणि वार्ताहराना त्यानी सांगितले की, 'आमच्या विमानानी बगदादला दिलेली 'भेट' पूर्णपणे समर्थनीयच होती !'

'कोणत्याही अरब देशाने, कोणत्याही अरब शत्रूने इस्रायलविरुद्ध अण्वस्त्रे तयार केलेली इतःपर इस्रायला अजिबात खपणार नाही असा या हल्ल्याचा अर्थ आहे का ? आणि असल्यास ते इस्रायलचे नवे धोरण मानायचे का ?'— प्रश्न आला.

हजरजबाबी बेगिन ताबडतोब म्हणाले— 'असे मी कुठे म्हटले आहे ? मी इतकेच म्हणालो आहे की, कोणाही शत्रूने—अरब देशाने नव्हे—इस्रायली लोकांच्या प्रचंड संहाराची शस्त्रे वा अस्त्रे बनविली तर ते इस्रायल कधीही खपवून घेणार नाही !'

'आणि इराकी लोकानी पुन्हा अणुभट्टी उभारली, तर ?'

'ज्यातून उद्या अणुबाँब तयार करता येईल अशी अणुभट्टी इराकीनी पुन्हा उभारली तर त्या भट्टीचाही विध्वंस करण्यासाठी इस्रायल त्याला शक्य असेल ते जरूर करेल !' बेगिन यानी उत्तर दिले.

'लीबियालाही हेच धोरण लागू राहील काय ?' आणखी एक प्रश्न.

'आधी त्या एकाच मेशुगेन्नाह (माथेफिरू इसम) सद्दाम हुसेनचा बंदोबस्त करू या !' बेगिन चटकन उत्तरले, 'दुसऱ्या मेशुगेन्नाहचे (लीबियाचे नेते कर्नल गदाफी) काय करायचे ते पुढे केव्हा तरी पाहू !'

□

पाकिस्तान तसा इस्रायलपासून बराच दूर; पण तरीही त्याने जो परमाणु—कार्यक्रम हाती घेतला होता आणि त्यात त्याची जी प्रगती होत होती, त्यामुळे इस्रायललाही चिंता वाटू लागलेलीच होती. बेगिन यानी आपल्या पत्रकार परिषदेत पाकिस्तानचे नाव घेतले नाही; परंतु दोनच आठवड्यापूर्वी, २७ मे रोजी संयुक्त राष्ट्रातील इस्रायलचे राजदूत येहूदा ब्लुम यानी सं. रा. सरचिटणीस कुर्त वाल्दहाइम याना एक टिपण पाठवले आणि त्यात स्पष्ट इशारा दिला होता की, पाकिस्तान पहिला अणुबाँब तयार करण्यासाठी पुरेसे होईल इतके प्लूटोनियम उत्पादन करू शकण्याच्या अवस्थेला जवळजवळ आला आहे. इस्रायलने दिलेल्या या इशाऱ्याबाबत संयुक्त राष्ट्रांनी करण्यासारखे काहीही नसले तरी इस्रायलने या संबंधात आपल्याला वाटणारी काळजी व्यक्त केली होती हे लक्षात घेण्यासारखे आहे.

'असाच प्रसंग पुन्हा आल्यास काय करायचे तेही आम्हाला ठाऊक आहे !' किर्यात ओनो या नव्या विकासनगरात काही शाळकरी मुलांशी गप्पागोष्टी करताना इस्रायलचे सरसेनापती रफाएल ऐतान म्हणाले, 'आणि तो प्रसंग पुन्हा इराकच्याच बाबतीत येईल असे नाही, ती पाळी आणखीही कुणाची तरी असू शकेल !'

बेगिन बेइत ओगरोनमधल्या त्या पत्रपरिषदेतून बाहेर पडले तेव्हा प्रत्येकाला कळून चुकले की, पश्चिम आशियातील राष्ट्रांनी अण्वस्त्रधारी होण्याचा प्रश्न ओसिराक अणुकेंद्रावरील हल्ल्याबरोबर संपलेला नाही आणि तो प्रश्न सोडवण्याचा इस्रायलचा मार्ग अगदी सरळसोट असा आहे; पण एक गोष्ट मात्र स्पष्ट झाली नाही की, या हल्ल्यामुळे इस्रायलची स्वतःची संरक्षणक्षमता दुर्बल झाली की सुदृढ ? यामुळे इजिप्त आणि इस्रायल यांच्यात शांतता स्थापन करण्याच्या प्रक्रियेला खीळ बसणार नाही का ? जगातील राष्ट्रसमूहात इस्रायल आपल्या या एकांडेपणामुळे एकाकी पडणार नाही का ? कारण बहुतेक राष्ट्रांनी इस्रायलच्या या कृत्याचा धिक्कार केला होता. खुद्द इस्रायलमध्ये विरोधी पक्षनेते शिमोन पेरेश यानी नेमके हेच भय व्यक्त केले होते.

ते काहीही असले तरी या हल्ल्यामुळे परमाणु—युद्धाबाबतची जागतिक भीती आणखी वाढली आणि त्याचबरोबर काही चांगले परिणामही पुढे आले. अणुबाँब-निर्मितीसाठी मदत करणाऱ्या पाश्चात्य राष्ट्राना याबाबत कोणतीही काळजी कशी वाटत नाही—आणि म्हणूनच ते किती बेजबाबदारपणें वागतात—ते अतिशय नाट्यमयरीत्या जगजाहीर झाले. कारण या पाश्चात्य देशानी मदत केल्याशिवाय तृतीय जगतातील कोणता देश अणुबाँब तयार करू शकणार आहे ? आंतरराष्ट्रीय अणुशक्ती एजन्सीपुढे या हल्ल्याने अण्वस्त्रतंत्रविज्ञानाच्या प्रचार प्रसाराला आळा घालण्याचे आव्हान उभे केले. याशिवाय विसाव्या शतकाच्या अखेरी अखेरीस मानवसमाजापुढे जो महत्त्वाचा प्रश्न आ वासून उभा राहणार आहे त्याचे उत्तर आतापासूनच शोधले पाहिजे ही निकड स्पष्ट झाली. तो अत्यंत महत्त्वाचा प्रश्न आहे—अणुबाँब बनविण्याचे तंत्रज्ञान अगदी नव्याने जन्माला आलेल्या राष्ट्रांच्या एका गटाला-विशेषतः अत्यंत ज्वालाग्राही पश्चिम आशियाला मिळू नये यासाठी काय करावे ?

(क्रमशः)



# दोन पराभव

**एक ग्रामीण, दुसरी शहरी, पण मोडून पडणं तेच !**

● संजय संगवई ●

दिवाळी अवघी पाच-सहा दिवसांवर आली. दुपारचाच माधव फाटक ओलांडून ओक्साबोक्शी रडत धावत आला.

'आई, ओ आई होऽ, मारलं त्यांनी माझ्या बहिणीला मारून टाकलं... जीव घेतला हो !' माझी आई माधवला समजावू लागली. दोन दिवसांपूर्वीच त्याची बहीण वारल्याचा निरोप गाववाल्यांनी खोलीवर आणून ठेवला होता. त्याची सर्वांत मोठी बहीण फुलंब्रीशेजारच्या एका खेड्यात दिली होती. तिला दोन लहान पोरंही होती. घरातली सर्वात मोठी मुलगी; कर्जेवार काढून हुंडा देऊन बऱ्यापैकी स्थळ बघून पोर उजवून टाकली.

माधव हळूहळू शांत होत असताना त्याला थोपटत असताना मी विचारलं–

'काय रे माधव, हुंडा कमी पडला म्हणून मारलं का ? वागणूक आवडत नव्हती म्हणून मारलं ?

–उमाळा दाबत तो म्हणाला,

'दादा, सगळं चांगलं केलं हो. नौकरी सोडून पाच–सहा महिने मजूरी करून पैसा जमा केला. 'माझी बहीण सतीसारखी होती. सगळं निभावून नेत होती एकट्यानं!'

'मग ?'

'त्या लोकांना पैशे पाहिजे होते आनखी ! तिला त्रास द्यायचे, मारायचे. बहीण घरी येऊन राहिली. आईनंच तिला पाठिवलं सासरी; म्हटली का तुझं घर तेच आहे !'

'दादा, त्या लोकांना पैशे पाहिजे होते तर त्यांनी मागायला पाहिजे होते. असं मारायला नको होतं. घरी गेलो तर बहिणीच्या गळ्यावर दोऱ्यांचे वळ पाहिले. डोक्याच्या मागच्या बाजूची माती (मांस) निघाली– मुठी आवळल्या होत्या. मान लटकत होती. काही गाववाल्यांनी गुपचूप सांगितलं की, ती मेली नाही तिला मारलं– मारून टाकलं हो ऽ!'

– परत ते हुंदके सुरू झाले.

'अरे, तक्रार का केली नाहीस ?'

'कुनाला करावं दादा ! ज्या दिशी ताई गेली त्याच्या दुसऱ्या दिवशी सकाळी पोलीस पाटलाला व सर्व्या मोठ्या मंडळीला चहाला बोलावून पटवून ठेवलं त्यांनी ! चहाला गेलेल्या काही माणसांनीच मला तसं म्हटलं ! गावातल्या डाक्टराला तर त्याच संध्याकाळी पैसे देऊन औरंगाबादला पाठवून दिलं !'

–ती संध्याकाळ कशी होती ?

माधवची बहीण दिवसभर वावरात काम करून गवताचा भारा बांधून निघाली, तेवढ्यात नवऱ्यानं व सासूनं येऊन, तोंड दाबून दोरखंडानं गळा दाबला. अंधार पडला 'ही गेली कुठे ?' असं म्हणत शोधाशोध सुरू केली. शेतात ती दिसली ! भुमका उठवली की, शेतात पडून ती मेली.

– माधव शहरात एक छोटी सरकारी नोकरी करतो. आई–वडील, चार भाऊ, बहिणी. अजिंठ्याशेजारच्या वाडीत थोडी-फार शेती करत तगून आहेत. इतक्या सर्व भावंडांचं शिक्षण त्याला करायचंय. बाकीच्या बहिणींची लग्नं लावून द्यायची आहेत. पगार साडेपाचशे रुपये. कोणाकोणाशी, किती दिवस भांडणार ?

– माधव गप्पच राहिला. मधूनमधून उगीच त्याला बहिणीचा तो विद्रूप चेहरा आठवतो.

□

— २ —

आता हे तर जिल्ह्याचंच गाव. प्रत्यक्ष विभागीय मुख्यालय! कमिशनर्स, कलेक्टर, सी. ओ आदि बडी, सुसस्कृत मडळी राहणारी.

त्यातच इथे एक असिस्टंड कलेक्टर राहतात परप्रातीयच आहेत. छानपैकी नवरा–बायको, दोन हुशार–खट्याळ पोरं! सर्वांनाच या कुटुबाच कौतुक वाटतं असिस्टट कलेक्टरसाहेब अत्यत कार्यक्षम, कडक, तेवढेच लोकात मिसळणारे, उत्साही म्हणून प्रसिद्ध. बाईंना सगीताची आवड कोणताही सांस्कृतिक कार्यक्रम हे जोडप चुकवत नाही. बाई पूर्वी नाटकात कामं करायच्या. आता, अर्थातच सोडलं! बस, घरच्या घरी एक सगीतशिक्षक शिकवायला येतो, तेवढच. बरेच दिवस झाले. थोडं दुर्लक्षच झाल; परंतु नतर नतर बाई दिसेनाशा झाल्या! असे दोन महिने झाल्यावर, विचारलं तर साहेब सागत– 'नागपूरला गली' वाटायचं, माहेरपणासाठी गेल्या असाव्यात; परंतु त्यानंतरही आल्या नाहीत दोन पोरं एकटी-एकटीच होती. साहेब त्याना दररोज कुठे सर्कस, कुठे सिनेमा, प्लेझर ट्रिप असं घेऊन जात. नतर–नतर ते म्हणाले–

–'तिने माझ्याशी घटस्फोट घेण्याचं ठरवलंय् तसा डायव्होर्स कोर्टात मागितला.'

– हे अचाटच होत! काय झालं बुवा? सगळं उत्तम तर होतं! साहेब तेवढंच पण नेमाने सागायचे. दुसऱ्या ऑफिसर्सच्या घरी म्हणायचे–

'जाने दो ना साब, चलो घूमने चलते है!'

– दया यायची, वाटायच केवढा जॉली हा माणूस! कसं दु ख असतं!

¤

– अतीच-तीन महिन्यानंतर बाई आपल्या मुलासकट आमच्या घरी आल्या. आपल्या हाता–तोंडावरचे वळ दाखवून म्हणाल्या–

– आता अशा माणसाबरोबर कशासाठी रहायच? तुम्हीच सांगा! हा हैवान आहे हैवान!'

–सगळेच उडाले. काय बोलतेय् ही बाई! स्वत. घटस्फोटाची नोटीस देऊनच्या देऊन अस बोलते! बाई भरभरून बोलत होत्या. डोळ्यात अश्रू नव्हते;–पण मोठ्या आवेगाने बोलत होत्या. त्यातील आवेग, पुनरावृत्ती, भावना काढून टाकल्या तर त्या रात्री कळालेली हकीकत अशी–

–साहेब (त्याला आपण 'म' म्हणू) त्या वेळी कुणीच नव्हते. कायद्याच्या परीक्षा पुन्हा पुन्हा देत होते पोलीसअधिकाऱ्याच्या परीक्षा देण्याच्या खटपटीत होते. स्वतःची आमदनी अशी काहीच नव्हती! 'म'चा व बाईंच्या आईचा नातेसबंध. कुटुबातल्या कुटुबात हे लग्न. 'म' तसे मूळचे ओडिसातील ढेंकानेल जिल्ह्यातील; पण नागपुरातच शिकण्यास आलेले. इकडे 'म'चे शिक्षण सुरू असताना या बाईंनी आपल्या लग्नापूर्वीच्या नाट्यकलेचे पुनरुज्जीवन केले. विदर्भात नाटककपन्यातून दौरे होत होते. नागपूर, दिल्ली आकाशवाणीवर कामं केली. 'म'च शिक्षण याच्यामुळंच पूर्ण झालं. 'म'ची आई कुटुब पूर्णपणे अडाणी, जुनाट विचार–आचारांचं! सासूबाईंवर (नाटकामुळं!) संशय घेत होती–

'कैसी चुडैल रख्खी रे घर में–दुसरो के साथ फिरती है'। अस ती म्हणायची. बाई दुर्लक्ष करायच्या. जाऊ दे. म्हातारीच तर आहे!

–'म' आय. पी. एस. झाला. नंतर आय. ए. एस ची परीक्षा देऊन असिस्टंट कलेक्टरही झाला. आता तो–ते साहेब झाले दोन पोरं झाली आता त्या साहेबाना 'त्या' संगीतशिक्षकाचा व बाईंचा संशय येऊ लागला. दोघही एकमेकांकडे पाहून हसतात, बोलतात इत्यादी. बाई म्हणाल्या–

–'अहो, आता चांगली दोन मोठी मुलं झाली मला, आता काय संशय घेण्यासारखं उरलंय? मग आधीपासूनच का नाही संशय घेतला? आतापासूनच कसा?'

–साहेब रोज रात्री बाईंना झोपेतून उठवायचे– 'बोल साली –तू उसके साथ क्यो बोली? क्यो हँस रही थी? शादी करना क्या उससे!'

–बाई काही बोलायच्या आत जोरदार मार बसायचे–लाथा, बुक्क्या, केस ओढणे, डाग देणे–इथपर्यंत! बाई शक्य तितक्या हळू ओरडायच्या. दु खानं! असा क्रम म्हणे सतत सहा–सात महिने चालू होता. रोज दिवसा तर काहीच जाणवत नव्हतं!

'कमाल आहे!' आम्ही मनात म्हटल.

–शेवटी कटाळून बाई नागपूरला गेल्या आईकडे रहायला. तिथं ज्या पेठेत त्या राहत, तेथे साहेब आले आणि तिच्या जवळच्या–दूरच्या नातेवाइकाना सागून–पटवून गेले, 'ये रडी है। उस...खान के साथ घूमती है।' आपल्या गुडांनाही सागून गेले म्हणे! एवढेच नाही तर आपल्या अधिकाराचा 'वापर' करून आकाशवाणी, इतर कार्यालयातही 'हिला नोकरी मिळ देऊ नका' म्हणून सागून गेले

बाई म्हणाल्या–आता या हैवानाबरोबर मी राहणारच नाही. चार–दोन वेळा समजूतदारीने निरोप पाठवले; पण व्यर्थ! आता मी माझं परत नाटकाचं आयुष्य सुरू करेन उभी राहीन याच्या नाकावर टिच्चून!'

–त्यानी नाटकातून कामं सुरू केली होती. काही तरी कायद्याची कामं उरकायला इकडे आल्या होत्या. नेहमीप्रमाणे घरी थाबल्या. सध्याकाळी साहेब आले. ते कडाडलेच– 'निकल जाव यहांसे'–मारायलाच धावले! दोन मुलांना सगळ कळत होत; पण पिटपिट डोळ्यानी सगळं बघत होते!

¤

एवढं सगळं सागितल्यावर एका 'स्त्री' मनातून प्रश्न आला– 'बाई, वेगळं होऊन तुम्ही काय मिळवणार? शेवटी बदनामी तुमचीच करणार हा माणूस! घटस्फोट स्वत: होऊन कशाला घेतला? इतके दिवस चालवलेला ससार आता मोडायचा?'

–यावर आम्ही तरुण पोर जाम चिडलो–काय तरी प्रश्न? ससार वगैरे साभाळायची तिचीच एकटीची जबाबदारी आहे? इतके वर्ष या मूर्ख माणसाच्या सहवासात मार खात जगण्याचा मूर्खपणा करीत होती. आता उरलेलं आयुष्य तरी माझं–माझ्यासाठी म्हणून जगते अस तिला वाटत नसेल का? आणि घटस्फोट तिने स्वत. होऊन घेतलाच नाही–परिस्थितीच अशी निर्माण झाली की, तिला घटस्फोट घ्यावाच लागला. बाई स्वत.च्या पायावर उभ्या राहतात–काय बेधडक–हिंमतवाज आणि खरोखर 'माणूस' आहे ही!

इत्यादी. बाई छोट्या मुलीला घेऊन त्या रात्री निघून गेल्या. दोन मुलाचे शिक्षण,

इतर जीवन व्यवस्थित व्हावे म्हणून त्यांना साहेबांकडेच ठेवून गेल्या.

'हे हो कसले देव' म्हणणाऱ्या 'एकच प्याला' मधील गीतेची क्रांतिकारी आवृत्तीच आम्हाला दिसली जणू !

— आता ही घटना विसरून जातो न जातो तोच एके रात्री बाई आल्या आणि हातावरचे, तोंडावरचे, डोक्यावरचे डाग दाखवून म्हणाल्या—

— मी ड्रायव्होर्स परत मागे घ्यायला आले होते. यांच्याबरोबर रहायचंय; पण त्यांनी राहूच दिलं नाही. शिव्या दिल्या, रात्री मारलं— जळत्या गॅसशेगडीवर फेकलं ! 'निघून जा रंडी !' असं म्हणाले.

— मागच्या 'स्त्री' मनाला सुप्त समाधान झालं. बाई शेवटी संसाराच्या ओढीनं परतल्या तर ! तरुण मनांचा मात्र अपेक्षाभंग झाला— काय स्वाभिमानशून्य बाई आहे ! जो मारून टाकू शकतो त्याच्याचबरोबर नांदायला तयार ?

— दरम्यान नागपुरात बाईच्या आईनेही त्यांना भर रात्री घराबाहेर काढलं. मग त्या आपल्या एका गुरूकडे थांबल्या. तात्पुरती नोकरीही मिळाली होती.

मग बाई परत का आल्या ?

घटस्फोटाचा अर्ज परत घेण्याच्या प्रयत्नात बाईंनी एक दिवस घालवला. वकिलांच्या भेटी घेऊन थकल्या. साहेब तर आता राहू द्यायला मुळी तयारच नव्हते. समझोता करू गेलेल्या एका बाईंना ते म्हणाले—

— 'आपको मालूम नहीं, वह औरत कैसी है।

मैं रह ही नही सकता उसके साथ।

— साहेबांचे सल्लागार म्हणून एक वेकार वकील त्यांना नीट सल्ला द्यायचा सोडून 'आप बिलकुल सही हैं साब' म्हणत होता. चूक बाईचीच आहे; बाई महा चालू आहे असे बडे ऑफिसर्स आपापल्या गाड्या चालवत चर्चा करीत होते. बाईच्या 'स्त्री' मनाच्या मैत्रिणीचे प्रयत्नही विफल झाले. इकडे बाईंनी घटस्फोट-अर्ज परत घेण्याची, नांदायची तयारी दाखवली; पण साहेब तर बाईंना एक क्षण राहू द्यायला तयार नव्हते. कशासाठी बाई आल्या न् काय घोळ झाला असे झाले.

□

ती संध्याकाळ व रात्र फार कचकचीत होती. येणाऱ्या-जाणाऱ्या वाहनांची धूळ सारखी उडत होती. उकाडा होत होता. वाळकी पानं भिरभिरत होती. अशा घुसमटलेल्या वेळी बाई आपल्या बरोबरच्या नातेवाइकांसकट, साहेबांच्या घरावरून पुढे गेल्या. ऑटोरिक्षात बसून स्टँडवर निघून गेल्या.

— काय होता हा सगळा प्रकार ?

□

साहेब रोज हसतमुखानं आमच्याकडे येतात. खूप गप्पा मारतात... विनोद करतात... पैठण, अजिंठा, म्हैसमाळला जायचे प्लॅन्स ठरविले जातात. शेवटी कॉफी पिऊन तेही उठतात. म्हणतात— मुलं झोपली असतील.

□


## एक किफायतशीर खरेदी !

कोणतीही वस्तू खरेदी केली की, काही दिवसांनी परत विकताना तिची किंमत कमी झालेली असते; पण एक खरेदी मात्र अशी आहे की, ठराविक मुदतीनंतर तिच्या किमतीत दुपटी-तिपटीने वाढ झालेली असते. . . . अशी फायदेशीर खरेदी म्हणजेच . . . महाबँकेची . . .

## कॅश सर्टिफिकेट्स . . .

या सर्टिफिकेटाची दर्शनी किंमत जरी जास्त असली तरी ती मिळतात मात्र स्वस्त !

उदाहरणार्थः—रु १०००/- किंमतीचं सर्टिफिकेट आज मिळतं केवळ रु. ३३७·९० ला— आणि १२० महिन्यांनी मात्र त्याचे रु. १०००/—मोजून घ्यायचे !

**ठराविक मुदतीनंतर तुमचे पैसे तिप्पट करणारी लाभदायी बचत . . . . आणि बचतीसाठी—**



# बँक ऑफ महाराष्ट्र

( भारत सरकारचा उपक्रम )

**मुख्य कचेरी : —**

**लोकमंगल, १५०१, शिवाजीनगर**

**पुणे ४११ ००५**

# नाट्यपंढरी

## वॅगन्स भरून फुले !

बुकिश नाटकाने रंगभूमीचा एकदम कायापालट झाला. तिचे रंगरूपच बदलले. सहितेबरहुकुम नाटकाचा प्रयोग होऊ लागला. त्यातला फाफटपसारा कमी झाला. नेटके नेपथ्य आले. अभिनयाचा दर्जा उंचावला. खऱ्या अर्थाने नाटक वास्तवाकडे वळले.

सुशिक्षित मंडळी, विशेषत: कॉलेजमधली प्राध्यापक मंडळी त्यात रस घेऊ लागली. संस्कृत नाटकांची भाषांतरे होऊ लागली. शेक्सपिअरची नाटके मराठी रंगभूमीवर येऊ लागली. स्वतंत्र सामाजिक नाटकांची रचना होऊ लागली. रंगभूमीचा नवा मनूच सुरू झाला म्हणा ना ! या साऱ्या नवलाईचे प्रेक्षकांनी मन:पूर्वक स्वागत केले.

मृच्छकटिक, वेणीसंहार, अथेल्लो, किंग-लिअर अशी नाटके खुद्द सुशिक्षित मंडळींनी सादर केली. यात मराठी नाटके करण्यात कोल्हापूरचे राजाराम कॉलेज आघाडीवर होते. या कॉलेजमध्ये प्रिन्सिपॉल कॅंडी हे फार रस घेत नि शक्यतो सारी मदत करीत. डेक्कन कॉलेजमध्ये संस्कृत नाटके होऊ लागली. पुण्यातच ‘आर्येकियारक’ नावाचा विद्याविभूषित तरुण मंडळीचा एक ग्रुप, मंडळ तयार झाले. त्यांनी नाटकात सर्वांगीण सुधारणा घडवून आणल्या. नाटकांचे प्रयोग करून ही मंडळी सामाजिक कार्यांना मदत करीत.

यातूनच पुढे फर्ग्युसन कॉलेजमधील विद्वान प्रोफेसर श्री. वासुदेवराव केळकर नि शंकरराव रानडे यांच्या प्रेरणेने नि मार्गदर्शनाने नटसम्राट गणपतराव जोशी यांनी आपल्या ‘शाहूनगरवासी नाटक मंडळी’ द्वारे झुंजारराव (अथेल्लो), त्राटिका, हॅम्लेट, कांचनगडची मोहना ही समर्थ नाटके उभी केली. ‘जुने जाउद्या मरणा लागुनि’ या केशवसुतांच्या उक्तीप्रमाणे ‘तगडतोम्’ किंवा ‘आमटी’ नाटके संपली. संगीत नि गद्य नाटकाची वेल फुलू लागली.

मराठी रंगभूमीच्या या संक्रमणकाळात ‘कालिदास एल्फिन्स्टन सोसायटी’ या मुंबईतल्या सुशिक्षित मंडळींनी शाकुंतल नाटकाचा इंग्रजी प्रयोग केला. हेतू हा की, इंग्रज लोकांना आपल्या नाटकाची ओळख व्हावी. नाटक इंग्रजीत असले, तरी त्याचे नेपथ्य, वेशभूषा, केशभूषा सारे काही अस्सल भारतीय, मराठीच होते. नाटक वास्तव करण्याच्या दृष्टीने, सीनसिनेरीसाठी या मंडळींनी अफाट खर्च केला होता. शकुंतलेसाठी चारशे रुपये खर्च करून मद्रासहून वल्कले मागविली होती. शकुंतलेच्या पुष्पशय्येच्या प्रवेशासाठी खास पुण्याहून दोन रेल्वे-वॅगन्स भरून फुले आणवली होती. याला म्हणतात हौस !

## धूप दरवळू लागला !

विद्याविभूषित मंडळींनी नाटकात सर्वतोपरी सहभागी होऊन तिला प्रतिष्ठा प्राप्त करून दिली होतीच. अनेक गद्य नि संगीत नाटके लोकप्रिय होत होती; पण त्यात यशाचे शिखर गाठले ते अण्णासाहेब किर्लोस्करांच्या शाकुंतलाने (१८८०), करमणुकीचे शिष्टसंमत दालन. लोकमान्य प्रकार म्हणून शिक्कामोर्तब झाले, ते अण्णांच्या शाकुंतलापासून नवविवाहित युगले, लग्नाच्या पहिल्या रात्री कौतुकाने नाटकाला जाऊ लागली ती शाकुंतलापासूनच. त्यांचे हे नाटक म्हणजे, अण्णांनी हंसक्षीर-न्यायाने निवडलेल्या जन्या संगीत नि गद्य नाटकातल्या गुणविशेषांचा सुंदर मिलाफच होता म्हणा ना ! त्यांना या नाटकाची स्फूर्ति ‘पार्सी थिएट्रिकल’ च्या इंद्रसभा या ऑपेरासारख्या नाटकातून मिळाली असली तरी शाकुंतलापूर्वी त्यांची मराठी रंगभूमीशी जवळीक होतीच. पौराणिक नाटकांसाठी खूप कविता रचल्या होत्या. नाटकांचे वारकारे न्याहाळले होते. म्हणूनच त्यांच्या हातून अशी प्रासादिक कलाकृती निर्माण झाली. त्यांच्या शब्दात सांगायचे तर ‘कालीदासकविकृत’ शाकुंतलाची मराठीत गद्यपद्यात्मक रचना केली. ‘गानी शाकुंतल रचिले’

हे नाटक, मोरोबा वाघोलीकर, बाळकोबा नाटेकर, शंकरराव मुझुमदार यांना बरोबर घेऊन रंगभूमीवर आणले. तसे हे प्रायोगिकच नाटक होते; पण त्याच्या अपूर्व यशाने ‘किर्लोस्कर संगीत मंडळी’ ला जाणत्यांनी नि रसिकांनी, मोठ्या आग्रहाने व्यवसायाची वाट दाखविली.

मोरोबा वाघोलीकर तर दुष्यंताची भूमिका करणार होते. उत्तम गायक म्हणून त्यांचा लौकिक होता. विशेषत: त्या काळी लोकप्रिय असलेला लावणीबाज त्यांना उत्तम अवगत होता; पण त्यांनी नाटकात काम केले नव्हते. साहजिकच ते मनातून घाबरले होते. ते त्यांचे गुरू जंगलीमहाराज यांच्याकडे गेले, नि म्हणाले, ‘महाराज, तुम्ही आज नाटकाला या. तुम्ही असलात म्हणजे मला धीर येईल माझे काम चांगले वठेल ! त्यावर महाराज किंचित हसून म्हणाले, ‘ अरे मोरू, मी कसा नाटकाला येणार ? मी नाटक पहात नाही.’ आपल्या उत्तराने झालेली मोरोबाची नाराजी त्यांच्या लक्षात आली. लगेच ते म्हणाले, ‘अरे मोरू, ये ऊदी घे. नाटकाच्या आधी हा ऊद घाल. तुझे काम सरस होईल ’ झाले, भाबडे मोरोबा एकदम खूष झाले. थिएटरवर येताना चांगला शेरभर ऊद-धूप घेऊन आले खेळ सुरू होण्यापूर्वी महाराजांनी दिलेली प्रसादाची ऊदी त्यात मिसळून भक्तिभावाने तो सगळा ऊद-धूप घातला. मराठी रंगभूमीवर धूप दरवळला तो त्या दिवसापासून. शाकुंतलाच्या पहिल्या प्रयोगापासून ! रसिकही खरोखर त्या दिवशी ‘अमृतसिद्धी ’ योग होता. (३१ ऑक्टोबर १८८०, रविवार, अश्विन वद्य त्रयोदशी शके १८०२ अमृतसिद्धि योग, आनंदोद्भव नाट्यगृह, पुणे ) म्हणूनच हा नाट्यसुगंध धुपाचा दरवळ आपल्याला आजही सुगंधीत करीत आहे, सुखवीत आहे. नादीचे सूर कानी पडतात ते धुपाच्या सुगंधात भिजूनच ! मग ते नाटक सदामुखद सौभद्र-संशयकल्लोळ असो, नाही तर लफडा सदन वा ‘आज धंदा बंद आहे ’ असो. धुपाचा दरवळ आहेच नि हवाच !

रंगभूमी

## पारध आणि कर्ता–करविता

# सारंगसाहेबांना अनावृत पत्र

माननीय आणि आदरणीय आणि असेच काही तरी श्रीयुत कमलाकर सारंगराव-साहेबजो यांना,

आपल्या 'कलारंग' या संस्थेतर्फे प्रदर्शित झालेल्या आणि आपणच लिहून दिग्दर्शित केलेल्या 'पारध' या नाटकाचे सावज म्हणून माझा नुकताच उपयोग झाला. त्यानंतर काही कालावधीतच 'अनुभव' या संस्थेच्या रत्नाकर मतकरीलिखित 'कर्ता–करविता' नाटकातही त्या नाटकाचे दिग्दर्शक म्हणून आपण दृष्टीस पडलात. ही दोन्ही नाटके पाहिल्यानंतर माझ्या सावजलेल्या डोक्यात एक अभिनव कल्पना घोळत होती. ती आपल्याला सांगणे अगत्याचे असल्याने आणि आपली तशी निवांत भेट होणे दुस्तर असल्याने हा अनावृत्त पत्रप्रपंच. 'अनावृत्त' पत्र म्हटल्यानंतर आपलेही लक्ष अधिक वेधले जाण्याची शक्यता.

एव्हाना आपल्याला बहुतेक 'पारध' आणि 'कर्ता–करविता' या दोन्ही नाटकांचा विसर पडलेला असण्याची शक्यता आहे. कार्यबाहुल्यच एवढे की, किती आली–गेलेली नाटके लक्षात ठेवणार, नाही का ? म्हणून आपल्या स्मरणशक्तीला पीळ बसू नये, या हेतूने पुनरावृत्तीचा धोका आणि प्रमाद पत्करूनही या दोनही नाटकांचे कथासूत्र थोडक्यात गुंडाळून आपल्यापुढे मांडतो.

(१) पारध : सुमित्रादेवी ( लालन सारंग) या श्रीमंत विधवेकडे हीरा (चारुशीला साबळे) नावाची तरुणी 'कंपॅनिअन' म्हणून नोकरीला असते. सुमित्रादेवींच्या मदतीने आपल्या प्रियकराला – सतीशला (दिलीप कुलकर्णी) मोठ्ठ्ठा सतारिया बनवायचे, ही हीराची योजना. त्यासाठी ती सतीश आणि सुमित्रादेवींची गाठ घालून देते. तेव्हापासूनच या तिघांच्या संबंधांमधील ताण–तणावांना सुरुवात होते. नाटकाच्या अखेरीस आपल्या महत्त्वाकांक्षेसाठी सतीश हीराचे निःसीम प्रेम झिडकारतो. हे पाहून हीरामधील निष्पापपणा, निरागसता मारला जाऊन ती पक्की धूर्त आणि व्यवहारी बनते, तर सतीशला हीरापासून तोडल्यानंतरही हा हिसकावलेला सतीश सुमित्रादेवींशी कधीच बांधला जात नाही. या प्रत्येकाची नियतीने केलेली विचित्र पारध वगैरे आपल्याला या नाटकातून दाखवायची होती, असा माझा एक भाबडा अंदाज. नाटकाचे हे कथासूत्र वेगळे वाटत असले, तरी ही त्रिकोणाची भूमिती आपल्याकडे बऱ्याच वेळा दाखवून झाली आहे. नेहमी एक बिंदू उडविण्याच्या साच्याऐवजी आपण तिन्ही बिंदूंमधील रेषा पुसून ते वेगवेगळे काढले, हे वेगळेपण. चारुशीला साबळ्यांनी सादर केलेली 'हीरा' मुळात लेखनात कच्ची राहिली असली, तरी रंगमंचावर मात्र विलक्षण प्रभावी ठरली !

२. कर्ता–करविता : रत्नाकर मतकरींच्या बहुतेक नाटकांप्रमाणे याही नाटकाला सत्य-घटनेचा लटपटता आधार आहेच, शिवाय 'The Betsy' या गाजलेल्या कादंबरीचाही भक्कम आधार आहे. डॅडीसाहेब तोरगल (रमेश देव) हे एक बडे उद्योगपती, बडे आणि रंगेलही ! आपल्या रंगढंगांना मोकळा वाव मिळावा म्हणून त्यांनी आपल्या पत्नीला –ममीला (सीमा देव) ड्रग-अॅडिक्ट बनवलेले. शामकांत ( राजन ताम्हाणे ) हा डॅडींचा थोरला मुलगा. डॅडींकडे नोकरीस असलेल्या बारस्करांच्या ( सुमंत मस्तकार ) मुलीवर शामकांतने एकदा दारूच्या नशेत बलात्कार केला आणि त्या लफड्यातून डॅडींनी त्याला वाचवले म्हणून शामकांत कायम डॅडींच्या अर्ध्या वचनात वागणारा ! याउलट रविकांत (हरीश तुळशुलकर) हा धाकटा मुलगा मात्र बापाविरुद्ध थोडीफार बंडखोरी करणारा. एक दिवस शामकांतच्या पत्नीवर–उज्ज्वलावर (उज्ज्वला केणी) डॅडीसाहेबांची विकारी नजर पडली. स्वतःला वाचवण्यासाठी उज्ज्वला पळत घराबाहेर पडली. तिला रस्त्यात अपघात होऊन ती दोन्ही पायांनी पांगळी झाली. मग डॅडी विरुद्ध पांगळी उज्ज्वला असा जाहीर सामना ! शेवटी अचानक बारस्कर, पत्रकार त्रिविक्रम मौनी (सुरेन फातर्पेकर) असे बरेच लोक उज्ज्वलाच्या देवपार्टीला मिळाले. शामकांतने केलेला बलात्कार हा त्याने केलेला नसून डॅडीसाहेबांनी केलेला आहे; पण केवळ शामकांतवर जरब ठेवण्यासाठी डॅडीसाहेबांनी ते बालंट त्याच्यावर टाकले, असेही सिद्ध झाले. मात्र शामकांत काही बापाविरुद्ध बंड करायला तयार होईना; त्यामुळे चिडून उज्ज्वला त्याला सोडून गेली, रवीनेही घर सोडले. सुमंत मस्तकार, हरीश तुळशुलकर या दोघांची अत्यंत सुसह्य कामे वगळता या नाटकासंबंधी न लिहिण्यासारखे बरेच आहे.

तर एव्हाना ही दोन्ही नाटके आपल्या लक्षात आली असतील, अशी मी आशा करतो.

आता या नाटकांशी संबंधित मला सुचलेल्या कल्पनेबद्दल.

ही दोन्ही नाटके ज्या ठिकाणी संपतात, त्या ठिकाणी सुरू होणारे तिसरे नाटक. त्या तिसऱ्या नाटकात काय काय दाखवता येईल याचा थोडक्यात तपशील पुढीलप्रमाणे–

डॅडीसाहेब स्त्रीलंपट आहेतच, शिवाय मत्ता आणि सत्ता दोन्हींची त्यांना अतोनात हाव. सुमित्रादेवींना कोणा तरी काळजीवाहू पुरुषाची गरज आहे आणि सतीश तर दुरावलेला. अशा वेळी डॅडीसाहेब आणि सुमित्रादेवींना एकत्र आणले तर ? हे कसे, कुठे, कोणत्या निमित्ताने एकत्र आणावयाचे, हे आपल्यासारख्या मातब्बराला मी सांगण्याची गरज नाही.

अशाच रीतीने धूर्त, व्यवहारी बनलेल्या हीराची आणि शामकांतची जोडी लावता येईल. प्रेमाच्या शोधात निघालेल्या पांगळ्या उज्ज्वलाची आणि प्रेमाला पारखा होऊन पश्चात्ताप पावलेल्या सतीश सतारवाल्याचीही भेट घडवता येईल. योगायोगाने सर्व मंडळी मुंबईकरच आहेत. अशा या सर्व अतृप्त म्हसोबा आणि सटवायांच्या लग्नसंबंधांवर आधारित तिसऱ्या नाटकाचा आपण गंभीरपणे विचार करावा ही विनंती. कळावे.

आपला नम्र,

–एक अतिनम्र प्रेक्षक

ता. क. – ही कल्पना आपण गंभीरपणे विचारात घेतल्यास मी रॉयल्टीचा हक्क मांडणार नाही, हे जाहीरपणे आपल्याला छापून देतो !

–एक अतिनम्र प्रेक्षक

–डॉ. सदानंद बोरसे

## ग्रामदानाची प्रयोगभूमी
दुसरी आवृत्ती

ग्रामदानक्राती म्हणजे काय ? तिचे मार्ग कोणते ? कोरापुटमधील ( ओरिसा ) कार्याची माहिती करून घेतल्यामुळेच हे कळण्याजोगे आहे. श्री. माजगावकर यानी याच दिशेने आपल्या पुस्तकात प्रयत्न केला आहे हा उपयुक्त झाला आहे असे मला वाटते.

**– डॉ. धनंजयराव गाडगीळ**

ज्यात प्रत्यक्ष व्यवहार्यता आणि दूरगामी क्रातिकारक ध्येयवाद यांची सांगड नाही, अशा प्रयोगाबद्दल महाराष्ट्रामध्ये जिव्हाळा उत्पन्न होत नाही. कोरापुटच्या प्रयोगाचे हे चिकित्सक दर्शन म्हणूनच मला उपयुक्त वाटते. समाजक्रातीचे ध्येय पुढे ठेवणाऱ्या सर्वांकडूनच या पुस्तकाचे स्वागत व्हावे असे मला वाटते.

**– दि. के. बेडेकर**

पुस्तक उत्कृष्ट. माहिती जमा करण्याची कसोशी, अवलोकन, त्यातून निष्कर्ष काढण्याची बुद्धी – सर्वच गुण यात दिसून येतात. पण याहीपेक्षा स्वतंत्रपणे चिंतन करण्याचे जे सामर्थ्य या लेखनात दिसून येते ते विशेष अभिनदनीय आहे. मला पुस्तक वाचून अत्यंत आनंद झाला.

¤ **– डॉ. पु. ग. सहस्त्रबुद्धे**

## श्रीग्रामायन
दुसरी आवृत्ती

माजगावकराचे हे पुस्तक प्रभावी आहे यात शका नाही. विचार करणाऱ्या माणसाचे लक्ष ग्रामीण समस्याकडे वेधून घेण्याची फार मोठी कामगिरी ते करीत आहेत. हे करताना माजगावकराचे साहित्यगुणही विशेषत्वाने चमकतात. तजेलदार भाषा, स्फोटक वर्णन, भेदक उपरोध, नाट्यमय प्रारंभ व शेवट हे सगळे त्यात आहे. शिवाय मौलिक विचार आहेत, आणि शुद्ध भावकाव्यही कुठेकुठे आहे

**– प्रा. स. ह. देशपांडे**

श्री. ग. माजगावकराच्या पुस्तकाचे नाव असे आहे की, ते उघडण्यापूर्वीच एक क्षण वाचकाने जरा थबकावे – 'श्रीग्रामायन !' माजगावकराना जे जे व्यक्त करायचे आहे त्याचा 'मर्मबंध' म्हणजे हे नाव. स्वैर चिंतनात्मक लेख, मुलाखती किंवा मित्रांशी पत्ररूप सवाद – अशा निरनिराळ्या अन् ललित शैलीची प्रसन्न डूब दिलेल्या माध्यमातून लेखकाने एक सूत्र गोवत नेले आहे अशा विविध माध्यमांमुळे काही वेळा माजगावकराचे लिखाण भरकटत गेले असले तरी त्यांना जी एक बैठक माडायची आहे तिचा पक्केपणा कुठेही गेलेला नाही

**– डॉ. विद्याधर पुंडलिक**

जीवनाची चाकोरी सोडून, पायपीट करून ग्रामीण प्रश्नांचे वेगवेगळे पैलू जवळून पाहण्याचा हा एक आगळाच प्रयत्न आहे काही उपक्रमात पुढाकार व जबाबदारीही घेतलेली आहे.

¤ **– आबा करमरकर**

## निर्माणपर्व
( आगामी )

काही रचनाप्रयोग आणि संघर्षक्षेत्रे यांचा सहभागपूर्वक घेतलेला शोध – शहाद्याची चळवळ, म्हैसाळ, जयप्रकाश आंदोलन, ग्राहक चळवळ . . . . इत्यादी.

¤

## जनतापर्व
( आगामी )

आणीबाणी, दुसरे स्वातंत्र्य, जनता राजवटीची सुरुवात–शेवट.

¤

## बलसागर
( आगामी )

हिंदुत्व, भारतीयत्व, राष्ट्रीय एकात्मता आणि राष्ट्रीय पुरुषार्थ.

**पाच पुस्तके । प्रकाशनाच्या मार्गावर । श्री. ग. माजगावकर**